Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक २६२ * ✻ नागपूर ✻ | गुरुवार, दिनांक १९ डिसेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

## संतोष देशमुख हत्या प्रकरणात मोठी कारवाई


**■ वृत्तसंस्था, बीड, दि. १८ :**
बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडातील प्रमुख आरोपी विष्णू चाटे याला पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींचा आकडा 4 वर पोहोचला आहे. विष्णू चाटेवर हत्या व खंडणी उकळल्याचा आरोप आहे. या प्रकरणी अद्याप 3 आरोपी फरार आहेत.

संतोष देशमुख यांची गत 9 डिसेंबर रोजी अपहरण करून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी आतापर्यंत 3 आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यानंतर आता पोलिसांनी बुधवारी विष्णू चाटे याला अटक केली. राष्ट्रवादी काँग्रेसचा तत्कालीन तालुकाध्यक्ष विष्णू चाटेवर हत्या व खंडणीचा गुन्हा दाखल आहे.

अग्राग्रलेख
**खरीखरी..**

## भुजबळांची दिशा कोणती?

अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे दिग्गज नेते छगन भुजबळ सध्या मंत्रीपद न मिळाल्याने अत्यंत फार्मात आलेले आहेत. त्यांच्या विद्वत्तापूर्ण गूढ वक्तव्यांचा अर्थ लावणे, भल्याभल्यांना जमेनासे झालेले आहे. कोणे एकेकाळी महाराष्ट्राच्या विधानसभेत शिवसेनेचे एकमेव आमदार असताना भुजबळ ज्या दमदारपणे आपल्या भुजांचे बळ दाखवीत असत. त्या भुजा इतक्या वर्षानंतरही तशाच आहेत की, वयोमानानुसार त्या भुजांचे बळ कमी झालेले आहे. याचा अंदाज येणे सध्या तरी कठीण आहे. काल भुजबळ यांनी एक नारा दिला. तो म्हणजे, एक है तो सेफ है. हा नारा भारतीय जनता पक्षाच्या उत्तर प्रदेशातील योगीराजांचा आहे. या नाऱ्यामुळे महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशात दोन्ही राज्यात भाजपला जे बळ मिळाले. त्यातून आता हा विचार जर सर्वांनी स्वीकारला तर सर्वांनाच बळ मिळेल. मात्र, भुजबळ यांनी एक होण्याची भाषा कोणासाठी उच्चारली असेल. हे शेंबड्या पोरांनाही माहित आहे. आपण ओबीसीचे देशव्यापी नेते आहोत. असा साक्षात्कार झाल्यावरच हिंदुत्ववादी शिवसेनेतून भुजबळ बाहेर पडले होते. ते ज्यांच्या नेतृत्वाखाली गेले. त्या शरद पवार यांनाही अडीच वर्षांपूर्वी पवार साहेबांच्या गणगोताने धक्का दिला, ही बाब सर्वज्ञात आहे. आता भुजबळ 100% मोकळे आहेत. त्यामुळे केवळ महाराष्ट्रातच नाही. तर देशभरातील ओबीसींचे नेते म्हणून ओबीसी नसलेले राहुल गांधी ज्या पद्धतीने बोलत आहेत. त्यांची प्रेरणा घेऊन किंवा त्यांच्या समान अंतर भुजबळ साहेबांनी एखादी वेगळी संघटना उभी करायचा विचार केला आहे की काय, असा प्रश्न पडतो. शिवसेनेत असताना आपण ज्या समाजाचे आहोत. त्या समाजाचे सर्वच समाजाने मान्य केलेले बडे नेते महात्मा ज्योतिबा फुले यांच्या बद्दल त्यांना फारशी आत्मीयता होती असे तेव्हा दिसले नव्हते. पण त्यानंतर त्यांना 'ज्योतिबा' या नावातील स्फुल्लिंग समजले आणि भुजबळ साहेब आपसूकच त्या समाजाचा आणि ओबीसींचा प्रभावी चेहरा ठरले. सध्या भुजबळ साहेबांना नवा घरोबा परवडणारा नाही. त्यामुळेच त्यांच्या अनुयायांनी त्यांच्या कितीही मिन्नतवाऱ्या केल्या. तरी भुजबळ साहेब नव्या पक्षाला शरण जातील असे वाटत नाही. अजित पवारांच्या समोरही दिल्ली दरबारचा आदेश आल्यावर भुजबळांना आपल्या मंत्रिमंडळात घेणे शक्य झाले नसते. त्यामुळे आता सत्तेतील भुजबळ आणि सत्ते बाहेरील भुजबळ किती प्रभावी आहेत. हे दाखवण्यासाठी ते दंड थोपटतील, अशी आशा करायला हरकत नाही. मात्र मा. भुजबळ साहेबांचा जय महाराष्ट्र पासून, जयहिंद पर्यंतचा त्यांचा प्रवास निश्चितच प्रभावी आहे. यात शंकाच नाही.



nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## 'गेट वे ऑफ इंडिया'लगत फेरीबोट उलटली

# १३ ठार, ८ बेपत्ता

### नेव्हीच्या स्पीडबोटने धडक दिल्यामुळे घडली दुर्घटना
### ६६ जणांना वाचवण्यात बचाव पथकाला यश



**■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :**
मुंबईलगतच्या अरबी समुद्रात एक फेरबोट उलटल्याची घटना घडली. बोटीच्या मालकाने दिलेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त बोट 80 प्रवाशांना घेऊन एलिफंटा लेणीकडे जात होती. पण रस्त्यात नेव्हीच्या स्पीडबोटने तिला धडक दिली. यामुळे बोट समुद्रात कलंडली.

या घटनेत आतापर्यंत १३ जणांचा मृत्यू झाला असून, ६६ जणांना वाचवण्यात आले आहे. उर्वरित लोकांना नेव्ही व तटरक्षक दलाच्या मदतीने वाचवण्यात येत आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी अद्याप ८ जण बेपत्ता असल्याची माहिती आहे.

एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, 'मी दुपारी 3.30 वा. ही बोट पकडली. 10 किलोमीटर आतमध्ये गेल्यानंतर एका स्पीडबोटने आमच्या बोटीला धडक दिली. त्यानंतर आमच्या बोटीत पाणी शिरू लागले. त्यावेळी आमच्या ड्रायव्हरने आम्हाला लाईफ जॅकेट घालण्याची सूचना केली. मी वरुन खाली येऊन जॅकेट घालेपर्यंत बोटीत पाणी शिरले होते.

मी जवळपास 15 मिनिटे समुद्रात पोहत होतो. तोपर्यंत दुसरी बोट आली आणि आम्हाला वाचवले. स्पीडबोटमध्ये जवळपास 8 ते 10 माणसे होती. मी माझ्या बोटीच्या वर होतो. सुरुवातीला लाईफ जॅकेट देण्यात आले नव्हते. पण जेव्हा बोटीत पाणी आले तेव्हा ते देण्यात आले.

मुंबईपासून एलिफंटा हे जवळपास 30 किलोमीटरचे अंतर आहे. यासाठी 40 ते 45 मिनिटांचा प्रवास करावा लागतो. बुधवारी दुपारी 3.30 च्या अपघातग्रस्त बोट गेटवे ऑफ इंडियावरुन सुटली. ती 5 ते 8 किमी आत खोल समुद्रात गेल्यानंतर एका स्पीड बोटने येऊन या बोटीला धडक दिली.

शेतकरी कामगार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी घटनास्थळी जाऊन स्थितीचा आढावा घेतला. नेव्हीच्या स्पीडबोटमुळे हा अपघात घडल्याचा एक व्हिडिओ समोर आला आहे. पण नेव्हीने आपल्या बोटीने धडक दिल्याचा आरोप फेटाळला आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या अपघाताचा आढावा घेतला असून, प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

## राज्यसभेत जय भीम आणि माफी माग..

### दोन्हीकडून नारेबाजी

**■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १८ :**
संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा बुधवारी 18 वा दिवस होता. आंबेडकरांच्या अपमानावरून लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहात गदारोळ झाला.

विरोधी पक्षाच्या खासदारांनी सभागृहात जय भीम आणि माफी मागाच्या घोषणा दिल्या. गृहमंत्री अमित शहा यांनी बाबासाहेबांचा अपमान केल्याचा आरोप काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांच्या खासदारांनी केला आहे. एक दिवस आधी मंगळवारी गृहमंत्री अमित शहा यांनी राज्यसभेत संविधानावर चर्चा केली होती. आंबेडकरांचे नाव जितक्या वेळा काँग्रेसने घेतले तितक्या वेळा देवाचे नाव घेतले असते तर त्यांना स्वर्गात स्थान मिळाले असते, असे ते यावेळी म्हणाले होते. यावर केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी राज्यसभेत सांगितले की, अमित शहा यांच्या वक्तव्याची केवळ 10-12 सेकंदाची व्हिडिओ क्लिप दाखवून विरोधी पक्षनेते देशाची दिशाभूल करत आहेत आणि वाद निर्माण करत आहेत.

राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड म्हणाले की, मीही दोनदा व्हिडिओ पाहिला, त्यात काहीही चुकीचे नाही. त्यात बाबासाहेबांच्या आदर्शाशिवाय दुसरे काहीही नव्हते. यानंतर दोन्ही सभागृहांचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले.

दरम्यान, शहा यांनी बुधवारी संध्याकाळी पत्रकार परिषद बोलावली. ते म्हणाले, काँग्रेस हा आंबेडकरविरोधी पक्ष आहे, आरक्षणविरोधी, संविधानविरोधी आहे, आणीबाणी लादून राज्यघटनेतील सर्व मूल्ये नष्ट केली.

## 'भुज' बळ दाखवणार?



**■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :**
मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने नाराज झालेल्या ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी आता नाशिक येथे पुढील रणनिती जाहीर केली आहे.

या मेळाव्यात छगन भुजबळ यांनी पुन्हा एकदा ओबीसींचा कैवार घेत राज्यात आंदोलन करीत फिरणार असल्याचे जाहीरपणे सांगितले आहे. समतेचे चक्र उलट दिशेने नेणाऱ्यांनाच आपला विरोध असल्याचे स्पष्ट केले आहे.

भुजबळ यांनी यावेळी कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात यल्गार करण्याचा फैसला घेतला आहे. मंत्रिपदं येतात जातात., किती वेळा आली गेली, विरोधी पक्षातही बसलो. विरोधी पक्षनेता म्हणूनही काम केलं ना. त्याचं काय एवढं दुखं घेऊन बसायचे असेही भुजबळ यावेळी म्हणाले.

ओबीसींनी तुम्हाला एवढे दिल्यावर असं का? हा प्रश्न राज्य आणि देशातील जनतेला पडला आहे. मंत्रिपद नसेल तर रस्त्यावर मी आहे. सभागृहातही मी लढणार आहे आणि बोलणार आहे. पण अहवेलना करण्याचं शल्य मनात डाचतंय. असं का कुणासाठी असाही सवाल यावेळी छगन भुजबळ यांनी केला. देशातील आणि राज्यातील नेत्यांशी चर्चा करावी लागेल. त्यानंतर विचारपूर्वक पाऊल उचलणार आहे, असेही भुजबळ यांनी सांगितले.

*मैं मौसम नही हूँ जो पल में बदल जाऊँ,*
*मैं इस जमीन से दूर कहीं और ही निकल जाऊँ,*
*मैं उस पुराने जमाने का सिक्का हूँ*
*मुझे फेंक न देना,*
*हो सकता है बुरे दिनों में मैं ही चल जाऊँ*

अशी शेरोशायरीही त्यांनी केली.

## संसदेतील बाबासाहेबांच्या अवमानावरून

# विधिमंडळात खडाजंगी

**■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :**
नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या संसदेच्या अधिवेशनात काल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केलेल्या विधानावरून आज नागपूर येथे सुरू असलेल्या विधानसभेच्या अधिवेशनात परिषदेच्या सभागृहात विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये खडाजंगी उडाली.

काँग्रेसचे महासचिव जयराम रमेश यांनी अमित शाह यांच्या विधानाचा एक व्हिडीओ समोर आणला होता. या व्हिडीओत अमित शाह हे विरोधकांवर टीका करताना म्हणतात, आंबेडकर.. आंबेडकर.. म्हणायची आता एक फॅशन झाली आहे. एवढं जर देवाचं नाव घेतलं असतं तर सात जन्मापर्यंत स्वर्ग मिळाला असता. शाह यांच्या याच विधानावर संसदेत विरोधकांनी आक्षेप घेत हा आंबेडकरांचा अपमान असल्याचे म्हटले आहे.

परिषदेचे कामकाज सुरू झाल्यानंतर विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन अंतर्गत संसदेत झालेल्या या प्रकरणावर बोलण्यास सुरुवात केली. त्यावेळी सत्ताधारी बाकावरील सदस्यांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली.

हा संसदेचा विषय आहे, परिषदेच्या सभागृहात कशाला..? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. तर त्याचवेळी सभापती नीलम गोऱ्हे यांनीदेखील दानवे यांना थांबवण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा गैरवापर करू नका, असे सांगितले.

यावेळी डॉ. नितीन राऊत यांनीही हा मुद्दा उपस्थित केला. सत्ताधारी गोंधळ घालत असतानाच विरोधकांनी सभापती यांच्या आसनासमोर येत घोषणा देण्यास सुरुवात केली. गोऱ्हे यांनी दानवे यांना बोलण्याची संधी नाकारताच विरोधकांनी सभात्याग केला.




**पायऱ्यांवर विरोधकांचे आंदोलन**

शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळाला पाहिजे, या मागणीसाठी महाविकास आघाडीच्या आमदारांचे विधिमंडळाच्या पायऱ्यांवर जोरदार आंदोलन केले. कापूस, सोयाबिन व तूर या शेतमालाला हमीभाव मिळाला पाहिजे, धानाला बोनस मिळाला पाहिजे, कापसाच्या झाल्या वाती सोयाबिनची झाली माती, शेतकऱ्यांना देशोधडीला लावणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, अशी जोरदार घोषणाबाजी करत व हातात सोयाबीन, तूरची रोपं, गळ्यात कापसाच्या बोंडाच्या माळा घालून महाविकास आघाडीच्या आमदारांनी आज सरकारविरोधात आंदोलन केले.

## वन नेशन-वन इलेक्शन जेपीसीसाठी प्रियंका गांधीचे नाव

**■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. १८ :**
वन नेशन, वन इलेक्शन यासाठी मंगळवारी संसदेत सादर करण्यात आलेल्या 129 व्या घटना (दुरुस्ती) विधेयकाचे पुनरावलोकन करण्यासाठी स्थापन करण्यात येणाऱ्या संयुक्त संसदीय समितीमध्ये (जेपीसी) काँग्रेसच्या वतीने प्रियंका गांधी वाड्रा यांचा समावेश केला जाऊ शकतो.



काँग्रेसने जेपीसीसाठी चार खासदारांची नावे सुचवली आहेत. यामध्ये प्रियंका यांच्याव्यतिरिक्त मनीष तिवारी, रणदीप सिंग सुरजेवाला आणि सुखदेव भगत सिंग यांचा समावेश आहे. त्याचवेळी तृणमूल काँग्रेसने साकेत गोखले आणि कल्याण बॅनर्जी यांची नावे पुढे केली

## आंतरराष्ट्रीय क्रिकेटला अश्विनचा अलविदा

### भारताकडून सर्वाधिक विकेट घेणारा दुसरा गोलंदाज

**■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :**
रविचंद्रन अश्विनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. त्याने तिन्ही फॉरमॅटसह 287 सामने खेळले आणि 765 विकेट घेतल्या. अश्विन हा भारताचा दुसरा सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज आहे. त्याच्या पुढे फक्त अनिल कुंबळे आहे ज्याने ९५३ विकेट्स घेतल्या आहेत.

भारतीय कर्णधार रोहित शर्मा पत्रकार परिषदेत म्हणाला, मी पर्थला आलो तेव्हा अश्विनने मला त्याच्या निवृत्तीबद्दल सांगितले होते. एखाद्या खेळाडूने निर्णय घेतला तर त्याचा आदर केला पाहिजे. अश्विन उद्या भारतात परतणार असल्याचे त्याने सांगितले.

गाबा कसोटी संपताच अश्विनने निवृत्ती जाहीर केली. बीसीसीआयनेही त्याच्या निवृत्तीबद्दल ट्विट केले आहे. आर अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये 106 सामन्यात 537 विकेट घेतल्या आहेत. त्याच्या नावावर 37 5 विकेट आहेत आणि 8 वेळा मॅचमध्ये 10 विकेट घेतल्या आहेत. अश्विनने 156 एकदिवसीय विकेट्सही घेतल्या आहेत. अश्विनने टी-20 मध्ये 72 विकेट घेतल्या आहेत.




एक फलंदाज म्हणून अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये 3503 धावा केल्या आणि एकूण 6 कसोटी शतके झळकावली. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्याची एकूण 8 शतके होती.

अश्विनच्या नावावर कसोटीत 37 पाच बळी आहेत, जे भारतीय गोलंदाजाचे सर्वाधिक आहे. त्याच्यानंतर कुंबळेचे नाव येते. कुंबळेने कसोटीतील 35 डावांत पाच विकेट्स घेतल्या होत्या.अश्विनने आपल्या कारकिर्दीत इंग्लंडविरुद्ध सर्वाधिक विकेट्स घेतल्या आहेत. त्याने तिन्ही फॉरमॅटसह इंग्लंडविरुद्ध 53 सामने खेळले.

## सुधीर रसाळ यांना साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर



**■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :**
साहित्य अकादमीच्या वतीने दिला जाणाऱ्या वार्षिक पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून यामध्ये मराठी भाषेतील प्रसिद्ध लेखक सुधीर रसाळ यांचा नावाचा देखील समावेश करण्यात आला आहे. 'विंदांचे गद्यरूप' या सुधीर रसाळ यांनी लिहिलेल्या पुस्तकाला हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

तर्थतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बा. सी. मर्ढेकर यांना मिळालेला सर्वोच्च पुरस्कार मला मिळाला म्हणत सुधीर रसाळ यांनी दिव्य मराठी डिजिटलशी बोलताना आनंद व्यक्त केला. मराठी भाषेला याच वर्षी अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. त्यात आता सुधीर रसाळ यांच्या माध्यमातून मराठी भाषेचा पुन्हा एकदा देश पातळीवर गौरव करण्यात आला आहे.

साहित्य अकादमीच्या वतीने वार्षिक साहित्य अकादमी पुरस्कार 2024 ची घोषणा करण्यात आली. या पुरस्कारांमध्ये आठ काव्यसंग्रह, तीन कादंबऱ्या, दोन कथासंग्रह, तीन निबंध, तीन साहित्यिक समीक्षा, एक नाटक आणि एका संशोधनात्मक पुस्तकाचा समावेश आहे.

## मंत्री ना. माणिकराव कोकाटे यांना शुभेच्छा



■ **नागपूर :** महाराष्ट्राचे मंत्री ना. माणिकराव कोकाटे यांना शुभेच्छा देताना दैनिक महासागरचे संपादक श्रीकृष्ण चांडक, प्रबंध संपादक पंकज चांडक तथा नाशिक आवृत्तीचे निवासी संपादक प्रा. जयंत महाजन.

# आयएसओ मानकांद्वारे सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो सेवेवर उमटली गुणवत्तेची मोहोर

## गुणवत्ता व्यवस्थापन, व्यावसायिक स्वास्थ्य तथा सुरक्षा व्यवस्थापन आणि पर्यावरण व्यवस्थापन प्रणाली ही सर्व तीन आयएसओ मानांकने प्राप्त करणारी राज्यातील एकमेव मेट्रो सेवा

नवी मुंबई, दि. १८: प्रतिनिधी



गुणवत्ता, पर्यावरण, व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षितता यांचे उत्कृष्ट व्यवस्थापन करण्याच्या निकषावर सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मेट्रो परिचालन सेवेला आयएसओ ९००१, आयएसओ १४००१ आणि आयएसओ ४५००१ मानांकने प्राप्त झाली आहेत. अशा प्रकारची तिनही आयएसओ मानांकने प्राप्त करणारी नवी मुंबई मेट्रो ही राज्यातील एकमेव मेट्रो सेवा ठरली आहे.

नवी मुंबई मेट्रो लाईनला परिचालनाच्या पहिल्याच वर्षी तिन्ही आयएसओ प्रमाणपत्र मिळाली आहे. सदर तिन्ही आयएसओ प्रमाणपत्र मिळालेली ही महाराष्ट्रातील एकमेव मेट्रो लाइन आहे. महा मेट्रो रेल कॉर्पोरेशन मार्फत ब्रिटीश स्टँडर्ड्स इन्स्टिट्यूशन (BSI) द्वारे प्रदान केलेले प्रमाणपत्र श्री. शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना सुपुर्द करण्यात आले.

सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर या मार्गावर १७ नोव्हेंबर २०२३ पासून मेट्रो सेवेचे परिचालन सुरू झाले असून या मेट्रो सेवेला प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. आयएसओ मानांकनाद्वारे सिडको मेट्रोच्या उत्कृष्ट परिचालनासह नवी मुंबईतील नागरिकांना प्रवासाचा सुरक्षित, विश्वासार्ह आणि शाश्वत पर्याय उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांवर शिक्कामोर्तब झाले आहे.

ब्रिटिश मानक संस्था (British Standards Institution - BSI) यांच्या तर्फे देण्यात येणारी तीन आयएसओ मानांकने सिडको मेट्रोला, महा मेट्रो रेले कॉर्पोरेशनच्या माध्यमातून प्राप्त झाली आहेत. आयएसओ ९००१:२०२५ मानांकन हे नवी मुंबई मेट्रोची उच्च दर्जाची सेवा, प्रवाशांचे समाधान आणि परिचालनाची कार्यक्षमता वाढवणे, या निकषावर प्राप्त झाले आहे. आयएसओ १४००१:२०१५ मानांकन हे मेट्रो परिचालनाच्या शाश्वत पद्धतींचा अवलंब करून पर्यावरणावरील परिणाम कमी करणे, संसाधनांची कार्यक्षमता वाढवणे आणि त्या प्रदेशातील पर्यावरणाचे जतन करणे, या निकषावर प्रदान करण्यात आले आहे. आयएसओ ४५००१:२०१८ मानांकन हे मेट्रो परिचालनामध्ये सहभागी कर्मचारी व कामगारांचे आरोग्य आणि सुरक्षितता जपणे, आरोग्य व सुरक्षाविषयक नियमांचे काटेकोरपणे पालन करून कामाच्या ठिकाणी सुरक्षित पर्यावरण सुनिश्चित करणे, या निकषावर प्रदान करण्यात आले आहे.

सिडकोतर्फे महा मेट्रोच्या माध्यमातून नवी मुंबई मार्ग क्र. १ वरील मेट्रोच्या परिचालन व देखभाली संबंधित विविध बाबींकरिता पद्धति आणि नियमांची काटेकोरपणे व सातत्याने अंमलबजावणी करण्यात आली आहे. आयएसओ मानांकनांद्वारे जागतिक मानकांची पूर्तता करण्याच्या आणि मेट्रो सेवेची गुणवत्ता सुधारण्याच्या सिडकोच्या प्रयत्नांवर मोहोर उमटविण्यात आली आहे. सिडकोच्या मेट्रो सेवेला मिळालेले आयएसओ मानांकन हे देशातील मेट्रो प्रणालींकरिता आदर्श ठरणार आहे.

> "आयएसओ मानांकनांद्वारे उच्चतम दर्जाची मेट्रो सेवा पुरविण्यासह गुणवत्ता, शाश्वतता आणि सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सिडकोच्या कटिबद्धतेवर विश्वास दर्शविण्यात आला आहे. नगर विकास आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील सिडकोचे अग्रणी स्थान याद्वारे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे."
>
> **विजय सिंघल**
> **उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

## घाटकोपर-डोंबिवली प्रवासात रिक्षेत विसरलेला बारा लाखांचा सोन्याचा ऐवज महिलेला परत

डोंबिवली, दि. १८ : प्रतिनिधी



घाटकोपर ते डोंबिवली रिक्षेने प्रवास करत असताना येथील एका महिलेचा १२ लाख ९५ हजार रूपयांचा ऐवज असलेली पिशवी डोंबिवलीत उतरल्यावर रिक्षेत विसरली. ही माहिती महिलेने टिळकनगर पोलिसांना दिली. पोलिसांनी घाटकोपर ते डोंबिवली दरम्यानचे रस्त्यावरील सीसीटीव्ही चित्रण तपासून ऐरोली येथे संबंधित रिक्षा चालकाला शोधले. त्यांच्या रिक्षेतील १२ लाख ९५ हजाराची सोन्याची पिशवी ताब्यात घेऊन ती महिलेच्या स्वाधीन केली. या प्रकरणातील तक्रारदार महिला भारती नागराज कर्केरा या मुळच्या कर्नाटक येथील उडपी शहरातील रहिवासी आहेत. त्या घाटकोपर येथे आपल्या नातेवाईकांकडे आल्या होत्या. तेथून त्या डोंबिवलीत येणार होत्या. गेल्या चार दिवसापूर्वी तक्रारदार महिलेला डोंबिवलीत यायचे होते. त्यांच्या जवळ सोन्याचा मणिहार, सोनसाखळी, बांगड्या, अंगठ्या, रिंगा असा एकूण १२ लाख ९५ हजाराचा ऐवज होता. एवढा किमती ऐवज घेऊन लोकलने प्रवास करण्यापेक्षा सुरक्षित प्रवास म्हणून तक्रारदार महिलेने घाटकोपर ते डोंबिवली रिक्षेने प्रवास करण्याचा निर्णय घेतला. गेल्या शुक्रवारी त्या घाटकोपर मधील चिरागनगर येथून रिक्षेने डोंबिवलीत गोग्रासवाडी भागात आल्या. रिक्षेतून उतरल्यानंतर त्यांनी रिक्षेतील आपले सर्व सामान उतरून घेतले. त्यांची सोन्याचा ऐवज असलेली पिशवी रिक्षेत विसरली. घरी गेल्यानंतर तक्रारदार महिलेच्या हा प्रकार लक्षात आला. त्यांनी तातडीने टिळकनगर पोलीस ठाणे गाठले आणि घडला प्रकार वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार कदम यांना सांगितला.

पोलिसांचे एक पथक तातडीने तपासाला लागले. घाटकोपर ते डोंबिवली ज्या रस्त्याने रिक्षा आली. त्या रस्त्यावरील विविध भागातील सीसीटीव्ही चित्रण पोलिसांनी तपासले. या चित्रणातून पोलिसांनी रिक्षा चालकाचा वाहन क्रमांक आणि त्या आधारे त्या रिक्षा चालकाची ओळख पटवली. त्यानंतर त्याचा शोध सुरू केला. दिवसभराच्या शोधात पोलिसांनी भारती कर्केरा यांना डोंबिवलीत येथे सोडणारा रिक्षा चालक ऐरोली चिंचपाडा भागातून ताब्यात घेतला.

## भिवंडीत रेल्वेची संरक्षण भिंत उभारताना झालेल्या अपघातात कामगाराचा मृत्यू

भिवंडी, दि. १८ : प्रतिनिधी

शहरालगतच्या राहनाळ गावाच्या हद्दीतील अंजुरफाटा येथे वसई दिवा या रेल्वे लाईनच्या चौपदरी करणाचे काम सुरू असून त्यासाठी खोल खड्ड्यात काँक्रिटची संरक्षक भिंत उभारण्याचे काम सुरू असून त्याठिकाणी सोमवारी सायंकाळी झालेल्या अपघातात एका कामगाराचा काँक्रिट भिंती खाली दबून दुर्दैवी मृत्यू झाला आहे.कमल्या जयराज वालकुभाई वय २२ असे मृत्यू झालेल्या दुर्दैवी कामगाराचे नाव आहे.मिळालेल्या माहितीनुसार रेल्वेचे हे काम टाटा प्रोजेक्ट लिमिटेड कंपनीच्या वतीने माया एंटरप्रायजेस ही कंपनी करीत असून काँक्रिट ची संरक्षक भिंत उभारली जात असताना काँक्रिट भीम क्रेनच्या साहाय्याने खड्ड्यात उतरवले जातात.ते उतरवले जात असताना एका काँक्रिट भीम चा काही भाग क्र्याक झाल्याने क्रेन मधून निसटला.त्यावेळी खाली खड्ड्यात उभ्या असलेल्या कमल्या जयराज वालकुभाई यांच्या अंगावर पडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला आहे.

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नारपोली पोलिस घटनास्थळी दाखल होत त्यांनी कामगारांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनसाठी शासकीय रुग्णालयात रवाना केला आहे.या प्रकरणी नारपोली पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली असून अपघाताची चौकशी करून त्यास जबाबदार असलेल्या विरोधात गुन्हा दाखल केला जाईल अशी माहिती पोलिस सूत्रांनी दिली आहे.

## लोकराज्य दुर्मिळ अंकांचे डिजिटायजेशन करावे-प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

नागपूर, दि. १८ : प्रतिनिधी

'लोकराज्य' चे दुर्मिळ अंक हे माहितीचा अमूल्य ठेवा असून त्याचे जतन व संवर्धन होण्याकरिता या अंकांचे डिजिटायजेशन करण्याच्या सूचना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी विधानभवन परिसरातील लोकराज्य दुर्मिळ अंक प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी केले. नागपूर-अमरावती विभाग संचालक कार्यालयाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनास मंत्री, आमदार व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी भेट देऊन राज्याच्या गौरवशाली परंपरेच्या माहितीचा ठेवा असणाऱ्या या प्रदर्शनाचे कौतुक केले.

उद्घाटन प्रसंगी नागपूर-अमरावती विभागाचे संचालक (माहिती) डॉ. गणेश मुळे, लोकराज्यचे संपादक तथा संचालक (माहिती)(वृत्त व जनसंपर्क) दयानंद कांबळे, छत्रपती संभाजीनगर विभागाचे संचालक (माहिती) किशोर गांगुर्डे, वरिष्ठ पत्रकार धर्मेंद्र जोरे, नागपूर जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार, वर्धा जिल्हा माहिती अधिकारी रवि गिते, चंद्रपूर जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर आदी यावेळी उपस्थित होते. महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी प्रदर्शनाची पाहणी



केली. तसेच या दुर्मिळ अंकांचा ठेवा अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी डिजिटायझेशन आणि अन्य आधुनिक पद्धतीचा उपयोग करण्याच्या सूचना यावेळी दिल्या. दुर्मिळ अंकांच्या मांडणीचे कौतुकही त्यांनी केले.

**प्रदर्शनात वैविध्यपूर्ण माहितीचा ठेवा असणारे दुर्मिळ अंक**

1964 पासूनचे अंक येथे प्रदर्शित करण्यात आले आहेत. संत ज्ञानेश्वर आणि कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त प्रकाशित अंक, मराठी संगीत रंगभूमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, यशवंतराव चव्हाण, मराठवाडा विकास व सांस्कृतिक अंक, स्वातंत्र्यदिन विशेषांकासह महाराष्ट्र राज्यातील महान व्यक्तीमत्वे, सांस्कृतिक, भौगोलिक, आर्थिक असा वैविध्यपूर्ण ठेवा तसेच शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती असणारे 150 अंक या ठिकाणी प्रदर्शित करण्यात आले आहेत.

**मान्यवरांच्या भेटी व सेल्फी स्टँडवर छायाचित्रे**

विधीमंडळ अधिवेशनाचा पहिलाच दिवस असल्याने विधानभवन परिसरात विधानसभा व विधानपरिषद सदस्यांची लगबग होती. वाटेतच लोकराज्य दुर्मिळ अंकांचे आकर्षक प्रदर्शन दिसताच त्यांनी प्रदर्शनास भेट दिली. यावेळी पाहणी करून आपल्या प्रतिक्रियाही नोंदविल्या. याठिकाणी उभारण्यात आलेल्या सेल्फी स्टँडवर पोज देऊन छायाचित्रेही काढून घेतली.

भेट देणाऱ्यांमध्ये मंत्री, ॲड. आशिष जायस्वाल, आमदार सर्वश्री प्रविण दरेकर, चित्रा वाघ, बाबुसिंग राठोड, अबु आझमी, श्रीजया चव्हाण, सुहास बाबर, देवराव भोंगळे यांचा समावेश आहे. गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बालसिंग चहल, वनविभागाचे उपसचिव विवेक होशिंग, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे अवर सचिव धिरज अभंग यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही प्रदर्शनास भेट दिली. अधिवेशन कालावधीमध्ये दररोज सकाळी 9 वाजता पासून हे प्रदर्शन पाहण्यास उपलब्ध राहणार आहे.

## संक्षिप्त

### भिवंडीत उत्तर भारतीय सेवा समिती आयोजित श्रीमद् भागवत कथा

भिवंडी, दि. १८ : प्रतिनिधी

भिवंडीत आग्रारोड कणेरी येथील श्रीराम कंपाऊंड मध्ये उत्तर भारतीय सेवा समितीच्या वतीने श्रीमद भागवत कथा सप्ताह आयोजित केला आहे. या कार्यक्रमाची सुरुवात रविवारी सायंकाळी कलश यात्रेने झाली. श्रीमद भागवत कथाचे प्रवचन सोमवारी १६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सुरु झाले. रविवार २२ नोव्हेंबर २०२४ पर्यंत दररोज या ठिकाणी सायंकाळी ६ ते १० वाजेपर्यंत कथा प्रवचन आयोजित केले आहे.या कार्यक्रमाच्या निमित्ताने काल रविवारी १११ महिलांनी वऱ्हाळा तलावातून पाण्याचे कलश कार्यक्रमाच्या ठिकाणी आणले. याप्रसंगी शोभायात्रेत सुमारे ८०० स्त्री -पुरुष सामील झाले होते.श्रीमद भागवत कथेसाठी मंडप उभारणीसाठी वैदिक मंत्रोच्चाराने भूमिपूजनाचे आयोजन करण्यात आले.त्यानंतर भगवंताच्या प्रतिमेची स्थापना करून कार्यक्रमास सुरुवात झाली.प्रत्येक दिवशी विविध विषयांवर प्रबोधन करण्यात येणार आहे.भागवत महात्म्याची चर्चा, मंगलाचरण तथा शुकदेव जन्म व परीक्षित चरित्र, शिवचरित्र, श्री कृष्ण जन्मोत्सव, श्रीकृष्ण लीला आणि त्यांच्या चरित्रावर आधारित विषयांवर विवेचन आणि उपदेश सांगण्यात येणार आहे.भिवंडीत या संस्थेच्या वतीने प्रथमच या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. उत्तर भारतीय सेवा समितीचे अध्यक्ष जितेंद्र तिवारी,कार्याध्यक्ष शिवचंद केशरवाणी, उपाध्यक्ष राकेश केशरवाणी आदी संस्थेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते कथा सप्ताह यशस्वी करण्याकरिता विशेष मेहनत करीत आहेत.

### पिस्तूल बाळगणारे सराईत अटकेत

पुणे, दि. १८ : प्रतिनिधी

पिस्तूल बाळगल्याप्रकरणी सिंहगड रस्ता पोलिसांनी दोन तरुणांना अटक केली. त्याच्याकडून दोन पिस्तुले, तसेच काडतुसे जप्त करण्यात आली. साजन विनोद शहा (वय १९), कुणाल शिवाजी पुरी (वय १८, दोघे रा. धायरी) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. पोलीस कर्मचारी पुरुषोत्तम गुन्ला यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. शहा आणि पुरी यांच्याविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल आहेत.

रविवारी रात्री नांदेड सिटी पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी पुरुषोत्तम गुन्ला धायरीतील अंबाईदरा परिसरात गस्त घालत होते. शहा आणि पुरी यांच्याकडे पिस्तूल असल्याची माहिती त्यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून दोघांना पकडले. त्यांची झडती घेण्यात आली. तेव्हा त्यांच्याकडे देशी बनावटीचे पिस्तूल सापडले. दोघांकडून पिस्तूल आणि काडतूल जप्त करण्यात आले. दोघांनी पिस्तूल का बाळगले, यादृष्टीने तपास करण्यात येत आहे. सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव तपास करत आहेत.

### भिवंडीच्या स्वामी गंभीरानंद आश्रमात दत्तजयंती निमित्त संत संमेलनाचे आयोजन

भिवंडी, दि. १८ : प्रतिनिधी

श्रीमद्भगवद्गीता जयंती महोत्सवानिमित्त भिवंडीतील कामतघर जुनी ताडाळी-ठाकरा पाडा रोड पाईप लाईन येथील स्वामी श्री गंभीरानंद आश्रमात १८ दिवसीय गीता प्रवचन व १८ कुंडी गीता हवन यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाच्या समारोपाच्या दिवशी दत्त जयंती संत संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. स्वामी चिदंबरानंद सरस्वतीजी महाराज यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संत संमेलनाचे अध्यक्षस्थान स्वामी गंभीरानंद सरस्वतीजी महाराज यांच्या उपस्थितीत झाले. स्वामी परमेश्वरानंद गिरीजी महाराज यांच्या हस्ते संत संमेलन यशस्वीपणे पार पडले.गीता ज्ञानयज्ञ आणि संत संमेलनात काशी, वृंदावन, हरिद्वार, ऋषिकेश आणि मुंबई इत्यादी पवित्र भागातील संत आणि विद्वान सहभागी झाले होते.ओरिसाहून आलेल्या अनुराग चैतन्यजी महाराज यांनी आश्रमातील भगवान वेदव्यास सिद्धपीठात श्रीमद्भगवद्गीतेच्या १८ अध्यायांचा गेल्या १८ दिवसांपासून नियमित अभ्यास केला. जे पूर्णपणे मोफत होते.गीता जयंतीची सांगता दत्त जयंतीनिमित्त या संत संमेलनाने झाली.यावेळी स्वामी शंकरानंद सरस्वतीजी महाराज, मुंबईहून आलेले अद्वैतानंद गिरीजी महाराज, आत्मानंद सरस्वतीजी महाराज, कैवल्यानंद गिरीजी महाराज, काशीहून आलेले अवधूतानंद सरस्वतीजी महाराज, ओरिसाहून आलेले अनुराग चैतन्यजी महाराज, नारायण पुण्यराम महाराज, नारायण पुण्यराम महाराज, पराक्रमी महाराज, काशीहून आलेले अवधूतानंद सरस्वतीजी महाराज आदी उपस्थित होते.गिरीजी महाराज, स्वामी श्री विद्यानंदजी महाराज, विवेकानंदजी महाराज, पुरुषोत्तमानंदजी महाराज, अमृतानंदजी महाराज, विश्वेश्वर चैतन्य, आशुतोष चैतन्य आणि वृंदावनातून आलेले रमेशानंद महाराज आणि इतर अनेक संतांनी गीतेवर प्रवचन दिले.आश्रमाचे प्रेमस्वरूप चैतन्यजी महाराज म्हणाले की, कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्वामी गंभीरानंद आश्रम विश्वस्त मंडळ, आश्रम व्यवस्था समिती, मैत्रेयी महिला परिषद आणि उज्ज्वल भारत विद्यार्थी संघ, माँ भारती विद्यार्थी संघ यांनी परिश्रम घेतले.

# वसईत नाताळ सणाची लगबग

## नाताळ गोठ्याचे काम शेवटच्या टप्प्यात

## प्रभू येशूचा जन्मदिवस साजरा करण्यासाठी वसईकर सज्ज

वसई, दि. १८ : प्रतिनिधी



'नातालीस' या लॅटिन शब्दापासून नाताळ या शब्दाची निर्मिती झालेली आहे. नाताळ म्हणजे प्रभू येशूचा जन्म साजरा करण्याचा दिवस होय. डिसेंबर महिन्याला सुरुवात झाली की वसईत सर्वत्र नाताळ हा सण साजरा करण्याची लगबग पहावयास मिळते. येशूचा जन्म गोठ्यात झाला म्हणून घरोघरी तसेच सार्वजनिक पद्धतीने नाताळ गोठे बनवण्याची जोरदार तयारी होताना दिसून येत आहे. प्रभू येशूचे स्वागत करण्यासाठी घरांना रंगरंगोटी, विद्युत रोषणाई व सुंदर सजावट करण्यासाठी ख्रिश्चन बांधवांची लगबग सुरू आहे.


मीरा भाईंदर आणि वसईसह पालघर जिल्ह्यात ख्रिश्चन बांधव मोठ्या संख्येने असल्यामुळे नाताळ हा सण साजरा करण्यासाठी आवश्यक साहित्य बाजारपेठांमध्ये उपलब्ध असून त्यात आकाश कंदील,लाइटिंग, ख्रिसमस ट्री, सांताबाबाचे मुखवटे व टोपी, देव देवतांच्या मुर्त्या, लहान मुलांसाठी खेळणी व नाताळ गोठे बनवण्यासाठी लागणारे सर्व साहित्य आहे. नाताळ गोठा म्हणजेच येशूच्या जन्माचे देखावे साकारणे होय. त्यात बेथलेम गाव,डोंगर, नद्या,गवताळ प्रदेश, लाकडी गोठा,मध्यभागी बाळ येशू व डोक्यावर रंगवण्यात आलेल्या तारा, एका बाजूला मदर मेरी दुसऱ्या बाजूला जोसेफ व कोपऱ्यात बसलेली गाय, मेंढरासोबत उभे असलेले मेंढपाळ व भेट वस्तु घेऊन आलेले राजे असें दृश्य साकारले जाते.

वसईत नाताळ गोठ्यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यावर भर दिला जात असून त्यात पर्यावरण, स्त्रियांची सुरक्षा, मोबाईलचे दुष्परिणाम, व्यसनाधीनता, वसईची संस्कृती, सांस्कृतिक ठेवा, कौटुंबिक विषय व ग्लोबल वार्मिंग असे महत्त्वपूर्ण विषय मांडले जात आहेत. वसईत बनवलेल्या मुर्त्या व मेणबत्या लोकप्रिय असल्यामुळे महाराष्ट्रात व इतर राज्यात त्यांची मोठी मागणी आहे. त्यामुळे कारागिरांना या माध्यमातून मोठे आर्थिक पाठबळ मिळते. नाताळ या सणावर पाश्चिमात्य संस्कृतीचा कितीही प्रभाव असला तरीही वसईत भारतीय पद्धतीने म्हणजेच स्थानिक पद्धतीने साजरा करण्याची परंपरा आहे. वसईकरांची ख्रिसमस व नाताळ गोठ्यांची तयारी अंतिम टप्प्यात आलेली असून सर्वत्र उत्साह,आनंद व जोशपूर्ण वातावरण पहावयास मिळत आहे.

नाताळ सणासाठी घरोघरी अगदी महाराष्ट्रीयन पारंपारिक पदार्थांसह केक बनवण्यात महिला व्यस्त झाल्या आहेत. तसेच नाताळच्या स्वागतासाठी चर्चही सज्ज झाली आहेत. नाताळनिमित्ताने प्रत्येक चर्चमध्ये धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित केले जात असल्याने त्याचीही तयारी होताना दिसत आहे.

> आम्ही घराला रंगरंगोटी, लायटिंग, ख्रिसमस ट्री, येशूच्या जन्मदिवसाचा देखावा केलेला आहे. त्यासोबतच पारंपरिक अन्नपदार्थ व मिठाई ही तयार करीत आहोत. प्रभू येशूच्या नामाचे स्मरण करून मनःशांतीसाठी चर्च मध्ये जाऊन प्रार्थना करीत आहोत.
>
> **- वंदना परेरा, स्थानिक रहिवाशी, बंगली**

## दोन वेगवेगळ्या कारवाईत 11 लाखांची मॅफेड्रॉन पावडर आणि नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या औषधी बॉटल्स जप्त



भिवंडी, दि. १८ : प्रतिनिधी

ठाणे नार्कोटिक्स विभागाने दोन वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या कारवाईत दोन नशेच्या सौदागरांना वेगवेगळ्या ठिकणांहून ताब्यात घेऊन बेड्या ठोकल्या आहेत.मोहम्मद अब्दुल रेहमान सय्यद उर्फ नॉडी (रा. खोणीगांव,कल्याण) व नवाज शमशद्दीन पावले (रा. मुंब्रा, ठाणे) अशी अटक केलेल्या नशेच्या सौदागरांची नावे आहेत.दरम्यान त्यांच्याकडून मॅफेड्रॉन पावडर आणि नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या कोडियनयुक्त कफ सिरपच्या औषधी बॉटल्स असा एकूण तब्बल ११ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार,११ डिसेंबर रोजी ठाणे नार्कोटिक्स विभागाला गुप्त बातमीदारा मार्फत अंमली पदार्थाची विक्रीकरिता वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली होती.त्यानुषंगाने ठाणे गुन्हे शाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल मस्के,सपोनि निलेश मोरे, जगदीश गावित, पोउपनि दिपेश किणी,नितीन भोसले, राजेंद्र निकम, पोह हरिश तावडे,अमोल देसाई, अभिजित मोरे,विक्रांत पालांडे, हेमंत महाले,महेश साबळे,संदीप भांगरे,प्रशांत राणे, मपोह शिल्पा कसबे, पोना अनुप राक्षे आदि पोलिस पथकाने खर्डीकडून दिव्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर सापळा रचून मोहम्मद उर्फ नॉडी यास ताब्यात घेऊन त्याची झाडझडती घेतली असता त्याने विक्रीसाठी ६०.३ ग्रॅम वजनाची मॅफेड्रॉन पावडर नेत असल्याचे तपासात समोर आल्याने त्याच्यावर मुंब्रा पोलिस ठाण्यात एनडीपीएस कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात येवून अटक केली असून १६ डिसेंबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.तर अशाच प्रकारे नवाज हा डायघर येथे गणेश खिंडीमार्गे कल्याण फाट्याकडे जाणाऱ्या रोडवरील वडा पाव सेंटर जवळ कोडीनयुक्त कफ सिरप औषधाच्या एकूण ७२० बॉटल्स विक्रीच्या उद्देशाने घेऊन आल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्यावर शिळ डायघर पोलिस ठाण्यात एनडीपीएस कलमासह औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० च्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून बेड्या ठोकल्या असून त्यास १७ डिसेंबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.तर या दोन्ही नशेच्या सौदागरांकडे सदर नशेचे साधन कोठून आले ? त्यांच्याकडे आणखी नशेचा साठा आहे का ? याबाबत नार्कोटिक्स विभाग तपास करीत आहे.

# नव्या सरकारचे स्वागत करू या...!

महाराष्ट्रात २० डिसेंबरला विधानसभेच्या २८८ जागांसाठी मतदान झाले, २३ डिसेंबरला झालेल्या मतमोजणीत महायुतीचे २३० आमदार विजयी झाले. दि. ५ डिसेंबर रोजी देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून आणि एकनाथ शिंदे व अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. विधिमंडळाच्या नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्व संध्येला म्हणजेच १५ डिसेंबर रोजी राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. ३३ आमदारांनी कॅबिनेट मंत्री व ६ जणांनी राज्यमंत्री म्हणून शपथ घेतली. सरकार स्थापनेला खूपच विलंब झाला अशी टीका झाली. जनतेने महायुतीला प्रचंड बहुमत दिल्यानंतर मंत्रिमंडळ आणि खातेवाटप ठरवायला एवढा वेळ कशासाठी, हे समजले नाही. जुने आणि नवे चेहरे, जातीनिहाय आणि प्रादेशिक समतोल साधण्यासाठी वेळ लागला असावा. सरकारमध्ये जवळपास निम्मे मंत्री हे नवीन चेहऱ्यांचे आहेत. पण आता मंत्रिमंडळ विस्तारानंतर महायुतीत जे नैराश्य नाट्य चालू आहे ते मात्र महाराष्ट्राला भूषणावह नाही.

------------------

महायुतीमधील भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तीनही पक्षांत ज्यांना मंत्री होता आले नाही अशा नेत्यांची घालमेल होते आहे. आपण मंत्री झालो नाही, हे त्यांना सहन झालेले नाही. कोणी चिडून बोलत आहे, कुणी पक्षाच्या नेत्यावर नाराजी प्रकट करीत आहे, कुणी नागपूरच्या अधिवेशनाला न थांबता सरळ मतदारसंघातील आपल्या घरी निघून गेले, तर कुणी टीव्हीच्या कॅमेरापुढे आपल्या मनातील खदखद व्यक्त करताना दिसत आहे.

राज्यात यशवंतराव चव्हाणांपासून आज देवेंद्र फडणवीसांपर्यंत तीसपेक्षा जास्त सरकारे सत्तेवर आली. देवेंद्र यांनी तर मुख्यमंत्रीपदाची तिसऱ्यांदा शपथ घेतली. शरद पवार, वसंतदादा पाटील यांनीही चार-चार वेळा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली होती. पण गेल्या सहा दशकांत सरकार स्थापनेनंतर आपण मंत्री झालो नाही किंवा आपला पत्ता कापला गेला म्हणून कुणी एवढा थयथयाट केला नव्हता.

आमदार म्हणून निवडून आलेल्या प्रत्येकाला मंत्री होण्याची महत्त्वाकांक्षा असणे यात गैर काही नाही, पण गेल्या सरकारमध्ये आपण मंत्री होतो म्हणून नव्या सरकारमधेही मंत्रीपद मिळालेच पाहिजे हा हट्ट आता वाढत चालला आहे. आमदार म्हणून निवडून आल्यावर मंत्रीपद मिळाले पाहिजे, अशी महत्त्वाकांक्षा बळावत चालली आहे.

टीव्हीच्या कॅमेरासमोर बोलताना, आपल्याला मतदारसंघाच्या विकासासाठी मंत्रीपद पाहिजे असे इच्छुक सांगत असतात. पण त्याचबरोबर त्याला मंत्री का केले व मला का केले नाही, असा प्रश्न विचारत असतात. आता कुणी थांबायला तयार नाही, हे असंतोषाचे प्रमुख कारण आहे. काँग्रेसने महाराष्ट्रावर सर्वाधिक काळ सत्ता उपभोगली आहे.

सर्वाधिक मुख्यमंत्री काँग्रेसने दिले आहेत. त्या काळात मुख्यमंत्री व सरकारमधील मंत्री यांची नावे दिल्लीहून काँग्रेस श्रेष्ठी पाठवत होते. आता काळ बदलला आहे. आता भाजपा व मित्रपक्षांच्या मंत्र्यांच्या नावावर भाजपा हायकमांडचे शिक्कामोर्तब होणे गरजचे असते. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात मित्रपक्षांच्या उमेदवारांना भाजपाने आक्षेप घेतल्यावर मित्रपक्षांना त्यांचे उमेदवार बदलावे लागले होते.

आता नव्या सरकारमध्ये मंत्री कोण ठरवताना भाजपा हायकमांडची एनओसी असल्याशिवाय नावे निश्चित होत नाहीत.



मग आपल्याला मंत्रीपद मिळाले नाही म्हणून वगळलेले व डावललेले नेते का भोकाड पसरत आहेत? ज्यांना वगळले ते तूर्त काहीही करू शकत नाहीत, जे मिळवायचे ते भाजपा श्रेष्ठींच्या मजीर्नुसारच मिळणार आहे, याचे भान ठेवले पाहिजे.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारमधील बारा मंत्र्यांना देवेंद्र फडणवीस यांच्या नव्या सरकारमध्ये डच्चू मिळाला आहे. हे १२ जण असंतुष्ट आहेत हे लपून राहिलेले नाही. सर्वात जखमी झाले ते छगन भुजबळ. आजवर ते सात वेळा आमदार म्हणून निवडून आले. (राष्ट्रवादी काँग्रेस, येवला, नाशिक) मंत्रीपदे आली व गेली, पण भुजबळ कधीच संपला नाही. मला डावलल्याने मला काही फरक पडणार नाही, जरांगे पाटलांना अंगावर घेतलं, त्याचं बक्षीस मिळालं ना. मी सामान्य कार्यकर्ता. मला डावललं काय नि फेकलं काय, मला अजित पवारांशी बोलण्याची गरज वाटली नाही. मी म्हणजे काय खेळणं आहे का? माझं मंत्रीपद कुणी नाकारलं हे शोधावं लागेल. इति भुजबळ.

**इंडिया कॉलिंग**
**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

भुजबळांचा संताप प्रकट झाल्यावर सोशल मीडियावरून धुवांधार प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. अगोदर बाळासाहेबांना सोडले, नंतर काँग्रेस सोडून शरद पवारांची साथ घेतली, नंतर त्यांनाही सोडले. देवेंद्र फडणवीसांची २०१४ ते २०१९ ही कारकीर्द वगळता भुजबळ १९९९ पासून राज्यात सरकारमध्ये आहेत. मनी लॉड्रिंग प्रकरणात ते २६ महिने जेलमध्ये होते. समता परिषद व ओबीसी समाज हे त्यांच्याकडे प्रभावी हत्यार आहे.

मंडल आयोगाच्या मुद्द्यावरून त्यांनी बाळासाहेबांची शिवसेना सोडली तसेच मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्यास उघडपणे त्यांनी विरोध केला. विधानसभा निवडणुकीत नांदगावमधून ते त्यांचा पुतण्या समीरची बंडखोरी रोखू शकले नाहीत. शिवसेनेत असताना नेते, महापौर, आमदार, मंत्री. राष्ट्रवादीत असताना प्रदेशाध्यक्ष, गृहमंत्री, उपमुख्यमंत्री अशी सारी ताकदवान पदे त्यांनी उपभोगली. अजितदादांच्या पक्षातही ते नंबर दोन होते. आता त्यांना म्हणे राज्यसभेवर पाठवणार, अशा चर्चेला उधाण आले आहे.

भाजपाचे दिग्गज नेते सुधीर मुनगंटीवार (भाजपा, बल्लारपूर) यांना सरकारमधून वगळल्याने ते खूप अस्वस्थ आहेत. विद्यार्थीदशेपासून ते संघ स्वयंसेवक, १९९५ पासून भाजपामध्ये सक्रिय, संघटनेत विविध पदांवर काम केले, पक्षाचे प्रदेशाध्यक्षही झाले. मला मंत्रीपद देणार नाही, असे कुणीही सांगितले नव्हते. मंत्रीपद नाकारण्याचं कारण काय, याचा मी विचार करतोय, मी नाराज नाही. मनाविरुद्ध घडत असताना जो काम करतो तो कार्यकर्ता, असे ते सांगत आहेत.

रवींद्र चव्हाण (भाजपा, डोंबिवली) यांना मंत्रीपद न मिळाल्याने अनेकांना आश्चर्य वाटले. देवेंद्र फडणवीसांचे ते विश्वासू. तीन वेळा आमदार म्हणून निवडून आले. सार्वजनिक बांधकाम खाते त्यांनी संभाळले. एकनाथ शिंदेंचे वर्चस्व असलेल्या ठाणे जिल्ह्यात पक्षाचे काम त्यांनी निष्ठेने केले. विशेष म्हणजे त्यांनी किंचितही नाराजी व्यक्त केली नाही. चंद्रशेखर बावनकुळे यांना मंत्रीपद दिल्याने पक्षाचे प्रदेशाध्यक्षपद चव्हाण यांना दिले जाईल अशी चर्चा आहे.

विजय शिवतारे कमालीचे संतप्त झाले. ते म्हणाले, मंत्रीपद महत्त्वाचं नाही, पण मला वाईट वागणूक मिळाली, याचे जास्त वाईट वाटले. तीनही नेते साधे भेटायला तयार नाहीत. आम्ही काही गुलाम नाही... अडीच वर्षांनी मंत्रीपद मिळालं तरी घेणार नाही.

मंत्रीपद न मिळाल्याने नरेंद्र भोंडेकर (शिवसेना, भंडारा) यांनी पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा दिला. त्यावर स्टंट करू नका, तुमचेच नुकसान होईल, अशा पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाल्यात. दीपक केसरकर (शिवसेना, सावंतवाडी) चार वेळा आमदार झालेत. एकनाथ शिंदे यांच्या निकटचे बंडानंतर शिंदे गटाची बाजू मांडण्याचे काम करीत असत. आपल्याला का वगळले याचे त्यांनीच आत्मपरीक्षण करावे असे ऐकायला मिळाले.

तानाजी सावंत (शिवसेना, परांडा) हे बडे प्रस्थ म्हणून ओळखले जातात. शिक्षणसंस्था व व्यवसायाची मालमत्ता २३५ कोटींच्या वर आहे. (अगोदरच्या कारकिर्दीत) मंत्रिमंडळाच्या बैठकीत राष्ट्रवादीच्या शेजारी बसलो की, बाहेर आल्यावर उलटी होते, असे वक्तव्य त्यांनी केले होते. वैचारिक मतभेद म्हणून आपण बोललो असा त्यांनी खुलासा केला होता. अब्दुल सत्तार हे (सिल्लोड) शिवसेनेच्या कोट्यातील एकमेव मुस्लीम मंत्री होते, पण त्यांना नव्या सरकारमध्ये दूर सारले. सत्तार हे अनेकदा वादग्रस्त ठरलेत. हिंदू संघटना त्यांच्या विरोधात आहेत.

विजयकुमार गावित (भाजपा, नंदुरबार), दिलीप वळसे-पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस, आंबेगाव), सुरेश खाडे (भाजपा, मिरज), धर्मरावबाबा अत्राम (राष्ट्रवादी, अहेरी), अनिल पाटील (राष्ट्रवादी, अमळनेर) या माजी मंत्र्यांनाही नव्या सरकारमध्ये स्थान मिळालेले नाही. संजय कुटे (भाजपा, जामोद, बुलढाणा) म्हणाले - विरोधक हरून जिंकले व आपण जिंकून हरलो. सदाभाऊ खोत म्हणाले - आम्ही प्रामाणिकपणे तीनही पक्षांचे शेत नांगरून दिले. पण ज्यावेळी आमचे शेत नांगरण्याची पाळी आली, तेव्हा आमच्या शेतात बैलाला धारही मारू दिली नाही. गोपीचंद पडळकर, डॉ. राहुल आहेर अशी नाराजांची यादी बरीच आहे. नाराजी विसरून सरकारला साथ देणे यातच त्यांचे व त्यांच्या मतदारसंघाचे हित आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्या नव्या सरकारमध्ये नितेश राणे (कणकवली), जयकुमार गोरे (माण), शिवेंद्रराजे भोसले (सातारा), संजय सावकारे (भुसावळ), संजय शिरसाट (औरंगाबाद, पश्चिम), प्रताप सरनाईक (माजिवडा), नरहरी झिरवाळ (दिंडोरी), माणिकराव कोकाटे (सिन्नर), भरतशेठ गोगावले (महाड), आकाश फुंडकर (खामगाव), मकरंद जाधव पाटील (वाई), प्रकाश आबीटकर (राधानगरी), बाबासाहेब पाटील (अहमदपूर), पंकज भोयर (वर्धा), आशीष जयस्वाल (रामटेक), माधुरी मिसाळ (पर्वती), मेघना बोर्डीकर (जिंतूर), इंद्रनील नाईक (पुसद), योगेश कदम (दापोली), अशोक उइके (राळेगाव) अशी सर्व नवीन टीम आहे.

महायुतीमधील सर्वांनी प्रोत्साहन देऊन त्यांच्याकडून चांगल्या कामांची अपेक्षा केली पाहिजे. पण मंत्रीपद मिळाले नाही म्हणून टिचकी वाजवत राहणे हे राजकीय परिपक्वतेचे लक्षण नव्हे.

●●●●●●●●●

# पेन्शन हक्कच शासनाने हिरावले?

भारतातील पेन्शनधारकांसाठी १७ डिसेंबर हा महत्त्वाचा दिवस आहे. सन १९८२मध्ये याच दिवशी सर्वोच्च न्यायालयाने निवृत्त अधिकारी व पेन्शनधारकांना सन्मान आणि शालीनतेची हमी देणारा ऐतिहासिक निर्णय दिला होता. आज मात्र पेन्शन हक्कच शासनाने हिरावून घेतले आहे. ऐन तारुण्यात शासनाची चाकरी करायची आणि निवृत्तीनंतर ऐन म्हातारपणात, मरतकाळात हातपाय थकल्यावर हाडाची काडे करत जीवन जगायचे. हा कुठला न्याय? हा कुटील डाव नाही का?

-----------------

नोकरी करणारी व्यक्ती कधी ना कधी तरी निवृत्त होणारी असते. अनेक जण वेगळ्या वाटा धुंडाळण्यासाठी मधेच नोकरी सोडतात. मात्र, काही जणांना आयुष्याच्या संध्याकाळपर्यंतही नोकरी हवीहवीशी वाटू शकते. मात्र, आपली नोकरी संपली की अनेकांना आपले हक्क आणि अधिकार माहित नसतात. आपण जाणून घेऊयात असेच काही सरकारी निवृत्ती वेतनधारकांचे हक्क आणि अधिकार

सेवानिवृत्ती लाभांचे भागः खरे तर निवृत्ती वेतन लाभ हे निवृत्त सरकारी अधिकाऱ्याला सतत उत्पन्न आणि सुरक्षित जीवनाची खात्री देतात. त्यामुळे निवृत्त सरकारी अधिकारी सुस्थितीत आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र जगू शकतात. त्यासाठीच पेन्शनच्या तरतुदी आहेत. सेवानिवृत्तीच्या फायद्यांमध्ये मुख्यत्वे कर्मचाऱ्यांच्या रजेचे रोखीकरण, सेवानिवृत्ती ग्रॅच्युइटी आणि त्यांच्या सेवाकाळात त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात योगदान देत असलेल्या रकमेचा समावेश होतो. ही सर्व रक्कम एकत्र केल्यावर त्यांना चांगलाच लाभ मिळतो. ही रक्कम कर्मचाऱ्यांच्या निवृत्त जीवनाचा आर्थिक आधार असते. त्यामुळे त्यांना इतरांवर अवलंबून राहण्याची गरज भासत नाही.

**इतर फायदे :** सेवानिवृत्ती लाभांव्यतिरिक्त सेवानिवृत्त सरकारी अधिकारी देखील निवृत्तीवेतन लाभांसाठी पात्र आहेत. हे फायदे त्यांना आर्थिक बाबतीत कोणत्याही अडचणींशिवाय शांततापूर्ण सेवानिवृत्त जीवन जगू देतात.

ेवानिवृत्त सरकारी अधिका?यांसाठी त्यांच्या नोकरीच्या शेवटी उपलब्ध असलेले विविध प्रकारचे निवृत्तीवेतन म्हणजे सेवानिवृत्ती, स्वेच्छानिवृत्ती निवृत्तीवेतन, अनुकंपा भत्ते, कौटुंबिक निवृत्तीवेतन, नुकसान भरपाई पेन्शन आणि असाधारण निवृत्तीवेतनाचा समावेश होतो.

**निवृत्ती वेतन योजना :** जे सेवानिवृत्त सरकारी अधिकारी ६० वर्षांचे होईपर्यंत सेवा करतात त्यांच्यासाठी निवृत्ती वेतन योजना लागू आहे. २० वर्षांचा कालावधी पूर्ण केल्यानंतर केवळ तीन महिन्यांनी सेवानिवृत्त होऊ इच्छिणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना ऐच्छिक निवृत्ती वेतन दिले जाते. असाधारण निवृत्तीवेतन योजना ही आहे. यात निवृत्त सरकारी कर्मचाऱ्यांना जे भिन्न-अपंग किंवा शारीरिकदृष्ट्या विकलांग आहेत किंवा ज्या सरकारी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना त्यांच्या नोकरीच्या सेवेत आपले प्राण गमवावे लागले आहेत त्यांच्या कुटुंबांना मदत दिली जाते.

कुठलाही शासकीय कर्मचारी निवृत्त होतो, तेव्हा त्याला निवृत्तीवेतन दिले जाते. ते त्याच्या मृत्यूपर्यंत सुरू राहते. मृत्यूपश्चात या निवृत्तीवेतनाचा काही हिस्सा त्या कर्मचाऱ्यांच्या पत्नीलाही मिळतो. काही प्रसंगात, या कर्मचाऱ्यांच्या अपत्याला अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याचीही तरतूद शासनात आहे. पण या निवृत्ती वेतनाचेही अनेक प्रकार असतात.

**निवृत्ती वेतनाचे प्रकार :** निवृत्तीवेतनाचे ८ प्रकार आहेत- १) नियत वयोमान निवृत्तीवेतन, २) पूर्णसेवा निवृत्तीवेतन, ३) रुग्णता निवृत्तीवेतन, ४) भरपाई निवृत्तीवेतन, ५) जखम किंवा इजा निवृत्तीवेतन, ६) अनुकंपा निवृत्तीवेतन, ७) कुटूंब निवृत्तीवेतन आणि ८) असाधारण कुटूंब निवृत्तीवेतन.

नियत वयोमानानुसार म्हणजे वयाची ५८ वर्षे पूर्ण झाल्यावर व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यावर कर्मचारी निवृत्त होतो. स्वेच्छानिवृत्ती, रूग्णता आणि भरपाई हेही निवृत्तीचे प्रकार आहेत.

अकार्यक्षमतेमुळे देण्यात येणारी निवृत्ती म्हणजे अनुकंपा निवृत्ती होय. निवृत्ती वेतन घेणारा जेव्हा मरण पावतो तेव्हा त्याच्या कुटुंबाला मिळते ते कुटूंब निवृत्ती वेतन होय. एखादा सरकारी कर्मचारी हरवल्यास त्याच्या कुटुंबाला त्रास होवू नये म्हणून असाधारण कुटूंब निवृत्ती वेतन देतात.

**निवृत्ती वेतन कोणाला मिळते?:**

सेवानिवृत्ती वेतनासाठी कमीत कमी १० वर्षे कालावधी हिशेबात घेतला जातो. आता १० वर्षे सेवा झाल्यानंतर शेवटच्या वेतनावर पूर्ण निवृत्ती वेतन दिले जाते. ज्या कर्मचाऱ्यांची अर्हताकारी सेवा १० वर्षांपेक्षा कमी आहे त्यांना निवृत्तीवेतनाऐवजी सेवा उपदान दिले जाते.

निवृत्ती वेतनाची मोजणी ही निवृत्तीपूर्वी शेवटच्या १० महिन्यांत घेतलेल्या वेतनाच्या सरासरीवर किंवा कर्मचारी ज्या पदावरून सेवानिवृत्त झाला आहे, त्या पदाकरिता निश्चित करण्यात आलेल्या मूळ वेतनाच्या ५०% दराने यापैकी जे फायदेशीर असेल ते निवृत्ती वेतन देय असते.

**कुटूंब निवृत्तीवेतन म्हणजे काय? :**

कुटूंब निवृत्तीवेतनाचेही दोन प्रकार आहेत. त्यात कर्मचाऱ्याचा सेवेत मृत्यू झाल्यास आणि निवृत्तीवेतन धारकाचा मृत्यू झाल्यानंतर. कुटूंब निवृत्तीवेतन हे कर्मचाऱ्यांच्या पत्नी किंवा पतीस मिळते. एक वर्ष सेवा झाल्यानंतर सेवेत कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटूंबियांना कुटूंब निवृत्ती वेतन देय होते. एक वर्ष सलग सेवा होण्यापुर्वी मृत्यू झाला असेल व अशा कर्मचाऱ्यांची सेवेत नेमणूक होण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी झाली असेल, तर त्यांच्या कुटूंबीयांना कुटूंब निवृत्ती वेतन मिळते.

**खासगी आस्थापनांचे नियम वेगळे :**

आपण निवृत्ती वेतनधारकांचे हक्क आणि अधिकार पाहिले. मात्र, खासगी आस्थापनांमध्ये नियम वेगळे आहेत. तिथे बहुतांश जणांना निवृत्ती वेतन मिळत नाही. खासगी ठिकाणी आपले नियमित वेतन, भविष्य निर्वाह निधी आणि ग्रॅच्युईटीच्या नियमात सदर कर्मचारी बसत असेल, तर ते नियानुसार मिळते.

अनेक ठिकाणी शिल्लक सुट्ट्यांचे पैसे किती मिळणार याचेही वेगवेगळे नियम आहेत. कंपनीनुसार या नियमात बदल होतो. सद्या बहुतांश ठिकाणी कंत्राटी पद्धतीवर भरती असते. त्यामुळे या वगार्ला म्हणावा तितका लाभ निवृत्तीनंतर मिळताना दिसत नाही. आता तर खाजगी काय नि सरकारी काय? सगळे काही सब घोडे बारा टक्के करण्यात आले, हेच मोठे क्लेशदायी ठरले आहे.



कृष्णकुमार आनंदी
गोविंदा निकोडे
गडचिरोली,
९४२३७१४८८३

●●●●●●●●●

# मराठा आरक्षण समज, गैरसमज




अनिल कुमावत

मराठा आरक्षणचा थोडक्यात इतिहास मित्रांनो हा लेख लिहून मी मराठ्यांना आरक्षण मिळू नये या मताचा आहे असा गैरसमज कोणीही करून घेऊ नये. उलट मी मराठ्यांना सुद्धा आरक्षण मिळायला हवे, या मताचा आहे . जहागिरी गेली तरी चालेल पण फुगिरी जाऊ द्यायची नाही मराठ्यांना हीच खोड आरक्षणा बाबतीत नडलेली आहे.

राज्यात मराठा आरक्षणाची दुखरी नस मराठे पुढारी यांनी कधीच शोधली नाही. ज्यांच्याकडे जमीन जुमला आहे पण गरीब मराठ्यांचे काय? हा प्रश्न कुणालाही पडला नाही. मराठ्यांना आज ना उद्या आरक्षणाची गरज पडणारच आहे, त्यासाठी पहिल्यांदा प्रयत्न केले डॉक्टर पंजाबराव देशमुख यांनी. त्यासाठी त्यांनी पावले सुद्धा टाकलेली होती . परंतु यासाठी मराठा सामाजातील लोकांनीच विरोधाची भूमिका घेतली. याचाच परिणाम आज विदर्भ आणी विदर्भालालागून असलेली काही जिल्हे वगळता उर्वरित महाराष्ट्रातील मराठ्यांना भोगावा लागत आहे.

देशाचे पहिले कृषीमंत्री पंजाबराव देशमुख यांना ज्याच्याकडे कुणबी प्रमाणपत्र आहे त्याचे पूर्णपणे श्रेय द्यायला हवे. आपण 96 कुळी आहोत असे म्हणणाऱ्या आणी त्यांचे ऐकणाऱ्या मराठ्यांचा घात झाला. सुरुवातीला मराठा समाज मागास असल्याची भूमिका पंजाबराव देशमुखांनी मांडली.

पंजाबराव देशमुख हे घटना समितीचे सदस्य होते. आरक्षणाचा मुद्दा हा जातपात नसावा तर आर्थिक दुर्बल घटक असावा असा विचार त्यांनी 22 नोव्हेंबर 1949 साली घटना समितीसमोर मांडला. आर्थिक, शैक्षणिक बाबतीत मागासलेले मराठ्यांना आरक्षण द्यावे अशी मागणी त्यांनी घटना समितीचे अध्यक्ष बाबासाहेब आंबेडकर यांचेकडे केली.

बाबासाहेबांनी कलम 340 मध्ये आरक्षणाची तसेच राष्ट्रपतींनी आदेश काढण्याची तरतूद केली. 1953 मध्ये कालेलकर समिती स्थापन झाली तेंव्हा या समितीने ओबीसी घटक पुढे आणला. मराठा सामाजाने कुणबी या जातीचे दस्तऐवज करावे असे मराठा समाजाला आव्हान केले. त्यासाठी मोठ्या प्रमाणात समाजप्रबोधन केले आणी त्यासाठी जनआंदोलनही केले.

लोकांना त्यांनी कुणबी ही नोद दास्ताऐवजात करून घ्यावी हे आवाहन केले. मंडल आयोगाच्या शिफारशी लागू झाल्यानंतर विदर्भातील अमरावती विभागातील कुणबी प्रमाणपत्र धारकाना आरक्षण मिळायला सुरवात झाली. 1960 च्या दशकामध्ये मराठा शेतकरी हा मराठा कुणबी असल्याची मागणी केली गेली. त्या मागणीला घटनात्मकदृष्ट्या मंजुरीही मिळाली होती.

बाबासाहेब ज्यावेळी संविधानाचा मसुदा तयार करत होते त्यावेळी त्यांना मराठा सामाजाच्या आरक्षणाबाबतीत पंजाबराव देशमुख यांनी विचारणा केलेली होती दलित व मागासवर्गीयांसोबत मराठा समाजालाही संविधानात स्थान देण्यात यावे त्यांचा शैक्षणिक किंवा आर्थिक विकास होईल यासाठी आरक्षणाची तरतूद करावी अशी मागणी त्यावेळी पहिल्यांदा पंजाबरावांनीच केलेली होती.

परंतु त्यावेळी हजारोच्या संख्येने विखूरल्या गेलेल्या मराठा समाजाला इतक्या कमी कालावधीत सूचीबद्ध करने शक्य नसल्याचे बाबासाहेबांनी सांगितले परंतु त्यांनी त्यामध्येच कलम 340 अंतर्गत मराठा समाजाचा संविधान मसुदा सूचित समावेश केलेला होता.

आता तुम्हांला प्रश्न पडेल की त्यावेळी नेमक झालं काय तर एससी, एसटी, ओबीसींना वगळून जो समाज विस्थापित होता अशा समाजाचा सामाजिक जीवनाचा अभ्यास या सूची अंतर्गत करण्यात येणार होता. यात प्रामुख्याने मराठा समाजाचा समावेश होता. त्या माध्यमातून मराठा समाजाचा सामाजिक स्तर शैक्षणिक व आर्थिक बाबींचा अभ्यास करण्यात येणार होता.

स्वतः बाबासाहेब हे दलित समाजाचे प्रतिनिधित्व करत असल्याने त्या समाजाला संविधानात चांगले स्थान मिळेल याबाबत पंजाबराव देशमुख आश्वस्थ होते परंतु गावोगावी विखूरल्या गेलेल्या मराठा समाजाच काय? असा प्रश्न पंजाबरावांना होताच . त्यामुळे मराठा समाजाचे शैक्षणिक व आर्थिक स्तर उंचावण्यासाठी या समाजालाही आरक्षणाचा वाटा मिळावा ही देशमुखांची प्रमुख मागणी होती.

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

●●●●●●●●●

# हिवाळ्यात या ५ धान्यांचा करा आहारात समावेश

ऋतूनुसार आहाराकडे लक्ष देणं गरजेचं असतं. त्यातही हिवाळ्यात स्वतःला उबदार ठेवणे हे स्वतःच एक मोठे आव्हान असते. अशावेळी उबदार कपड्यांसह आपण शरीराला आतून उबदार आणि मजबूत बनवणं गरजेचं आहे. यासाठी हिवाळ्यात आपण जाड धान्याचे सेवन करणे गरजेचे आहे.

हिवाळ्यात जाड धान्य सेवन केल्यानं आपल्या शरीराला लोह, प्रथिने, कॅल्शियम आणि फायबर चांगल्या प्रमाणात तर मिळतीलच, पण जाड धान्य खाल्ल्याने तुम्ही लठ्ठ नसून निरोगी राहाल.

हिवाळ्यात जाड धान्याचे सेवन केल्याने पचनक्रिया सुधारते, ज्यामुळे रोगप्रतिकारक शक्ती म्हणजेच आपली रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. ज्वारी, बाजरी, नाचणी आणि हरभरा हे भरड धान्य म्हणून गणले जातात. त्यांना हिवाळ्यातील सुपरफूड्स असेही म्हणतात. चला तर मग जाणून घेऊया आपल्या आहारात कोणत्या जाड धान्यांचा समावेश करावा आणि त्यांचे सेवन केल्याने कोणते फायदे होतात.



**बाजरी**

बाजरी हिवाळ्यात शरीराला उष्णता देण्याचे काम करते. या जाड धान्यात फायबरव्यतिरिक्त लोह, जस्त, कॅल्शियम आणि लोह भरपूर प्रमाणात असते. याचे सेवन केल्याने आपली हाडे तर मजबूत होतातच, पण याच्या मदतीने तुम्ही तुमचा रक्तदाबही नियंत्रित करू शकता. याशिवाय बाजरी मधुमेह, हृदयरोग आणि पचनाच्या समस्यांचा सामना करण्यास देखील मदत करते.

**ज्वारी**

हिवाळ्यात बहुतांश घरांमध्ये ज्वारीचे सेवन केले जाते. खरं तर शरीराला उष्णता देण्यासही ज्वारीची खूप मदत होते. यात प्रथिने, लोह, फायबर आणि कॅल्शियम देखील भरपूर प्रमाणात असते. हिवाळ्यात वजन कमी करायचं असेल किंवा समतोल साधायचा असेल तर ज्वारीचं सेवन ही मोकळेपणाने करू शकता. ज्वारीचे सेवन केल्याने हृदयाचे आरोग्य तर सुधारतेच पण कोलेस्टेरॉलची पातळीही नियंत्रित राहते.

**रागी (नाचणी)**

रागीची गणना जाड धान्यांमध्ये ही केली जाते आणि ती आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. हिवाळ्यात शरीराला उष्णता मिळावी म्हणून बहुतेक लोक नाचणीचे सेवन करतात. रागी पचनक्रिया सुधारण्यास तसेच वजन नियंत्रित करण्यास खूप मदत करते. स्नायूंची ताकद वाढवण्यासाठी आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी लोक हिवाळ्यात नाचणीचे सेवन करतात.

**उडीद**

हिवाळ्यात शरीरातील अतिरिक्त ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी आणि पचनक्रिया सुधारण्यासाठी उडीद डाळीचे सेवन केले जाते. उडीद डाळीमध्ये प्रथिने, फायबर आणि लोह भरपूर प्रमाणात असते. ज्या लोकांना अशक्तपणा आहे आणि रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत आहे त्यांना उडीद डाळ घेण्याचा सल्ला दिला जातो, विशेषतः हिवाळ्याच्या हंगामात.

**हरभरा :** प्रथिने, फायबर आणि झिंकने समृद्ध असलेले चणे पचन चांगले राखण्यासाठी खूप उपयुक्त आहे. याशिवाय शरीराचे तापमान राखण्यासही ते मदत करतात. जर तुम्हाला चणे खायला आवडत नसेल तर तुम्ही त्यापासून नवीन डिश बनवण्याचा प्रयत्न करू शकता.

●●●●●●●●●

## अशोकायन

**जोर लगाके . . !**

अपयश येता पदरी
चिंतन कर थोडे
लक्षात येईल तुज्या
कां अडले आपले घोडे?

अपयशाने खचू नको
प्रयत्नांची धर कास
आज नाही तर उद्या
यश मिळेल हमखास ..!

प्रयत्न करण्यात कुठेतरी
राहीली आपली कसर
अपेक्षित यश न मिळणे
हा त्याचाच आहे असर..!



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# परभणी घटनेच्या निषेधार्थ ढाणकीत कडकडीत बंद

■ महासागर प्रतिनिधी,

यवतमाळ , दि. १८ : परभणी येथील संविधान योद्धा सोमनाथ सूर्यवंशी यांचा न्यायालयीन कोठडीत मृत्यू झाल्याच्या निषेधार्थ मंगळवारी दि. १७ डिसेंबरला ढाणकीत कडकडीत बंद पाळण्यात आला. ढाणकी व्यापारी असोसिएशनने सकाळपासूनच आपली प्रतिष्ठाने बंद ठेवली होती. बंद दरम्यान पोलिस प्रशासनाने तगडा बंदोबस्त तैनात केला होता. दंगल नियंत्रण पथकही कर्तव्यावर होते. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. परभणी घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी ढाणकीत कडकडीत बंद पाळण्यात येणार असल्याची वार्ता ढाणकीसह परिसरात वाऱ्यासारखी पसरली. त्यामुळे ग्रामीण भागातील चारचाकी, दुचाकी व तीनचाकी वाहने नागरिक ढाणकीत येऊ शकले नाही. मात्र, महामंडळाच्या बसफेऱ्या सुरळीत सुरू असल्यामुळे बाहेरगावाहून येणाऱ्या प्रवाशांचे हाल झाले. ग्रामीण भागात ये-जाकरण्यासाठी. वाहने सुरू नसल्यामुळे अनेक तास त्यांना ताटकळत बसावे लागले. शासकीय, खासगी रुग्णालये, मेडिकल व अत्यावश्यक सेवा सुरळीतपणे सुरू



होत्या. बंद दरम्यान सावित्रीबाई फुले बौद्धविहारां पासून निषेध रॅलीला सुरुवात करण्यात आली. रॅलीमध्ये शेकडो समाजबांधव सहभागी झाले होते. गुडमेवार चौकापासून रॅलीने मार्गक्रमण करीत संविधान चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्प अर्पण करून छत्रपती शिवाजी महाराज चौकात रॅलीचे रूपांतर सभेत झाले. निषेध सभेत माजी सभापती खाजाभाई कुरेशी, बाजार समितीचे माजी सभापती बाळासाहेब चंद्र पाटील, ढाणकी नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष शेख जमीर, माजी जिल्हा परिषद सदस्य रामराव गायकवाड, तुळशीराम गायकवाड, ओम खोपे, कपिल घुगरे, राजेश घुगरे यांनी सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूप्रकरणी पोलिसांचा तीव्र शब्दात निषेध केला. कार्यक्रमाचे संचालन जॉन्टी विनकरे यांनी केले, तर आभार नगरपालिकेचे सभापती संबोधी गायकवाड यांनी मानले. यासंदर्भात महिला मोर्चेकरांनी बिटरगाव पोलिस ठाण्याचे ठाणेदार संतोष मनवर यांना निवेदन दिले. यवतमाळ येथील संविधान चौकात वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा अध्यक्ष, डॉ. निरज वाघमारे यांच्या नेतृत्वात परभणी येथे घडलेल्या विकृत अशा घटनेचा निषेध म्हणून धरणे आंदोलन करण्यात आले. समाजावर येणारे कोणतेही संकट सांभाळायला मी तत्पर आहे. राजकारण हा क्षणिक विषय आहे. मला माझ्या समाजासोबत आजन्म राहायचे आहे. असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करुन आदरांजली वाहिली. त्यामध्ये शिवदास कांबळे, दीपक नगराळे, डॉ. आनंद गायकवाड, सिद्धार्थ मानकर, सिद्धार्थ भवरे, रवींद्र टेंभूर्णे, डॉ शाम खंडारे, प्रफुल्ल शंभरकर, उमेश मेश्राम, विशाल राऊत, वंदना उरकुडे, मेश्राम यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे संचालन प्रसन्नजित भवरे यांनी केले. यावेळी महिला जिल्हाध्यक्ष धम्मवती वासनिक, पुष्पा सिरसाट, गजानन सावळे, प्रमोद पाटील, मधुकर कांबळे, मीना रणीत, वंदना उरकुडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# ‘शिक्षकांसाठी साने गुरुजी’ या विषयावर संवाद

■ महासागर प्रतिनिधी,

दिग्रस , दि. १८ : साने गुरुजींच्या आयुष्यातून आपण उत्कटता, संवेदनशीलता, उत्स्फूर्तता, नावीन्य, कणव, प्रेम, दया, कष्ट करण्याची वृत्ती घेतली पाहिजे. माऊली म्हणून संत ज्ञानेश्वर यांच्या नंतर फक्त साने गुरुजींना ओळखले जाते. ते मातृह्रदयी होते. मात्र मुलांसाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी प्रसंगी ते कणखर सुध्दा व्हायचे. त्यांचा हाच कणखरपणा देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात सामील झाल्यावरही अनेक वेळा दिसला आहे. म्हणूनच साने गुरुजी अजूनही महाराष्ट्रातील जन माणसाच्या मनात आहेत असे प्रतिपादन हेरंब कुलकर्णी यांनी केले. साने गुरुजींच्या आयुष्यातील शिक्षक म्हणून घडलेल्या घटनांचे धावते पण तेवढेच हृदयस्पर्शी चित्रण त्यांनी आपल्या व्याख्यानातून केले. यावेळी ऐकणारे शिक्षक मंत्रमुग्ध झाले होते. दिग्रस येथे मराठी साहित्य रसिक मंडळ आणि विद्यानिकेतन इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ‘शिक्षकांसाठी साने गुरुजी’ या विषयावर शिक्षकांशी संवाद साधत ते बोलत होते. यावेळी मंचावर विद्यानिकेतन शाळेचे प्राचार्य नितीन राऊत, मोहनाबाई कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता नगराळे, ईश्वर देशमुख सैनिक शाळेचे प्राचार्य नितीन धनवंत, दिनबाई



विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप चोपडे, बीएनबी महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रुपेश कऱ्हाडे उपस्थित होते. साने गुरुजी यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यात साने गुरुजींवर शंभर व्याख्यानाचा संकल्प प्रसिद्ध वक्ते, सामाजिक कार्यकर्ते, लेखक हेरंब कुलकर्णी यांनी केला आहे. गेली चार दिवस ते विदर्भात असून अमरावती जिल्ह्यातील दोन आणि यवतमाळ जिल्ह्यातील नेर व यवतमाळ येथील व्याख्यान आटोपून दिग्रस येथे आले होते. दिग्रसमध्ये हेरंब कुलकर्णी यांचे ५६ वे व्याख्यान होते. गोदावरी अर्बन बँक आणि मिर्जा अफजल बेग यांच्या सहकार्यातून आयोजित या व्याख्यानात पुढे बोलताना हेरंब कुळकर्णी म्हणाले की, गाणी, गप्पा आणि गोष्टीतून शिक्षकांनी मुलांशी बोलायला हवे. त्यांना बोलतं करायला हवे. संवाद साधायला हवा. संवादातून समजातील समस्यांची दाहकता या येणाऱ्या पिढीपर्यंत पोचवायला हव्यात. शिक्षकांचा समाजाशी आणि मुलांशीही कनेक्ट थोडा कमी झाल्याची खंत व्यक्त करताना विद्यार्थ्याला विचार करायला शिकवा. असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक किरण बारशे यांनी तर वक्त्याचा परिचय गिरीश दुधे यांनी करून दिला. संचालन आमीन चौहान यांनी तर आभार हेमंत दळवी यांनी मानले. विद्यानिकेतन शाळेच्या मुलींनी संगीत शिक्षक अशोक मोरेकर, पवन इंगोले यांच्या मार्गदर्शनात शारदास्तवन आणि जगाला प्रेम अर्पावे ही प्रार्थना सादर केली. कला शिक्षक मयूर राऊत यांनी साने गुरुजींची सुंदर रांगोळी साकारली होती. फलकलेखन विनोद दुधे यांनी तर शशांक दुद्दलावार, गजानन पाटील यांनी सहकार्य केले. व्याख्यानाला शिक्षक, पालक, विद्यार्थी व नागरिकांची लक्षणीय उपस्थिती होती. समाजाचा एक मोठ्ठा घटक दुःखाने विव्हळतो यवतमाळ जिल्ह्याची ओळख देशात ‘शेतकऱ्यांची स्मशान भूमी’ अशी आहे. शेतकरी वेदनेने आणि परिस्थितीने अतिशय गंजला असून त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. समाजाचा एक मोठ्ठा घटक दुःखाने असा विव्हळत असताना, खितपत पडला असताना त्याची दखल शिक्षण नावाची संवेदनशील यंत्रणा घेणार आहे की नाही? शेतकऱ्यांची वेदना आम्ही मुलांपर्यंत पोचवणार आहोत की नाही? असा थेट सवाल हेरंब कुलकर्णी यांनी केला.

# कापड दुकानास आग लागून नुकसान

महासागर प्रतिनिधी,

घाटंजी, दि. १८ : घाटंजी कापड दुकानाला लागलेल्या आगीत लाखो रूपयांचा माल जळून खाक झाला. ही घटना शहरातील मुख्य रस्त्यावर असणाऱ्या बालाजी कॉम्प्लेक्समध्ये मंगळवारी सकाळी सव्वा नऊ ते साडे नऊ वाजताच्या सुमारास घडली. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता घाटंजीसह यवतमाळमधून पाचारण करण्यात आलेल्या अग्नीशमन दलाच्या अथक परिश्रमाने आगीवर नियंत्रण आणण्यात यश आले. शहरातील मुख्य रस्त्यावर असणाऱ्या बालाजी कॉम्प्लेक्समधील ए-वन फॅशन सेलच्या कापड दुकानात अचानक आग लागली. यावेळी आगीच्या धुराचे लोळ बाहेर येत असल्याचे उपस्थित नागरिकांना दिसले, दरम्यान नगर पालिका व पोलिस प्रशासनाला



याबाबत कळवण्यात आले. काही वेळातच नगर पालिका प्रशासनाने अग्निशमन दल घटनास्थळी पाठवले. सोबतच यवतमाळ येथील अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. काही वेळातच दोन्ही अग्निशमन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणली. आग आटोक्यात येईपर्यंत कापड दुकानातील माल पुर्णतः जळून खाक झाला होता. सदर इमारतीमध्ये तळमजल्यावर एटीएम व फटाक्याचे मोठे दुकान असल्याने कदाचीत ही आग फफटाक्याच्या दुकानाकडे गेली असती तर मोठी दुर्घटना घडली असती. परंतू आग नेमकी कशामुळे लागली, याबाबतची पाहणी सुरू केली, सदर आग शार्टसर्कीटमुळे लागल्याची चर्चा नागरिकांत आहे. कापड दुकानाला आग लागल्याने धुरांचे असे लोळ उठत होते.

# परभणी येथील पोलिस प्रशासनावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

कम्युनिस्ट पक्षाचे निवेदन

■ महासागर प्रतिनिधी,

अमरावती, दि. १८: परभणी येथील संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना केल्याच्या निषेधार्थ केलेल्या आंदोलनातील भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी याचा पोलिस कोठडीत मारहाणीत मृत्य झाला. त्याच्या मृत्यूस जबाबदार पोलिस अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा. यासह अन्य मागण्यासाठी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. परभणी येथील हिंसाचार प्रकरणी आंबेडकरी तरुण सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलिस कोठडीमध्ये मृत्यू झाला. पोलिसांच्या



अमानुष मारहाण केल्याने सूर्यवंशी यांचा मृत्यू झाल्याचा आरोप भारतीय कम्युनिस्ट पक्षाने केला आहे. हा संशयास्पद मृत्यू असून याची सीबीआय चौकशी करावी. तसेच संबंधित पोलिसांवर मनुष्यवधाचा गुन्हा करावा. तसेच अटक केलेल्या निर्दोष आंदोलकांची तत्काळ सुटका करावी. या मागणीला घेऊन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फ त राज्यपाल व मुख्यमंत्री यांना निवेदन दिले. या वेळी शिष्टमंडळात सुभाष पांडे, रमेश सोनुले, राजेंद्र भांबोरे, सुनील देशमुख, पद्मा गजभिये, प्रभाकर अकोटकर, मुकुंद काले आदी उपस्थित होते.

# वाळू तस्करांचा महसूल पथकावर हल्ला




सात जणांवर गुन्हा दाखल

■ महासागर प्रतिनिधी,

कळमनुरी, दि. १८ : कळमनुरी शिवारात अवैध गौणखनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई केली जात असतांना वाळू तस्करांनी महसूल विभागाच्या पथकावर हल्ला करून एका तलाठ्यास जखमी केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी बुधवारी ता.१८ पहाटे सात जणांवर कळमनुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी आरोपींची शोध मोहिम हाती घेतली आहे. हिंगोली जिल्हयात अवैधरित्या होणारी गौण खनीज वाहतूक रोखण्यासाठी महसूल विभागाकडून पथके स्थापन करण्यात आली आहेत. दिवसा हि पथके वाळू घाटाच्या परिसरात पाहणी करीत असल्यामुळे वाळू तस्कर रात्रीच्या वेळी गौण खनीजाची उत्खनन करून वाहतुक करीत आहेत. त्यामुळे महसूलचे पथक रात्रीच्या वेळीही तपासणी करू लागले आहेत.

दरम्यान, कळमनुरी तालुक्यातील नांदापूर शिवारातून एका ट्रॅक्टरमधून वाळूची वाहतूक होत असल्याची माहिती पथकाला मिळाली होती. त्यावरून मंडळ अधिकारी प्रेमदास चव्हाण, आनंद काकडे, तलाठी संतोष शेवाळकर, एकनाथ कदम, विशाल पतंगे, गणेश माखणे यांच्या पथकाने मध्यरात्रीच्या सुमारास हिंगोली ते कळमनुरी मार्गावर उमरा फफाटा येथे एक ट्रॅक्टर थांबविले. यावेळी त्यांनी तलाठी एकनाथ कदम, व विशाल पतंगे यांना ट्रॅक्टरवर बसवून ट्रॅक्टर पोलिस ठाण्यात नेण्यास सांगितले. त्यानंतर सदर ट्रॅक्टर कळमनुरी शिवारात आले असतांना एका स्कार्पिओ मधून आलेल्या सात जणांनी ट्रॅक्टर अडवून महसूलच्या पथकावर हल्ला केला. त्यांनी तलाठी कदम व पतंगे यांना गच्चीला धरून खाली उतरविले त्यानंतर पथकावर काठीने हल्ला केला. यावेळी कदम यांनी काठीचा वार हातावर घेतला असता त्यांच्या अंगठ्याला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर तस्करांनी वाळू खाली सांडून ट्रॅक्टरसह पळ काढला. या प्रकरणी मंडळ अधिकारी चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीवरून कळमनुरी पोलिसांनी प्रकाश गिराम, शुभम गिराम, आसीफफ शेख, ओम गिराम (सर्व रा. मसोड, ता. कळमनुरी), दत्ता माहोरे व अन्य दोघे जण अशा सात जणांवर गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक मोहन भोसले, सहाय्यक पोलिस निरीक्षक शेवाळे, उपनिरीक्षक संतोष इंगळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. पोलिसांनी आरोपींचा शोध सुरु केला आहे.

# निम्मे सत्र संपले तरी जि. प.शाळेचे विद्यार्थी दुसऱ्या गणवेशाच्या प्रतीक्षेत

■ महासागर प्रतिनिधी,

अमरावती, दि. १८: यंदाचे शैक्षणिक सत्र निम्म्याहून अधिक संपले तरी १ लाख २९ हजार ७०९ विद्यार्थ्यांना अजूनही मंगळवार, गुरुवार व शनिवारी वापरण्यासाठी स्काऊट गाइडचा दुसरा विशेष गणवेश मिळाला नाही. पहिली ते आठवीपर्यंतच्या बहुतांश विद्यार्थ्यांना पहिला गणवेश मिळाल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली. मात्र, दुसऱ्या गणवेशाचे कापड अजूनही पंचायत समिती स्तरावर धूळखात पडून आहे. शाळा सुरू होऊन ६ महिने लोटले तरी, शिक्षकांकडून अद्याप मागणीपत्रच भरून घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. विशेष म्हणजे, शिलाईच्या पैशाची केवळ तरतूद केली परंतु प्रत्यक्षात शासनाने निधीच उपलब्ध करून दिला नाही. त्यामुळे प्रशासकीय कामातील दिरंगाई पुन्हा एकदा चव्हाट्यावर आली आहे. विद्यार्थ्यांना दोन्ही गणवेश याआधी शालेय स्तरावरच उपलब्ध करून दिले जात होते. परंतु, राज्याने एक गणवेश योजना आणून गुजरात येथून कापड मागवले. या कापडापासून महिला बचत गटांमार्फत गणवेश तयार करून प्रत्येकी दोन गणवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवी या वर्गातील १ लाख २९ हजार ७०९ विद्यार्थ्यांना यंदा दोन वेगवेगळे गणवेश मोफत दिले जाणार होते. एक नियमित आणि दुसरा स्काऊट गाइडच्या गणवेशाचा समावेश होता.

मध्यंतरी महिला आर्थिक विकास महामंडळाने जिल्ह्यातील पहिली ते आठव्या वर्गातील विद्यार्थ्यांचा गणवेश शाळास्तरावर पाठवला. तर वस्त्रोद्योग मंत्रालयांतर्गत खरेदी केलेल्या स्काऊट गाइडच्या कापडाचे गठ्ठे पं. स. कार्यालयात पाठवले. मात्र, कोणत्याही शिक्षकाने स्काऊट गाईड गणवेशाचे कापड



पंचायत समितीतून नेलेच नाही. परिणामी दुसरा विशेष गणवेश अद्याप तयारच झाला नाही. त्यामुळे विद्यार्थी दुसऱ्या स्काऊट गाईड गणवेशाच्या प्रतिक्षेत आहेत. बहुतांश शाळेतील शिक्षकांकडून आता मागणीपत्र भरून घेतले जात असताना शिक्षण विभाग पहिली ते ६ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना गणवेश मिळाल्याचे सांगत आहेत.

प्रशासनाच्या नोंदी गणवेश आल्याचे दिसत असले तरी प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना दुसरा गणवेश मिळालाच नाही. यासंदर्भात शिक्षणाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता ते उपलब्ध झाले नाहीत. पालकांकडून गणवेशाबाबत विचारणा : जिल्ह्यातील पंचायत समितीतील १ लाख २९ हजारांवर ७०९ विद्यार्थ्यांना पहिला गणवेश शिलाई करून देण्यात आला आहे. त्यातही अनेक विद्यार्थ्यांना त्यांच्या मापानुसार गणवेश शिलाई करून मिळालाच नव्हता. असे असताना स्काऊट गाइड गणवेशाची प्रतीक्षा आता विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर शिक्षकांनाही आहे. ग्रामीण भागात विद्यार्थ्यांचे पालक थेट शिक्षकांनाच गणवेशाबाबत विचारणा करत आहेत.

# रस्त्याच्या डांबरीकरणाला सुरुवात

■ महासागर प्रतिनिधी,

पुसद , दि. १८ : उपजिल्हा रुग्णालयाकडे जाणाऱ्या रस्त्याची चाळणी झाली होती. अनेक वेळा नागरिकांनी तोंडी व लेखी तक्रार देऊन रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी केली होती. परंतु, त्यांच्या मागणीकडे बांधकाम विभागाकडून दुर्लक्ष केल्या जात असल्याचे वृत्त दै. दिव्य मराठीने दि. ७ डिसेंबरला प्रकाशित केले होते. या वृत्ताची दखल घेत डांबरीकरणाच्या कामाला सुरुवात झाली आहे. वृत्त प्रकाश केल्याने व कामाला सुरुवात झाल्यामुळे नागरिकांकडून आभार व्यक्त केली जात आहे.

शहरातील बंजारा कॉलनी, समता नगर, देशमुख नगर, अशोक पार्क येथे असंख्य नागरिक राहतात. उपजिल्हा रुग्णालयाकडे जाणारा रस्ता २४ तास वर्दळीचा असतो. परिसरात खाजगी दवाखाने व एकात्मिक आदिवासी प्रकल्प



कार्यालय सुद्धा आहेत. उपजिल्हा रुग्णालय देखील आहे. रुग्णालय परिसरामध्ये नर्सिंग कॉलेजची उभारणी सुरू आहे. अशा परिस्थितीत रस्त्याची दयनीय अवस्था झाल्यामुळे पादळ चालवणाऱ्यांसह वाहनधारकांना तारेवरची कसरत करावी लागत होती. या रस्त्याचे गांभीर्य लक्षात घेता या वृत्ताची बांधकाम विभागाने दखल घेत रस्त्याच्या डांबरीकरणाला सुरुवात केली आहे. परंतु, त्या रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे डांबरीकरण होत असल्याचा आरोप रहिवासीयांकडून केला जात आहे. त्यामुळे बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दखल घेऊन डांबरीकरणाचा रस्ता अनेक वर्षे सुस्थितीत राहील, या हिशोबाने ठेकेदाराकडून डांबरीकरण करून घ्यावे, अशी मागणी होत आहे.

# वसमतमध्ये सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट टाकल्यानंतर दगडफ फेक

पोलिस उपाधीक्षकालाच जीवे मारण्याची धमकी

■ महासागर प्रतिनिधी,

हिंगोली, दि. १८ : वसमत येथे सोशल मिडीयावर वादग्रस्त पोस्ट टाकल्यानंतर दगडफफेक होत असतांना घटनास्थळी दाखल झालेल्या उपाधिक्षकां वर दगडफफेक करून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या १२ जणांवर वसमत शहर पोलिस ठाण्यात सोमवारी ता. १६ पहाटे गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वसमत येथील कैलास काबरा यांनी सोशल मिडीयावर जाती धर्मामध्ये तेढ निर्माण होईल अशी वादग्रस्त पोस्ट टाकली होती.



यावरून एका जमावाने त्यांच्या घरी जाऊन दगडफफेक सुरु केली. यामध्ये घरासमोर दगडाचा खच पडला होता. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिस उपाधिक्षक राजकुमार केंद्रे, सहाय्यक पोलिस निरीक्षक महाजन, उपनिरीक्षक साहेबराव कसबेवाड यांच्यासह पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

यावेळी उपाधीक्षक केंद्रे हे जमावाला शांत करीत असतांना त्यातील काही जणांनी पोलिसांवरच दगडफफेक केली. यामध्ये केंद्रे हे जखमी झाले. यावेळी तुम्ही येथून निघून जा अन्यता तुम्हाला येथे जिवे मारूत अशी धमकीही दिली. तसेच जिल्हाधिकारी यांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केले.

या प्रकरणी उपाधिक्षक केंद्रे यांनी दिलेल्या तक्रारीवरून वसमत शहर पोलिसांनी शेख मोहसीन, खादील अख्तर, शेख अरबाज, शेख नदीम, मोहम्मद शोएब, मुशरफफ फफारुखी, मोहम्मद सोहेल, शेख अजीम, अरबाज शेख उर्फ बब्बी, जुनेद, अरफफात शेख, सय्यद आवेज यांच्या विरुध्द शासकिय कामात अडथळा आणल्याच्या आरोपावरुन गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी नऊ जणांना ताब्यात घेतले असून सहाय्य पोलिस निरीक्षक महाजन पुढील तपास करीत आहेत.

वादग्रस्त पोस्ट टाकणाऱ्यावर गुन्हा

या घटनेमध्ये सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट टाकणाऱ्या कैलास काबरा याच्या विरुध्द वसमत शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिस उपनिरीक्षक साहेबराव कसबेवाड पुढील तपास करीत आहेत.

# परभणीतील घटनेच्या विरोधात रास्ता रोको आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी,



मालेगा, दि. १८ : तालुक्यातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते यांनी १६ डिसेंबरला रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. त्यामध्ये आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते व जनता या आंदोलनात सहभागी झाली होती. या आंदोलनातील अटक करण्यात आलेल्या सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आंदोलन कर्त्यांनी केली आहे. परभणीमध्ये जो प्रकार घडला. त्यात आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ता यांच्यावर प्रशासनांनी खोटे गुन्हे लादले ते चुकीचे असून. ज्या व्यक्तीने हा अपमान केला त्यांच्या विरोधात निदर्शन करणे आमचा संवैधानिक अधिकार असून या अधिकाराने लोक रस्त्यावर आले. परंतु प्रशासनाने याच चळवळीतील लोकांवर गुन्हे दाखल केले. ते मागे घेण्याकरिता आणि या आंदोलनातील सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलिसांच्या ताब्यात असताना झालेल्या मृत्यूची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी आंदोलन कर्त्यांनी केली. शेलू फाटा मालेगाव या ठिकाणी रास्तारोको आंदोलन करून निषेध नोंदवला आहे. या आंदोलनात ज्येष्ठ कार्यकर्ते गोवर्धन चौथमल, संदीप सावळे, चेतन इंगळे, अमोल पखाले, जनार्दन शिंदेसह इतर कार्यकर्ते मोठ्या च्या संख्येने उपस्थित होते, यावेळी दोषींवर कठोर कारवाई करण्यासाठी प्रशासनास निवेदन देण्यात आले.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३


# ग्लॅम वर्ल्ड

## चर्चा 'बदला २' ची

'बदला' हा तापसी पन्नूचा एक यशस्वी चित्रपट. २०१९ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने १०० कोटी रुपयांहून अधिक व्यवसाय केला होता. त्यानंतर या चित्रपटाच्या सीक्वेलची चर्चा होती. 'बदला २' येणार का, असा प्रश्न सतत विचारला जात होता. त्यावर आता तापसी पन्नूने खुलासा केला आहे. आपण दिग्दर्शक सुजय घोषसोबत 'बदला २' बाबत चर्चा केली असल्याचं तापसीने म्हटलं आहे. त्यामुळे हा चित्रपट साकारू शकतो, असं तिचं म्हणणं आहे. आता 'बदला २' मध्ये तापसीला पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत.






## संमिश्र यशाचं वर्ष

**वर्षाअखेरीस 'पुष्पा २' च्या रुपात भारतीय सिनेसृष्टीला भव्यदिव्य यश अनुभवता आलं. तसं पहायला गेलं तर यंदाचं वर्ष बॉलिवूडसाठी संमिश्र यशाचं ठरलं. काही मोजक्या चित्रपटांनी मोठं यश मिळवलं तर काही चित्रपटांनी निराशा केली. वैविध्यपूर्ण विषयांचं सादरीकरण आणि हॉरर कॉमेडीपटांना मिळालेलं यश ही सुद्धा यंदाच्या वर्षातली ठळक वैशिष्ट्य म्हणता येतील.**

चि वर्षाअखेरीस प्रदर्शित झालेल्या 'पुष्पा २' मुळे भारतीय त्रपटसृष्टीला नवी झळाळी प्राप्त झाली. या चित्रपटाने जागतिक बॉक्स ऑफिसवर अवघ्या दहा दिवसात १२९२ कोटी रुपयांची कमाई केली. या प्रवासात 'पुष्पा २' ने 'आरआरआर', 'केजीएफ २', 'जवान', 'पठाण', 'कल्की '२८९८ एडी' आणि 'ॲनिमल'सारख्या चित्रपटांना कमईच्या बाबतीत मागे टाकलं. 'पुष्पा २' दर दिवशी कोटीच्या कोटी उड्डाणं घेत असून हिंदी पट्ट्यातही दणकून कमाई करत आहे. अल्लू अर्जुनच्या या चित्रपटाने भारतभरात ८०० कोटी रुपयांहून अधिक व्यवसाय केला आहे. त्यात हिंदी पट्ट्याचा वाटा ५०७.५० कोटी रुपयांचा आहे. 'पुष्पा २' ने अवघ्या दहा दिवसांमध्ये हा टप्पा ओलांडला आहे. 'पुष्पा २' च्या विक्रमांच्या वावटळीत अनेक चित्रपट पालापाचोळ्यासारखे उडून जात आहेत. परदेशातही 'पुष्पा २' जबरदस्त कमाई करतो आहे. 'मैं झुकेगा नहीं' हा पुष्पाच्या पहिल्या भागातला संवाद तुफान गाजला होता. त्यानुसार 'पुष्पा २' थांबायला आणि झुकायला तयार नसल्याचं चित्र दिसून येत आहे. 'पुष्पा २' मुळे यंदाच्या वर्षी यशापयशाच्या हिंदोळ्यावर हेलकावे खाणाऱ्या बॉलिवूडला नवी दिशा मिळाली आहे. दरम्यान वर्षाअखेरीस 'पुष्पा २' बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत असला तरी बॉलिवूडसाठी यंदाचं वर्ष संमिश्र यशाचं ठरलं आहे. एकीकडे 'स्त्री २', 'सिंघम अगेन', 'भुलभुलैय्या ३' सारखे चित्रपट बॉक्स ऑफिसवर यशस्वी ठरले, 'कल्की २८९८ एडी' आणि 'देवरा'सारख्या दाक्षिणात्य चित्रपटांनी हिंदी पट्ट्यात चांगली कमाई केली. मात्र दुसरीकडे 'इंडियन २', 'बडे मियां, छोटे मिया', 'जिगरा'सारखे चित्रपट अपयशी ठरले. २०२३ शी तुलना करता २०२४ मध्ये बॉलिवूडच्या महसूलात घट नोंदवण्यात आली. २०२४ च्या पहिल्या सहा महिन्यांमध्ये बॉलिवूडने बॉक्स ऑफिसवर १०८१ कोटी रुपये कमावले. गत वर्षी याच काळात बॉलिवूडने १४५० कोटी रुपये कमावले होते. म्हणजेच या काळातल्या कमाईत २० ते २५ टक्क्यांची घट नोंदवली गेली. गेल्या वर्षी शाहरूख खानच्या 'जवान' आणि 'पठाण'सारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटांनी बॉलिवूडला आधार दिला होता. मात्र यंदा पहिल्या सहा महिन्यात कोणताही ब्लॉकबस्टर बॉलिवूडपट प्रदर्शित होऊ शकला नाही. याचा फटका बॉलिवूडला बसल्याचं जाणकारांचं म्हणणं आहे. यंदाच्या वर्षात 'बडे मियां छोटे मियां', 'मैदान'सारख्या चित्रपटांनी केलेली निराशाही बॉलिवूडला धक्का देऊन गेली तर हृतिक रोशनच्या 'फायटर'ने चांगली कमाई केली. अजून एक महत्त्वाची बाब म्हणजे यंदाच्या वर्षात विविध विषयांवरील चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आले. एकीकडे 'मुंज्या', 'स्त्री २', 'भुलभुलैय्या २' सारख्या हॉरर कॉमेडी प्रकारातल्या चित्रपटांनी चांगली कामगिरी केली तर दुसरीकडे 'कल्की २८९८ एडी'सारखा साय–फाय प्रकारातला चित्रपटही भाव खाऊन गेला. वर्षाच्या शेवटी 'पुष्पा २' सारख्या ॲक्शनपटाने दणकून कमाई केली. म्हणजेच यंदाच्या वर्षी ठराविक विषयावरील चित्रपटाचा बोलबाला नव्हता तर वैविध्यपूर्ण चित्रपटांचा नजराणा प्रेक्षकांना मिळाला. २०२४ ने बॉलिवूडला संमिश्र यश दिलं. त्यामुळे आता नव्या वर्षाकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे.

◆◆◆

## नव्याची नवलाई

प्रत्येक वर्षात बॉलिवूडमध्ये नव्या कलाकारांचं आगमन होत असतं. स्टारकिड्सी अभिनय क्षेत्रात पदार्पण करतात. त्यामुळे पडद्यावर कोणती नवी जोडी पहायला मिळणार, याची प्रेक्षकांनाही उत्सुकता असते. यंदाही अनेक नवे चेहरे रुपेरी पडद्यावर आले. त्यातल्या काहींनी लक्ष वेधलं तर काहींनी आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना प्रभावित केलं.

यंदाच्या वर्षात अनेक नव्या कलाकारांनी अभिनयक्षेत्रात पदार्पण केलं. त्यात काही स्टारकिड्सचाही समावेश आहे. आमीर खानचा मुलगा जुनैद खान वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत अभिनय क्षेत्रात आला. त्याने 'महाराजा'मधून प्रभावी अभिनयाचं दर्शन घडवलं. महाराजा ओटीटीवर प्रदर्शित झाला असला तरी जुनैदच्या अभिनयाचं खूपच कौतुक झालं. तो लंबी रेस का घोडा असल्याचं महाराजातल्या अभिनयातू दिसून आलं. येत्या काळात जुनैद खुशी कपूरसोबत एका चित्रपटात दिसणार आहे. जुनैद वडिलांचा वारसा चालवणार का हे पाहण्याची प्रेक्षकांना उत्सुकता आहे. 'लापता लेडिज' हा चित्रपट खूप गाजला. एक सामाजिक विषय विनोदी पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न यातून करण्यात आला होता. 'लापता लेडिज' ऑस्करच्या शर्यतीत आहे. यातली 'फूल' ही व्यक्तिरेखा प्रेक्षकांना भावली. नितांशी गोयलने ही व्यक्तिरेखा साकारली होती. तिने पदार्पणातच आपल्या अभिनयाचे सर्वांचं लक्ष वेधलं. 'मुंज्या' या चित्रपटात अभय वर्मा रसिकांसमोर आला. हा चित्रपट यशस्वी ठरलाच शिवाय अभयच्या अभिनयाचंही खूप कौतुक झालं. लक्ष्य हा अभिनेता 'किल'मध्ये झळकला. हृतिक रोशनची चुलत बहीण पश्मिना रोशननेही यंदा बॉलिवूड पदार्पण केलं. 'इश्क विश्क रिबाउंड'मध्ये ती झळकली. पश्मिना सुंदर असली तरी तिचा अभिनय मात्र प्रेक्षकांना फारसा भावला नाही. हा चित्रपटही बॉक्स ऑफिसवर आपटला. त्यामुळे येत्या काळात तिच्या कामाकडे सर्वांचं लक्ष असेल. वरुण धवनची पुतणी अंजिनी धवननेही बॉलिवूडमध्ये पाऊल ठेवलं. ती धवन कुटुंबाचा वारसा चालवायला सज्ज झाली आहे. 'बिन्नी अँड फॅमिली'तून तिने पदार्पण केलं. अंजिनीच्या अभिनयाचं कौतुक झालं.



◆◆◆

## वैविध्यपूर्ण वेब सिरिजची चलती



गेल्या काही वर्षांत ओटीटीने प्रेक्षकांवर जादू केली आहे. वैविध्यपूर्ण विषयांवरील वेब सिरिज आणि चित्रपट पाहण्याची संधी ओटीटीने उपलब्ध करून दिली आहे. ओटीटीने अनेक कलाकारांच्या कारकिर्दीला नवी दिशा दिली. यंदाच्या वर्षातली बऱ्याच दर्जेदार वेबसिरिजने प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. या वर्षातल्या काही गाजलेल्या वेब सिरिजवर एक नजर टाकू या. यंदाही प्रेक्षकांना ओटीटीवर वैविध्यपूर्ण विषय पाहता आले. विनोदाचा तडका तर होताच शिवाय ॲक्शन, थ्रिलर तसंच सामाजिक विषयांवरील वेब सिरिजचीही धूम होती. काही वेब सिरिजनी प्रेक्षकांचं निखळ मनोरंजन केलं. 'शेखर होम' ही वेब सिरिज चांगलीच गाजली. या वेब सिरिजमधून एक वेगळा, मनोरंजन विषय प्रेक्षकांसमोर आला. 'शेरलॉक होम्स'वर बेतलेल्या या वेब सिरिजमध्ये शेखर होम हे प्रमुख पात्र आहे. केके मेननने ही भूमिका केली आहे. विविध गुंते सोडवणाऱ्या शेखरच्या आयुष्यात अनेक बदल घडतात. विविध घटनांची उकल तो कशी करतो, हे पाहणंही उत्सुकतेचं ठरतं. केके मेननसोबतच रणवीर शौरीनेही या सिरिजमध्ये उत्तम अभिनयाचं दर्शन घडवलं आहे. बालाकोटच्या हल्ल्यांवर आधारित 'रणनीती : बालाकोट अँड बियाँड' हे वेब सिरिजही चांगलीच भाव खाऊन गेली. २०१९ च्या पुलवामा हल्ल्यानंतर झालेल्या बालाकोट हवाई हल्ल्यांची कथा या वेब सिरिजमधून उलगडते. यानिमित्ताने एक वेगळाच थरार प्रेक्षकांना अनुभवायला मिळतो. भारतीय औषध उद्योगाचं वास्तव लोकांमुळे आणण्याचा प्रयत्न 'पिल' या वेब सिरिजमधून केला गेला. यात रितेश देशमुखची प्रमुख भूमिका आहे. २०२० मध्ये 'पंचायत' ही वेब सिरिज ओटीटीवर आली. तेव्हापासूनच या सिरिजने प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेतला आहे. फुलोरा गावात पंचायत सचिव म्हणून कार्यरत असणाऱ्या अभिषेक त्रिपाठीची कथा यात पहायला मिळते. 'मर्डर इन माहिम' ही थरारक मालिकाही यंदा लक्षवेधी ठरली. 'हिरामंडी' ही यंदाची सर्वाधिक गाजलेली वेब सिरिज. स्वातंत्र्यपूर्व काळातल्या घटना दाखवणारी ही वेब सिरिज खूपच भव्यदिव्य होती. संजय लीला भन्साळी दिग्दर्शित या सिरिजची यंदा खूपच चर्चा झाली. 'गुल्लक ४' ही काहीशी हलकीफुलकी वेब सिरिज प्रेक्षकांना भावली. 'गुल्लक'चा प्रत्येक हंगाम प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यात यशस्वी ठरला आहे. 'फ्रीडम ॲड मिडनाईट' ही सुद्धा यंदाची लक्षवेधी वेब सिरिज. निखिल अडवाणी दिग्दर्शित ही वेब सिरिज भारताच्या फाळणीच्या घटनांना उजाळा देते. त्या काळात नेमकं काय घडलं, हे सांगण्याचा प्रयत्न या सिरिजमधून करण्यात आला आहे. 'त्रिभुवन मिश्रा : सीए टॉपर' ही वेगळ्या धाटणीची वेब सिरिजही प्रेक्षकांना भावली. दिव्येंदू भट्टाचार्यने 'पोचर'मधून अभिनय कौशल्य दाखवलं. त्रिशा कृष्णन या दाक्षिणात्य अभिनेत्रीने 'ब्रिंदा' या मालिकेतून ओटीटीवर पदार्पण केलं.

◆◆◆

## आशयघन चित्रपटांची नांदी



मराठी चित्रपटांमधून नेहमीच काहीतरी आशयघन पहायला मिळतं. विविधांगी विषयांवरील चित्रपट प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतात. मराठी जगतात काही चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगलं यश मिळवतात तर काहींचं फक्त कौतुकच होतं. यंदाही काही लक्षवेधी चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आले.

'नवरा माझा नवसाचा २', 'धर्मवीर', 'जुनं फर्निचर', 'नाच गं घुमा'सारख्या चित्रपटांनी यंदा मराठी चित्रपटसृष्टी गाजवली. प्रत्येक वर्षी नवं काय पहायला मिळणार याची मराठी प्रेक्षकांना नेहमीच उत्सुकता असते. मराठीतल्या दर्जेदार कलाकारांचा अभिनय पाहण्यास मराठी प्रेक्षक नेहमीच आसुसलेला असतो. अर्थात मराठी चित्रपट आशयघन असला तरी त्याला बॉक्स ऑफिसवर यश मिळतंच असं नाही. काही चित्रपटांचं फक्त कौतुक होतं. काही चित्रपट पुरस्कार मिळवता तर काही परदेशी चित्रपट महोत्सव गाजवतात. यंदा 'नवरा माझा नवसाचा २', 'धर्मवीर', 'जुनं फर्निचर', 'नाच गं घुमा' या चित्रपटांना बॉक्स ऑफिसवर चांगलं यश मिळवलं. 'नवरा माझा नवसाचा २' बद्दल खूपच उत्सुकता होती. सचिन आणि सुप्रिया पिळगावकर ही जोडी अनेक वर्षांनी रुपेरी पडद्यावर एकत्र दिसली. स्वप्निल जोशी तसंच अन्य नावाजलेल्या कलाकारांमुळे 'नवरा माझा नवसाचा २' बद्दलची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. चित्रपटाने २० कोटी रुपयांच्या आसपास कमाई केली. आनंद दिघे यांच्या आयुष्यावर बेतलेल्या 'धर्मवीर'ने प्रेक्षकांना आपलंसं केलं होतं. या चित्रपटाचा सीक्वेल म्हणजेच 'धर्मवीर २'चीही प्रेक्षकांना उत्कंठा होती. चित्रपटाने १५ कोटी रुपयांचा गल्ला जमवला. महेश मांजरेकर यांचा जुनं फर्निचर हा चित्रपटही लक्षवेधी ठरला. ज्येष्ठ नागरिकांचा नाजूक विषय काहीशा मनोरंजन पद्धतीने प्रेक्षकांसमोर आला. चित्रपटातल्या सर्वच कलाकारांनी उत्तम अभिनयाचं दर्शन घडवलं. जुनं फर्निचरनेही बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली. मराठी संगीतसृष्टीला पडलेलं एक सुरेल स्वप्न म्हणजे सुधीर फडके. सुधीर फडके यांच्या आयुष्यावर आधारित 'स्वरगंधर्व' चित्रपटालाही प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला. सुनील बर्वेने बाबूजींची व्यक्तिरेखा साकारली होती. त्याच्या अभिनयाचंही खूप कौतुक झालं. 'नाच गं घुमा' हा सुद्धा यंदाचा लक्षवेधी चित्रपट. घरकाम करणाऱ्या महिलांचा प्रश्न या चित्रपटातून प्रभावी पद्धतीने मांडण्यात आला. चित्रपटाला विनोदाची फोडणी असल्यामुळे महिलावर्गाला हा चित्रपट भावला. प्राजक्ता माळी आणि गश्मीर महाजनी यांच्या 'फुलवंती' या चित्रपटानेही प्रेक्षकांची मनं जिंकली. यासोबतच 'घरत गणपती', 'ओले आले', 'शिवबाचा छावा', 'अल्याड पल्याड', 'सत्यशोधक', 'अलिबाबा आणि चाळीशीतले चोर', 'पाणीपुरी', 'खुर्ची', 'सापळा', 'सूर लागू दे','श्रीदेवी प्रसन्न', 'रानटी'सारख्या चित्रपटांनी आपली छाप सोडली.

◆◆◆

## बोलबाला राजकुमार रावचा

यंदाचं वर्ष राजकुमार रावसाठी खूपच चांगलं गेलं. त्याचा 'स्त्री २' तर तुफान गाजलाच शिवाय त्याच्या अन्य चित्रपटातल्या अभिनयानेही प्रेक्षकांची मनं जिंकली. राजकुमारचे यंदा चार चित्रपट प्रदर्शित झाले. राजकुमार रावने 'श्रीकांत' चित्रपटातून आगळी वेगळी भूमिका साकारली. या चित्रपटाने ५० कोटी रुपयांचा व्यवसाय केला. 'विकी विद्या का वो वाला व्हिडिओ' चित्रपटही चर्चेत राहिला. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर सरासरी यश मिळवलं. तृप्ती डिमरी आणि राजकुमार रावची जोडी प्रेक्षकांना खूप भावली. राजकुमार राव आणि जान्हवी कपूरचा 'मिस्टर अँड मिसेस माही' हा चित्रपटही लक्षवेधी ठरला. चित्रपटाने बऱ्यापैकी कमाई केली.

◆◆◆





## पीसी करतेय कमबॅक!

प्रियांका चोप्राने आंतरराष्ट्रीय स्तरावर नाव कमावलं आहे. गेल्या काही वर्षांत तिने बॉलिवूडपट केलेला नाही. त्यामुळे भारतातल्या चाहत्यांना तिची कमतरता जाणवते. प्रियांकाने लवकरच एखादा हिंदी चित्रपट करावा, अशी त्यांची इच्छा आहे. चाहत्यांची ही इच्छा नव्या वर्षात पूर्ण होऊ शकते. मध्यंतरी झालेल्या एका मुलाखतीत तिने याबाबत भाष्य केलं. भारत माझ्या हृदयात असून मी माझी मूळं कधीच विसरू शकत नाही. मी लवकरच हिंदी चित्रपटात दिसू शकते, असं तिने म्हटलं आहे. त्यामुळे हिंदी चित्रपटात काम करण्याबाबत प्रियांकाची बोलणी सुरू आहेत, असा कयास लावण्यात आला आहे. म्हणूनच आता पीसीच्या अधिकृत घोषणेकडे सगळ्यांचं लक्ष लागून राहिलं आहे.

◆◆◆



## उत्सुकता 'सिकंदर' च्या टीझरची

सलमान खानच्या चाहत्यांना त्याच्या चित्रपटांबद्दल प्रचंड कुतुहल असतं. भाईजान रुपेरी पडद्यावर कधी दिसणार याचीच त्याचे चाहते वाट बघत असतात. सिकंदर या त्याच्या आगामी चित्रपटाबद्दल प्रेक्षकांना उत्सुकता आहे. गेल्या वर्षी त्याचा 'टायगर ३' प्रदर्शित झाला होता. त्यानंतर तो रुपेरी पडद्यावर दिसलेला नाही. त्यामुळे प्रेक्षक 'सिकंदर'ची आतुरतेने वाट बघत आहेत. यात रश्मिका मंदाना सलमानची नायिका असेल. या चित्रपटाचा टीझर लवकरच प्रदर्शित होणार आहे. त्यामुळे प्रेक्षकांमध्ये उत्साहाचं वातावरण आहे.

◆◆◆

# गृह विभागाच्या नवीन संकेतस्थळाचे अनावरण



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :
महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे अनावरण करण्यात आले. home.maharashtra.gov.in या नावाचे अद्ययावत असे संकेतस्थळ आता माहितीजालकावर उपलब्ध झाले आहे.

मुख्यमंत्र्यांच्या रामगिरी शासकीय निवासस्थानी झालेल्या गृह विभागाच्या बैठकीत संकेतस्थळाचे अनावरण झाले. या बैठकीस राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ आए. एस. चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ श्रीकर परदेशी तसेच विविध विभागांचे अतिरिक्त सचिव, प्रधान सचिव तसेच गृह विभाग, पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# निवडणुकीनंतर महापुरूष बदलणे ही तर भाजपची फॅशन!

## वडेट्टीवारांची टीका



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :
केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राज्यसभेत संविधानावरील चर्चेदरम्यान मंगळवारी एक टिप्पणी केली. परंतु, ही टिप्पणी आता वादात अडकली आहे. या टिप्पणीवरून काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी जोरदार टीका केली आहे. निवडणुकीपूर्वी - निवडणुकीनंतर आपले महापुरुष आणि देव बदलणे ही भाजपची फॅशन असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

आजकाल आंबेडकरांचे नाव सारखे सारखे घेणे ही फॅशन झाली आहे. आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर असा जप काही लोक करत असतात. एवढ्या वेळा जर देवाचे नाव घेतले असते, तर सात जन्मांसाठी स्वर्ग मिळाला असता, असे विधान अमित शहा यांनी केले होते. आंबेडकरांचे नाव तुम्ही 100 वेळा जरी घेतले, तरी तुम्हाला आंबेडकरांविषयी काय वाटते, हे मी सांगतो, असेही अमित शहा म्हणाले. त्यांच्या विधानामुळे आता नवीन वादाला तोंड फुटले आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी अमित शहा यांच्या विधानावरून भाजपवर निशाणा साधला आहे. निवडणुकीपूर्वी - निवडणुकीनंतर आपले महापुरुष आणि देव बदलणे ही भाजपची फॅशन असल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली. भारतरत्न डॉ.आंबेडकर यांनी भारतात समतेचा स्वर्ग निर्माण केला, त्यामुळे आम्ही आंबेडकरांचे नाव घेतो आणि घेत राहणार, असे ते म्हणाले. सामान्य जनतेला आपले अधिकार आणि हक्क देणाऱ्या संविधान निर्माते बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेणे ही सन्मान आणि अभिमानाची गोष्ट आहे, असेही विजय वडेट्टीवार म्हणाले.

दरम्यान, अमित शहा यांनी केलेल्या वक्तव्यामुळे नवीन वादाला तोंड फुटले आहे. अमित शहा यांनी देशाची माफी मागावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी किती राग आहे, हे अमित शाह यांच्या विधानावरून कळून येते, अशी टीका काँग्रेसने केली आहे.

# मी नाराज नाही...

## आ. पडळकर



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :
भाजपने मंत्रिपद न दिल्याने नाराज असल्याची चर्चा असलेले आमदार गोपीचंद पडळकर बुधवारी विधान भवन परिसरात आले. त्यांनी येथे पत्रकारांपुढे आपली भूमिका स्पष्ट करत पुढे काय करणार हे सांगितले.

गोपीचंद पडळकर म्हणाले, माझ्या चेहऱ्यावर तुम्हाला नाराजी वाटते का? भाजपने प्रथम मला विधान परिषद काम करण्याची संधी दिली. त्याचं मी सोनं केलं. यावेळी महाराष्ट्रातील सर्वसामान्य लोकांचे अनेक प्रश्न विधान परिषदेमध्ये लावून धरले. विधान परिषदेच्या बाहेर रस्त्यावरची सुद्धा लढाई लढली. यंदा मला पक्षाने विधानसभेची जत म्हणून उमेदवारी दिली. येथील जनतेने मला चाळीस हजार मताधिक्याने निवडून दिले. आता मी नाराज असण्याचा प्रश्नच नाही. लोकांच्या भावना होत्या, की मला मंत्री पद मिळावं. परंतु पक्षाने जो निर्णय घेतला तो निर्णय मला मान्य आहे.

मी इथून पुढे राज्यातील धनगर समाजाचा आरक्षणाचा प्रश्न, बहुजन समाज, ओबीसी, भटके विमुक्त समाजासाठी, हिंदू धर्म आणि हिंदुत्वासाठी मी पूर्णवेळ काम करणार आहे. त्यामुळे नाराजीचा प्रश्न असणार नाही. कार्यकर्त्यांच्या भावना स्वाभाविक आहेत. धनगर समाजाला प्रतिनिधित्व मिळावे आशा त्यांच्या भावना होत्या. परंतु पार्टीने विचार करूनच निर्णय घेतला असेल. त्यामुळे कार्यकर्त्यांना माझी विनंती आहे, आपण पार्टीच्या समाजकार्यात आधीही होतो. आजही आहे आणि उद्याही असणार आहे. तेव्हा देवाभाऊ, नरेंद्र मोदींसोबत कालही होतो आजही आहोत उद्याही असणार आहे त्यामुळे कार्यकर्त्यांनी सुद्धा भाजपसोबत राहावे ही माझी विनंती

# नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त होणार!

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
दोन नियोजन व विकास प्राधिकरण असल्याने कामांना विलंब होतो आणि नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त करण्यात यावे, अशी मागणी पुन्हा भाजपने केली आहे. राज्यपालांच्या अभिभाषणाच्या चर्चेदरम्यान विधानसभेत प्रवीण दटके यांनी हा मुद्दा उपस्थित केला.



नागपूर सुधार प्रन्यास हे ब्रिटिशकालीन विकास प्राधिकरण आहे. प्रन्यासचे अस्तित्व संपुष्टात आणण्याचा निर्णय युती सरकारने २०१९ मध्ये घेतला होता. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रन्यास बरखास्त करून शहराचा विकास करण्याचे पूर्ण अधिकार महापालिकेला दिले होते.

त्यानंतर महाविकास आघाडीचे सरकार आले. त्यांनी प्रन्यासला पुनर्जीवित करून त्याला पुन्हा नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित करण्याची घोषणा तत्कालिन पालकमंत्री डॉ. नितीन राऊत यांनी केली होती.

नासुप्र बरखास्त करण्यासाठी आमदार असताना देवेंद्र फडणवीस यांनी न्यायालयात याचिका देखील केली होती. दिवंगत विलासराव देशमुख यांच्या काळात २००३ रोजी नागपूर मेट्रो रिजन जाहीर झाले. त्यानंतर नासुप्र बरखास्त करण्याच्या मागणीने जोर धरला.

फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर २०१९ मध्ये नासुप्र बरखास्त करण्याची घोषणा केली होती. परंतु महाविकास आघाडीने नासुप्र बरखास्त न करण्याचा निर्णय घेतला. आता पुन्हा फडणवीस मुख्यमंत्री आहेत आणि भाजपचे प्रवीण दटके यांनी नासुप्र बरखास्तीची मागणी केली आहे.

# भाजपचा राग बाहेर.. पटोले



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा ज्या पद्धतीने उल्लेख केला तो अत्यंत आक्षेपार्ह आहे. त्यांच्या वक्तव्यातून भाजपचा संविधान निर्मात्यांबाबतचा राग बाहेर आला, अशी टिका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.

विधिमंडळ परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलेल्या विधानाचा काँग्रेस पक्ष जाहीर निषेध करत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वांना जगण्याचा, व्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार दिला, त्यामुळेच आपण सर्वजण स्वाभिमानाने आपल्या देशात नांदत आहोत. भारतीय जनता पक्षाच्या मनात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल जी खदखद आहे तीच त्यांच्या बोलण्यातून व्यक्त झाली आहे. अमित शाह यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याने त्यांनी देशाची जाहीर माफी मागावी, अशी मागणीही नाना पटोले यांनी केली.

# इमामवाड्यात भीषण स्फोट : पती-पत्नी व २ मुले जखमी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
कुटुंब साखर झोपेत असताना अचानक स्फोट होऊन आगीचा भडका उडाला. यात पती-पत्नी व त्यांची दोन मुले गंभीररित्या होरपळली. सर्व जखमींना उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

जखमींमध्ये सुरेंद्र पाल, रमा सुरेंद्र पाल आणि त्यांच्या दोन मुलांचा समावेश आहे. ही खळबळजनक घटना बुधवारी पहाटे 3.30 वाजताच्या सुमारास इमामवाडा पोलिस ठाण्यांतर्गत घडली. इमामवाडा पोलिस घटनास्थळी दाखल झाले. बॉम्ब शोधक व नाशक पथकासह श्वान पथकालाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले. मात्र, स्फोट नेमका कशामुळे झाला, याचा अद्याप शोध लागला नाही.

सुरेंद्र पाल हे पत्नी रमा, ११ वर्षांची मुलगी व १३ वर्षांच्या मुलासह इमामवाड्यातील आयसोलेशन रुग्णालयाजवळ राहतात. पाणीपुरी विक्री करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. नेहमीप्रमाणे मंगळवारी रात्री सर्वांनी सोबत जेवण केले आणि झोपी गेले. पहाटे स्वयंपाक खोलीत अचानक स्फोट होऊन आगीचा भडका उडाला. या स्फोटात पती-पत्नीसह दोन्ही मुले गंभीररित्या होरपळली.

**अग्निशमन विभागाला दिले पत्र**

नेमका स्फोट कशामुळे झाला, याचा शोध घेण्यासाठी इमामवाडा पोलिसांसह बीडीडीएस आणि श्वान पथकाने घटनास्थळी पाहणी केली. तसेच तपासणी करण्यासाठी अग्निशमन विभागालाही पत्र दिले आहे. स्फोटाचे कारण अद्याप समजू शकले नाही.

# राम शिंदे यांचा उमेदवारी अर्ज दाखल



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
विधान परिषदेच्या सभापतिपदाची निवडणूक 19 डिसेंबर रोजी घेण्याचे जाहीर करण्यात आले. विधानसभा अध्यक्षापाठोपाठ या पदावरही भाजप दावा केला आहे. भाजप नेते नेते राम शिंदे यांचे नाव भाजपने जाहीर केले असून त्यानुसार आज त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.


यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील उपस्थित होते. विधान परिषदेच्या सभापतीपदी राम शिंदे यांची निवड निश्चित मानली जात आहे.

# अशोक चौकात वाहतुकीची कोंडी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
शहरातील अत्याधिक गजबजलेल्या अशोक चौकात रस्ता रूंदीकरण आणि उड्डाण पुलाचे काम सुरू असून, कामावरील मोठे यंत्र, जड वाहने रस्त्यालगत उभे राहत असल्याने वाहतुक कोंडी होत आहे. या भागात बसेस आणि अन्य वाहने बराच वेळ अडकून पडतात.

: लोकसेवार्थ :

# वन्यजीवांच्या माहिती संकलनासाठी प्राणीमित्र ॲप



मुंबईमध्ये सुमारे १००हून अधिक प्राणीमित्र संस्था आणि व्यक्ती आहेत. मुंबईच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या प्राण्यांच्या सुटकेच्या समस्यांवर ते काम करतात. मात्र याची एकत्र माहिती वनविभागाकडे नाही.

कोणत्या प्राण्याची कोणत्या भागातून सुटका केली, किती प्राण्यांना जीवदान मिळाले, त्यांना मुंबईच्या नेमक्या कोणत्या भागात सोडण्यात आले अशी माहिती किमान प्राणीमित्रांना आणि वनविभागाला तरी एकत्रित स्वरूपात मिळावी यासाठी जैवविविधता दिनाच्या निमित्ताने एक ॲप लॉंच करण्यात आले आहे. 'प्राणी मित्र' असे त्याचे नाव असून, सध्या ते प्राणीमित्र संघटना आणि व्यक्तींसाठी उपलब्ध असेल.

या ॲपच्या पहिल्या टप्प्यामध्ये मुंबई आणि ठाण्यातील प्राणीमित्र संघटना आणि व्यक्तींचे नेटवर्किंग निर्माण करण्यात आले आहे. प्राणीमित्र संस्था आणि व्यक्तींना ॲप लॉंचिंगच्या वेळी आयडी आणि पासवर्ड देण्यात येईल. त्यानंतर वन्यप्राणी, पक्षी यांच्या सुटकेची माहिती त्यांनी त्यावर अपलोड करणे अपेक्षित आहे.

या ॲपच्या माध्यमातून या प्राणीमित्रांसाठी प्राण्यांच्या सुटकेची प्रक्रिया अधिक सोपी होईल, असे ठाण्याचे मानद वन्यजीवरक्षक पवन शर्मा यांनी सांगितले.

प्राणीमित्रांना ॲपवर स्थान मिळण्यापूर्वी त्यांची माहिती आणि त्यांचा इतिहास तपासण्यात येणारा आहे. सुटका केलेल्या प्राण्यांची शिकार होण्याची शक्यता असल्याने यासंदर्भात संपूर्ण काळजी घेतली जाणार असल्याचे ठाणे प्रादेशिक वनविभागाचे सहाय्यक वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी सांगितले.

वन्यप्राण्यांना निर्माण होणाऱ्या धोक्यामुळेच ही माहिती सध्या तरी सामान्यांसाठी खुली केली जाणार नाही. मात्र

लोकजागर

काही काळाने यातील काही पारदर्शी पद्धतीने जनसामान्यांसाठी खुली केली जाईल, असेही ते म्हणाले.

आतापर्यंत कोणत्याही प्राण्याची सुटका करताना त्यासंदर्भात वनविभागाच्या नियंत्रण कक्षाला माहिती कळवणे, त्यानंतर तिथून ती माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडे जाणे, त्यानंतर पुढे कार्यवाही होणे अशी प्रक्रिया लांबत होती. मात्र या ॲपमुळे वनविभागाच्या अधिकाऱ्यांना लगेच माहिती उपलब्ध होऊन कार्यवाहीतील विलंब टळेल. हे सर्व प्राणीमित्र एका छताखाली आल्याने त्यांना एकमेकांची मदत होईल.

■ ■

**शब्दार्थ**

**OPD**

O P D (Out Patient Department) म्हणजे बाह्य रुग्ण विभाग. जेथे आंतररूग्ण म्हणजेच ॲडमिट नसलेल्या रुग्णांची तपासणी करून योग्य तो सल्ला दिला जातो व प्राथमिक उपचार केले जातात. हे असे क्षेत्र आहे जेथे रुग्ण डॉक्टरांचा सल्ला घेऊ शकतात आणि नंतर परत जाऊ शकतात, त्यांना वार्डमध्ये राहण्यास किंवा प्रवेश करण्यास सांगितले जात नाही आणि जर त्या ट्रीटमेंट ने फरक पडत नसल्यास त्याला ईंटरनल फिजीकल डिपार्टमेंट म्हणजेच ॲडमिट करून गरज असलेल्या पुर्ण टेस्ट करुन ट्रीटमेंट दिली जाते. ■

अक्षरधारा

# पुणे आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सवाचा दुसरा दिवस गाजला विचारप्रवर्तक संवादाने

पुण्यासारख्या पुण्यनगरीत संपन्न झालेल्या आंतरराष्ट्रीय साहित्य महोत्सवाचा दुसरा दिवस अनेक विचारप्रवर्तक अशा संवाद मैफिलिने गाजला.

याच महोत्सवात एक चर्चासत्र लेखिका शालिनी मोदी यांच्या रस आणि देवत्व जगाला बांधून ठेवणारी उर्जा समजून घेणे या विषयवार त्यांच्या दैवी नातेसंबंधातील रस या पुस्तकावर आधारित होते.प्रख्यात लेखिका, इतिहासकार आणि कला क्युरेटर डॉ. अलका पांडे यांनी लेखिका शालिनी मोदी आणि सुप्रसिध्द नृत्यांगना, शिक्षिका सोहिणी रॉय चौधरी यांच्याशी मुक्त संवाद साधला.

या चर्चासत्रात दैवी नाते संबंधांच्या भिंगातून विविध रस आणि भावनांचा अर्थ लावला गेला.

लेखिका शालिनी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, श्रृंगार रस हा भगवान विष्णू आणि देवी लक्ष्मी यांच्यासाठी समृद्धीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आणि तितकाच आवश्यक रस आहे.

शालिनी आणि डॉ. अलका पांडे यांनी रौद्र रसाच्या सकारात्मक आणि नकारात्मक बाजूंवर लक्ष केंद्रित करतानाच हास्य रसाने प्रेक्षकांना आकर्षित केले.

या चर्चासत्रात भागवत पुराणातील गोपी आणि भगवान कृष्ण यांच्या संवादाचे वाचन करताना कृष्णाच्या खोड्या या केवळ एका लहान मुलाची शुल्लक कृती नव्हती तर गोपिना गुदगुल्या करून काहीतरी शिकविण्याचा आणि जीवनातील महत्वाचे धडे देण्याचा कृष्णाचा यामागे हेतू होता.

जेंव्हा त्यांच्यात अभिमान निर्माण झाला तेंव्हा त्याने गायब होऊन गोपीना वेड्यासारखे वागवले या गोपी नदीत स्नान करत होत्या तेंव्हा त्यांच्या मूर्खपणाचे स्मरण करून देण्यासाठी त्यांचे कपडे कृष्णाने चोरले.एकूणच, श्रोत्यांच्या प्रश्नांना मान्यवर लेखिकांनी दिलेल्या उत्तराने या सत्राची सांगता झाली. ■ ■




: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# विधान भवनाच्या द्वारावर अपंग बांधवांचा थांबा




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :
विदर्भ विकलांग संघर्ष समितीच्या बॅनरखाली अपंग बांधवांनी बुधवारी विविध मागण्यांसाठी दुपारी दोन वाजता विधानभवनाच्या द्वारावर दुचाकीसह येऊन ठिय्या आंदोलन सुरू केले. त्यामुळे येथील प्रवेश थांबवण्यात आल्याने तणाव निर्माण झाला होता.

संतप्त आंदोलकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घालून देण्याची मागणी केली. त्यांच्याशी भेट होऊन मागणी पूर्ण होईस्तोवर आंदोलन मागे घेणार नसल्याची त्यांचा हट्ट होता. लाडक्या बहीण योजनेप्रमाणेच अपंग बांधवांनाही सन्मानजनक मानधन देण्याची मागणी त्यांनी लावून धरली. आंदोलकांनी सरकार केवळ आश्वासन देते, मागणी पूर्ण करत नसल्याचे सांगत संताप व्यक्त केला. यावेळी आंदोलकांनी संजयगांधी निराधार योजनेच्या लाभ फक्त अपंगांसाठी ६,००० रुपये प्रतिमाह करण्यात यावा, प्रत्येक शहर बस स्टॉपच्या बाजुला किमान ६७८ स्के. फूटाचे अस्थायी व्यवसाय स्टॉल अपंगांसाठी बनवून देण्यात यावे, यासह अनेक मागण्या अपंग संघटनेच्या वतिने करण्यात आल्या. काही वेळाने त्यांनी काढता पाय घेतला.

## बाऊन्सरवर कायदेशीर कारवाई करा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :
शेतकऱ्यांना दमदाटी करणाऱ्या पवनचक्की कंपनीवर राज्य सरकारने कारवाई करावी अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी केली.

धाराशिव जिल्ह्यामध्ये मागील काही वर्षांपासून पवनचक्की उभारण्याचे काम मोठ्या प्रमाणात सुरु झाले आहे. त्यासाठी आवश्यक जमिनी घेताना कंपनीच्या लोकांकडून दहशत निर्माण करून शेतकऱ्यांना दमदाटी करण्याचे प्रकार वाढले आहेत. मेसाई गावात काळ्या रंगाच्या दहा ते बारा गाड्या आल्या. त्यातून बाऊन्सर उतरले व त्यांनी शेतकऱ्यांना दमदाटी केल्याचं समोर आलं आहे. पवनचक्की कंपनीचे गुंड दहशत निर्माण करत असल्याचे ते म्हणाले.



महासागर
नागपूर
वृत्तसागर
■ गुरुवार, दि. १९, डिसेंबर २०२४ ■

# 'अभिजात मराठीचा ' फुलला मोगरा

## खासदार सांस्कृतिक महोत्सवाचा सहावा दिवस प्रतिभा आणि प्रतिमांनी अलंकृत





### संघ गितांद्वारे राष्ट्र आराधना

कार्यक्रमाच्या प्रथम सत्रात शाम देशपांडे व चमुतर्फे संघ गितांद्वारे राष्ट्र आराधना करण्यात आली. ज्या भूमीत राम, कृष्णालाही जन्म घ्यावासा वाटला, त्या आपल्या देशाप्रती निस्सीम भक्ती व्यक्त करणारी गीतमाला याप्रसंगी सादर झाली. मातृभूमी के प्रतीक हम, चंदन है इस देश की माटी, सूरसंगम - तालसंगम, वंदेमातरम, देश में चरित्र की महानता रहे, हम भारत की नारी है, जननी जन्मभूमी या देशभक्तीपर गीतांनी रसिक मन ओथंबून गेले. कार्यक्रमाचे निवेदन श्वेता गर्गे यांनी केले. विजय बोरीकर, प्रा. प्रशांत पांडवकर, जयंत आणि प्रशांत उपगडे, छाया वानखेडे, वैशाली उपाध्ये, माधवी पळसोकर, सीमा सराफ, अश्विनी लुले, प्रतीक्षा पट्टलवार, निधी रानडे, आकांक्षा चारभाई, मनीषा कुळकर्णी, सौरभ किल्लेदार, अभिजित बोरीकर, श्रीधर कोरडे, गजानन रानडे, योगेश हिवराळे यांचा गायन, वादनात सहभाग होता. खासदार सांस्कृतिक समिती तर्फे ना. नितीन गडकरी यांच्या हस्ते कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या व कलागुणांचा संगम असलेल्या खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या आज, सहाव्या दिवशी विचारांची आशयघनता असलेल्या अभिजात मराठीचा मोगरा फुलला. निमित्त होते अभिजात मराठी - संगीत, नृत्य आणि साहित्य यांचा त्रिवेणी संगम असलेला भव्य सांगीतिक कार्यक्रमाचे.

हनुमाननगरातील क्रीडा चौक येथील ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या पटांगणात हा महोत्सव सुरू आहे. याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, संस्कार भारतीच्या प्रमुख कांचन गडकरी, ना. पंकज भोयर, आ. सुधीर गाडगीळ, आ. अमर महाडिक, डॉ. विकास महात्मे, तरुण भारतचे संचालक धनंजय बापट, नवराष्ट्रचे संपादक संदीप भारंबे , माजी खा. अजेय संचेती आदी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

भाषेची प्राचीनता, अखंडता, मौलिकता या आधारे भाषेला अभिजात दर्जा दिला जातो. मराठी अभिजात होतीच फक्त आता तिच्यावर शासनाची मोहर उमटली आहे. त्या मराठी भाषेला आपल्या प्रतिभा आणि प्रतिमेने अधिकच अलोकिक सौंदर्य प्रदान करणारे संत ज्ञानेश्वर, चार्वाक, संत एकनाथ, तुकारामांपासून ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे, वि. वा. शिरवाडकरांपर्यंत सर्वांना मानाचा मुजरा करणा-या या कार्यक्रमात अजित परब, मुग्धा वैशंपायन, सावनी रविंद्र, संकर्षण क-हाडे, आनंद इंगळे, भार्गवी चिरमुले, नंदेश उमप यांनी सहभाग घेतला होता. ओम नमोजी आद्या, मोगरा फुलला, आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने, खेळ मांडियेला वाळवंटी बाई, एकनाथांचे ओघवते भारुड, छत्रपती शिवरायांची महती सांगणारा तडफडदार पोवाडा, हळुवार अभंग, देवीच्या उपकार स्तवनाचा विधी - गोंधळ, श्रुतीप्रिय नाट्यगीते, गीत रामायण, जयोस्तुते, प्रसिद्ध चित्रपट गीते, शृंगारिक लावणी या कलाकारांनी प्रभावीपणे सादर केली. मराठी भाषेचा गोडवा सांगणारी 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' या कविवर्य सुरेश भट यांच्या कवितेने या दजेर्दार, रसाळ कार्यक्रमाचा समारोप झाला. कार्यक्रमाचे निवेदन गिरीजा ओक गोडबोले, संकर्षण कऱ्हाडे यांनी तर संहिता लेखन ऋषिकेश जोशी यांनी केले होते.

उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब कुळकर्णी व रेणुका देशकर यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत खासदार सांस्कृतिक महोत्सव आयोजन समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, अशोक मानकर, दिलीप जाधव, कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी, डॉ. दीपक खिरवडकर, आशिष वांदिले, सीए संजय गुळकरी यांनी केले.

### आज महोत्सवात

गुरूवार, १९ रोजी सकाळी ७ वा. भक्तिमय वातावरणात गजानन विजय ग्रंथ पठण व सायं. ६ वा. सितार वादक निलाद्रिकुमार यांचा साऊंड ऑफ इंडिया हा कार्यक्रम. तोफिक कुरेशी, राकेश चौरसिया, ओजस आढीया यांचा सहभाग आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल पार्कची नारा येथील १३० एकर जागा वाचविण्याकरिता

# आज विधानसभेवर विशाल मोर्चा

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार नागपूर सुधार प्रन्यास द्वारे नागपूर सुधार विकास आराखड्यामध्ये सन १९९६ साली नारा येथील १३० एकर जागा पार्क करीता आरक्षित करण्यात आली होती. शासनाच्या वतीने उल्लेखित जागा अधिगृहीत करण्याकरीता नागपूर सुधार प्रन्यासने दि. २६/०९/२००६ रोजी रू. ५,०३,००,०००/- (अक्षरी पाच कोटी तीन लाख रुपए फक्त) आणि दि. २०/०९/२०११ रोजी रू. ११,५०,०००/- (अक्षरी अकरा लाख पन्नास हजार रुपए फक्त) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) नागपूर यांचेकडे जमा केले. परंतु आजपर्यंत विषयांकित जमिनीचे भूसंपादन झालेले नाही. सन २००८ रोजी राजकीय हस्तक्षेपामुळे हा आंबेडकरी समाजाकरीता अस्मितेचा प्रतीक असलेला हा पार्क मागे पडल्याचे निदर्शनास आलेले आहे.

दि. १४ मार्च २०२४ व दि. ११ जुन २०२४ रोजी नारा पार्क विकासासाठी एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट ची जाहिरात वृत्तपत्रात प्रकाशित झाली.

त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल पार्क साठी राखीव असलेल्या ५२.६३ हेक्टर (१३० एकर) जागेचा उल्लेख आहे. या सदंर्भात मा. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांची समितीच्या सदस्यांनी प्रत्यक्ष भेट घेतली असता पार्क करीता प्रस्तावित असलेली जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या ताब्यात नसल्यामुळे नागपूर सुधार प्रन्यास काहीही करू शकत नाही असे नकारात्मक उत्तर मिळाले. तेव्हाच नियोजित पार्कसाठी १३० एकर (एकशे तीस एकर) जागा षडयंत्र पूर्वक बिल्डर च्या घशात घालण्याचा नागपूर सुधार प्रन्यासच्या अधिकाऱ्यांचा हेतु लक्षात आले.

२ १३० एकर पार्कची जागा नागपूर सुधार प्रन्यासच्या ताब्यात नाही तर मग कोणाच्या ताब्यात आहे? असे म्हणणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य ती करण्यात यावी. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल पार्क वाचविण्यासाठी पार्कच्या जागेवर दि. २ ऑक्टोबर २०२४ पासून बेमुदत साखळी उपोषण सुरू आहे. महाराष्ट्र शासनाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल पार्क ची जागा भूमाफिया कडून त्वरीत मुक्त करून नियोजीत जागेवर त्वरीत पार्कची निमीर्तीची प्रक्रिया सुरू करावी याकरिता दि. १९/१२/२०२४ रोजी हिवाळी अधिवेशन नागपूर विधानसभेवर विशाल मोर्चा आयोजित करण्यात आलेला आहे. मोचार्चे निवेदन मा. नगर विकास मंत्री महाराष्ट्र राज्य यांना देण्यात येईल. मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस , महाराष्ट्र राज्य, नागपूर चे असल्यामुळे विशेष लक्ष देवून न्याय दयावे.

विधानसभा नागपूर येथील मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल पार्क बचाव कृती समितीच्या वतीने काढण्यात येईल. सदर मोचार्ला बहुजन आंबेडकरवादी विविध संघटनांचा जाहीर समर्थन आहे. मोर्चा सकाळी ११.०० वाजता इंदोरा चौक ते विधान भवन नागपूर वर जाईल. जनतेचे जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे आज नागपूर विधान भवनावर धडक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

चर्मकार समाजाच्या न्यायविषयीचा प्रश्न हा महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अंतर्गत येत असुन चांभार, ढोर, होलार, मोची, अहिरवार इ. जातीची शैक्षणिक व आर्थिक प्रगती व्हावी यासाठी गरजवंताना विविध कर्ज उपलब्ध करून देणे. तसेच विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि इतर सुविधा उपलब्ध करून देणे हा शासनाचा उद्देश आहे.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी समाजकल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या नेतृत्वात दि.१२/०२/२०२४ व दि. ०१/१०/२०२४ रोजीच्या आझाद मैदान, मुंबई येथील मोर्चा वेळी शासनासोबत चर्चा झाली शासनाने बहुतांश मागण्या मान्य आहेत व त्याबाबत आदेश काढण्याचे कबुल केले परंतु अनेक महिने होऊनही कुठलेही निर्णय घेऊन अंमलबजावणी केली नाही. बजेट असुन देखील लाभ न देणे व समाजाला विविध योजनापासून वंचित ठेवणे हा सामाजिक अन्याय आहे तसेच गुन्हा देखील आहे. त्यामुळे गुरूवार दि. १९ डिसेंबर २०२४ ला नागपूर विधान भवनावर निर्णायक मोर्चा आयोजित केला आहे. मोर्चाचे नेतृत्व राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव घोलप, व माजी समाज कल्याणमंत्री, भानुदास विसावे राष्ट्रीय कार्याध्यक्ष, राष्ट्रीय महासचिव ज्ञानेश्वर काबळे, राष्ट्रीय अध्यक्ष महिला आघाडी,सरोजताई बिसुरे, राष्ट्रीय सचिव दत्तात्रय गोतिसे, राष्ट्रीय प्रवक्ता रविद्र राजुस्कर, प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड, डॉ. शांताराम कारंडे प्रदेशाध्यक्ष, लिलाधर कानोडे, प्रदेशाध्यक्ष महिला आघाडी,मिनाताई भागवतकर, विदर्भ अध्यक्ष संबा वाघमारे ,शहर अध्यक्ष,अनिल काटोले उपस्थित होते.




# आज शिक्षकांच्या समस्यांवर अधिवेशनात होणार आंदोलन

## विमाशि संघाचा पुढाकार : आजी, माजी शिक्षक आमदार करणार नेतृत्व

■ **महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १८ :** जाचक संचमान्यता, शिक्षकांची रिक्त पदे... शाळांमधील अशा विविध प्रलंबित समस्यांना वाचा फोडण्यासाठी राज्य विधीमंडळाच्या अधिवेशनावर धरणे आंदोलन केले जाणार आहे. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या पुढाकारात गुरुवारी १९ डिसेंबर रोजी हे आंदोलन होणार असून आजी-माजी शिक्षक आमदार त्याचे नेतृत्व करणार आहे.

विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे वतीने नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे शिक्षक आमदार तथा विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह सुधाकर अडबाले, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ मुंबईचे अध्यक्ष तथा माजी शिक्षक आमदार व्हि. यू. डायगव्हाणे, प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख यांचे नेतृत्वात खाजगी व स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत संचालित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, खाजगी अनुदानित विजाभज व अनुदानित आदिवासी आश्रम शाळांतील तसेच अध्यापक विद्यालयातील तसेच सर्व विभागातील इतर पात्र शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या सोडविण्याकरीता विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे वतीने हिवाळी अधिवेशना दरम्यान गुरूवार १९ डिसेंबर रोजी दुपारी १२ ते ४ वाजतापर्यंत यशवंत स्टेडियम, नागपूर येथे एकदिवसीय धरणे/ निदर्शने आंदोलन आयोजित केलेले आहे.

सदर धरणे आंदोलनात राज्यातील सर्व विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना तसेच सर्व विभागातील राज्य कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करणे, विना अनुदानित/ अंशतः अनुदानित शाळांना प्रचलित धोरणानुसार १०० टक्के अनुदान मंजूर करणे, संचमान्यताबाबतचा दिनांक १५ मार्च २०२४ चा अन्यायकारक शासन निर्णय रद्द करणे, राज्य कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांना १०-२०-३० वर्षाची आश्वासित प्रगती योजना लागू करणे, राज्यातील अघोषित शाळा व नैसर्गिक वाढीव तुकड्यांना अनुदानास पात्र घोषित करून आवश्यक निधीची तरतूद करण्यात यावी.

दत्तक शाळा योजना व कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याबाबतचा शासन निर्णय रद्द करणे, शिक्षकांची सर्व रिक्त पदे तात्काळ भरणे, काम नाही वेतन नाही हा आदिवासी विभागातील अन्यायकारक शासन निर्णय रद्द करणे, नगर परिषद व आदिवासी विभागातील शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या सोडविणे, इंग्रजी/ खाजगी माध्यम शाळांतील शिक्षक कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन व इतर सुविधा देणे यासह 31 मागण्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याबाबतचे निवेदन शिक्षक आमदार सुधाकर अडबाले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पाठविले आहे.

सदर धरणे/ निदर्शने आंदोलनात नागपुर जिल्ह्यातील विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना व खाजगी प्राथमिक शिक्षक संघाच्या सर्व जिल्हा, तालुका व शहर पदाधिकारी, पेन्शन फायटर, सदस्य, कार्यकर्ते व मार्गदर्शक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, प्रांतीय कोषाध्यक्ष भुषण तल्हार, जिल्हा अध्यक्ष अनिल गोतमारे, शहर अध्यक्ष विठ्ठल जुनघरे, जिल्हा कार्यवाह संजय वारकर , शहर कार्यवाह अविनाश बडे, शहर कार्याध्यक्ष अरुण कराळे, ग्रामीण कार्याध्यक्ष विजय गोमकर , लक्ष्मीकांत व्होरा, शैलेश येडके, विष्णू राणे, धनराज राऊत, दिनेश ढगे, विशाल बंड, छत्रपाल राऊत, दत्तराज उमाळे, पुरुषोत्तम ढगे, सचिन इंगोले, अभिनय ढोबळे, दिगंबर भोगेकर ,विजय चौधरी, संजय वांगे, भूषण बेलेकर, भूषण कडूकर, रोशन लेंडे, विलास डाखोळे, दिलीप बांबल, दिनकर ढवळे, शंकर पन्नासे, सूर्यकांत वानखडे, नागपूर शहर पदाधिकारी गंगाधर पराते, मंगेश घवघवे, दिलीप बोके, प्रमोद अंधारे, प्यारेलाल लोणारे, राकेश दुप्पलीवार, राजू मोहोड, यशवंत कातरे, देविदास कोरे, मुकुंद चहांदे, अर्चना भोंडे, दिपक सातपुते, रंजना पेटकर, करिश्मा गलाणी, धनराज सूर्यवंशी, तानाजी बारहाते, नरेंद्र घुगल तसेच सर्व तालुका अध्यक्ष, कार्यवाह यांनी जास्तीत जास्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थीत राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आमचे गाव, आमचा विकास प्रशिक्षण संपन्न



■ **महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १८ :** वेळा (हरिश्चंद्र) ग्रामपंचायत मध्ये राष्ट्रीय ग्रामस्वराज्य अभियान सन २०२४-२५ अंतर्गत २०२५ - २६ वित्तीय वर्षाचे आमचे गाव, आमचा विकास सन २०२४-२५ अंतर्गत ग्रामविकास आराखडा तयार करण्याकरिता मंगळवार १७ डिसेंबर रोजी गणस्तरीय प्रशिक्षण पार पडले.

नागपूर पं.स.चे विस्तार अधिकारी प्रशिक्षक पी.जी. हरडे, खरबीच्या आरोग्य सेविका कांचन सातपुते ,नागपूर पंचायत समीतीच्या शुभांगी कांबडे यांनी आमचे गाव, आमचा विकास या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी वेळा ( हरिश्चंद्र ) च्या सरपंच प्रीती सचिन इंगळे, ग्रामपंचायत अधिकारी सचिन खोडे,कापसीचे सरपंच सुरज पाटील उपसंरपच अक्षय रामटेके, ग्रामपंचायत अधिकारी सावरकर उपस्थित होते.

# एसजेएएनतर्फे खेळाडूंचा शनिवारी सत्कार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :** स्पोर्ट्स जर्नालिस्ट असोसिएशन ऑफ नागपूर (एसजेएएन) आणि जी.एस.रायसोनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स एसजेएएन-रायसोनी अॅन्युअल अचिव्हर्स अवॉर्ड्स सोहळा शनिवार, २१ डिसेंबर रोजी आयाजिण्यात आला आहे. क्लब हॉल, इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स समोर, सिव्हिल लाईन्स येथे सकाळी १०.३० वाजता होणाऱ्या या सोहोळ्याला भारताचे माजी मिडफिल्डर, द्रोणाचार्य पुरस्कार विजेते आणि राष्ट्रीय महिला हॉकी संघाचे प्रशिक्षक हरेंद्रसिंग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी रायसोनी एज्युकेशनचे अध्यक्ष सुनील रायसोनी राहतील.

यावर्षी भारतीय महिला बुद्धिबळपटू आणि ऑलिम्पियाड सुवर्णपदक विजेती देशमुख, विदर्भ रणजी करंडक संघाचा कर्णधार अक्षय वाडकर, भारताची अंडर-१९ संघातील हॉकीपटू हिमांशी गावंडे, ज्युनियर आंतरराष्ट्रीय खेळाडू नयन सरडे यांना त्यांच्या कामगिरीबद्दल पुरस्कृत करून सत्कार केला जाणार आहे. तसेच बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडियाच्या स्पर्धा समितीचे सदस्य आणि नागपूर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव मंगेश काशीकर यांना बॅडमिंटनच्या विकासातील योगदानाबद्दल विशेष येणार आहे. याशिवाय सेंटर पॉईंट स्कूल, दाभा येथील शाळा आणि महालातील सीपी अँड बेरार कॉलेजला क्रीडा संवर्धनातील त्यांच्या कार्याबद्दलही गौरवण्यात येणार असल्याची माहिती एसजेएएनचे सचिव परितोष प्रामाणिक यांनी दिली. दिव्या देशमुख : नागपूरची गोल्डन गर्ल व महिला ग्रँड मास्टर (डब्लूजीएम) दिव्या देशमुखने सप्टेंबरमध्ये बुडापेस्ट, हंगेरी बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये विजेतेपद पटकावत वैयक्तिक सुवर्णपदकही जिंकले.

# नक्षलग्रस्त भागातील शाळांचे नुतनीकरण आवश्यक

**नागपूर :** गोंदियातील अति संवेदनशील नक्षलग्रस्त चिचगड अंर्तगत तुमडीमेंढा, करूझरी, पळसगाव व बोंन्डे गावातील जिल्हा परीषदांच्या शाळांना भेटी देवून दुर्लक्षित व क्षतीग्रस्त शाळांची पाहणी करण्यात आली. यावेळी शाळांची रंगरगोटी,खेळ साधने व संडास बाथरूम नुतणीकरण करणे आवश्यक आहे हे समजले यासाठी चिचगड ठाणेदार तुषार कायळ साहेब बोंन्डे 'ड्रस्त्र चे शेळके साहेब व यांच्या चोख पोलिस बंदोबस्तात शाळांची पाहणी केली.

याप्रसंगी नागपूर रोटरी क्लबच्या अध्यक्षा देवयानी, विवेक गर्गे, माऊली सेवा मित्र मंडळाचे सुहास खरे उपस्थित होते. गोंदिया पोलिस दलाचे पोलिस अधिक्षक गोरख भामरे व नक्षल विरोधी अभियानाचे संदीप पाटील यांचे नेहमीच सकारात्मक पाठबळ असते. हे कार्य हाती घेऊन गावसहभागाने शाळांचा कायापालट करून पोलिस व नागरिक सबंध दृढ होतीलअशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.




# विदर्भ तेली समाज महासंघातर्फे श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या ४०० वी जयंती साजरी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :** विदर्भ तेली समाज महासंघ नागपूर तर्फे श्री. संत शिरोमनी संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंती कार्यक्रम जगनाडे चौक नागपूर येथे संपन्न झाला.

त्यावेळी उपस्थित पदाधिकारी विदर्भ तेली समाज महासंघाचे सचिव संजय सोनटक्के ,वि तेसरचिटणीस डॉ. नामदेव हटवार, उपाध्यक्ष संजय नरखेडकर, शहर अध्यक्ष सुरेश वंजारी, कोषाध्यक्ष धनराज तळवेकर, प्रेमानंद हटवार, प्रशांत मदनकर, दिनकर गायधनी,अनिल घुसे, राजेंद्र डकरे, राम कावडकर,अनुज हुलके संजय वाडीभसमे, शंकराव ढबाले, राजकुमार चकोले, निखिल भूते,अखिलेश लांजेवार, दिपक खोडे, विलास तळवेकर, अनिल माकडे, मिराताई मदनकर, शुभागी घाटोळे, प्रा. रमेश पिसे, जानकीताई सेलूकर,संजय वाडीभसमे आणि इतर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाध्यक्ष दुंडे यांच्या नेतृत्वात मनसे पदाधिकाऱ्यांची नियुक्ती



■ **महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. १८ :** मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या आदेशानुसार नागपूर जिल्हाध्यक्ष शेखरभाऊ दुंन्डे यांनी रामटेक शहरातील पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केली. यामध्ये मनसे शहर उपाध्यक्ष पदी उपेश गाढवे आणि रामटेक मनसे शहर प्रसिद्धी प्रमुख पदी अमन लांजेवार यांची नियुक्ती करण्यात आली.

यावेळी मनसे रामटेक शहराध्यक्ष सागर चांदेकर व रामटेक विधानसभा सचिव सुरज दुंन्डे व सर्व महाराष्ट्र नवनिर्मान सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच जिल्हाध्यक्ष शेखर दुंन्डे यांनी कार्यकर्त्यांना पक्षवाढीसाठी पर्यंत करण्यासाठी आवाहन केले.

# निधन
## रामदास पवार



■ **महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. १८ :** दत्तवाडी येथील प्लॉट क्रमांक ९७, शुभारंभ सोसायटी निवासी रामदास चंपत पवार यांचे निधन झाले. ते ७२ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, मुलगा व बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थीवांवर गुरुवार १९ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता टेकडी वाडी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येईल.

# पं. बच्छराज व्यास तथा स्व. प्रभाकरराव दटके स्मृती कॅरम स्पर्धा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :** पं. बच्छराज व्यास तथा स्व. प्रभाकरराव दटके स्मृतिप्रीत्यर्थ विदर्भ रँकिंग कॅरम स्पर्धेचे नागपूर नागरिक सह. बँकेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रदेश भाजपाचे उपाध्यक्ष प्रा. संजय भेंडे यांनी पं. व्यास व दटके यांच्या प्रतिमांना पुष्पार्पण करून व नंतर कॅरम बोर्डावर स्ट्रायकर मारून केले. यावेळी नगरसेवक प्रमोद (बापू) चिखले अतिथी म्हणून उपस्थित होते. गाडीखानातील फव्वारा चौकात असलेल्या रामजीवन चौधरी क्रीडा संकुलात ही स्पर्धा झाली. अखिल भारतीय कॅरम असोसिएशनचे संरक्षक व माजी आमदार गिरीशजी व्यास तसेच विदर्भ कॅरम असोसिएशनचे सचिव प्रभजितसिंह बछेर, समर्पण सेवा समितीचे सचिव नरेश जुम्मानी, उपाध्यक्ष महेन्द्र गुप्ता, सदस्य रजनीश जैन, पीयुष आंबुलकर, हनिफ मोहम्मद, नवल मेश्राम, इकबाल मोहम्मद, मनोज तिवारी, राजेश जिंदल, यादव यांच्यासह नागपूर-विदभार्तील अनेक कॅरमप्रेमी प्रामुख्याने उपस्थित या स्पर्धेत इर्शाद अहमद (राय), गुरूचरण तांबे, निखिल लोखंडे (व्ही.बी.एस.), नीलेश जांभुळकर, इशांत साखरे (जनता), अभिलाश ढोके (नवयुवक), साहिल समुद्रे (ओम), राहुल शर्मा (राय) या खेळाडूंना मानांकन देण्यात आले अणून सदर स्पर्धेत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कॅरम विजेते खेळाडू सहभागी झाले आहेत.

# मध्य रेल्वे नागपूर विभागाकडून राष्ट्रीय ऊर्जा बचत सप्ताह

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :** मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने 11 ते 16 डिसेंबर 2024 दरम्यान राष्ट्रीय ऊर्जा बचत सप्ताह साजरा केला, ज्याद्वारे सतर्कता आणि पर्यावरण जागरूकतेसाठी विविध प्रभावी क्रियाकलापांचा आयोजन करण्यात आले.




मनीष अग्रवाल, विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्या मार्गदर्शनाखाली विद्युत (सामान्य) विभागाने या उपक्रमाचे नेतृत्व केले, ज्यात रेल्वे कर्मचारी, विद्यार्थी आणि स्थानिक समुदाय यांना ऊर्जा बचतीसाठी उपाययोजना वाढवण्यास भागीदारी दिली.

हा सप्ताह 11 डिसेंबर 2024 रोजी अजनी येथील रेल्वे शाळांमध्ये चित्रकला स्पर्धेने सुरू झाला. विद्यार्थ्यांनी ऊर्जा बचतीच्या विषयावर प्रेरणादायक कला तयार केली. विजेत्यांना त्यांच्या सर्जनशीलतेसाठी शिल्ड आणि प्रमाणपत्र दिले.

12 डिसेंबर 2024 रोजी अजनी रेल्वे कॉलनीत ऊर्जा बचत रॅली आयोजित करण्यात आली, ज्याद्वारे स्थानिक लोकांना ऊर्जा बचताच्या सवयी अंगीकारण्यासाठी जागरूक केले गेले.

13 डिसेंबर 2024 रोजी एक विशेष सत्र आयोजित केले, ज्यामध्ये पी.एस. खैरकर, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक, प्रतिभा गुप्ता, वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सामान्य), आणि संजीव एस. मानकर, सहाय्यक विभागीय विद्युत अभियंता (सामान्य) यांनी रेल्वे कर्मचाऱ्यांना ऊर्जा बचतीच्या उपायांची माहिती दिली. यावेळी LED बल्बांचे वितरण करून संदेश अधिक प्रभावीपणे दिला गेला. 14 डिसेंबर 2024 रोजी नागपूरच्या सिव्हिल लाईन्स भागात एक मोठी जन जागरूकता रॅली काढली गेली, ज्याद्वारे नागरिकांना ऊर्जा बचत करण्यासाठी प्रोत्साहित केले गेले. हा सप्ताह 16 डिसेंबर 2024 रोजी नागपूरच्या मध्य रेल्वे रुग्णालयाच्या ऑडिटोरियम मध्ये आयोजित सेमिनाराने समाप्त केला. या सेमिनारमध्ये CCC कॉलेज, नागपूरचे प्रोफेसर डॉ. आर.एम. मोहरिल यांनी जागतिक ऊर्जा बचत प्रथांवर व त्यांचा भारतीय रेल्वेसाठी महत्त्वावर प्रकाश टाकला, आणि ऊर्जा वापर कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण धोरणे सांगितली.

राष्ट्रीय ऊर्जा बचत सप्ताहाची यशस्वितेकरिता मनीष अग्रवाल, DRM यांच्या नेतृत्वाखाली, पी.एस. खैरकर, ADRM, प्रतिभा गुप्ता, Sr.DEE (सामान्य), आणि विद्युत विभाग तसेच संबंधित टीमच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कठोर परिश्रमांमुळे शक्य झाली.

हा उपक्रम मध्य रेल्वे नागपूर विभागाच्या पर्यावरण आणि सततेसाठीच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे, जे कर्मचाऱ्यांना आणि समुदायाला एक हरित भविष्य साध्य करण्यासाठी प्रेरित करतो.




# महापालिकेकडून स्वच्छ शौचालय अभियानचे आयोजन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :** नागपूर महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या डॉ नेहरू नगर झोन , प्रभाग 26, वाठोडा सुलभ टॉयलेटजवळ आयईसी टीमने शौचालयाचा वापर - आदरयुक्त सवय या थीमवर एक विशेष कार्यक्रम आयोजित केला होता.

ज्योतिबा हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेऊन उघड्यावर लघवी व शौच करणे थांबवण्याच्या उद्देशाने चित्रकला उपक्रमाचे आयोजन केले. मुलांनी भित्तीचित्राच्या माध्यमातून नागरिकांना प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आणि उघड्यावर लघवी व शौच केल्याने केवळ पर्यावरण प्रदूषित होत नाही तर आरोग्यासाठीही घातक असल्याचा संदेश दिला. तसेच, शौचालयाच्या योग्य वापरास प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले.

अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे मुलांना स्वच्छतेची जाणीव तर होतेच , शिवाय समाजात स्वच्छता आणि आरोग्याचे महत्त्वही पटते.

# विधानपरिषद सभापती पदाची निवडणूक

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :** राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या आदेशानुसार विधानपरिषदेच्या सभापती पदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी जाहीर केला असून १९ डिसेंबर २०२४ रोजी मतदान होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**जाहिरनामा / सायटेशन नोटीस**

**कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कामठी यांचे न्यायालय, कामठी जि. नागपुर**

एम.जे. सी नं. ११०/२०२४

पे.ता.: २१/०१/२०२५
प्रोसेस नं १९६७/२०२४

Applicant : Mr. Biswajit W/o Alok Biswas, Aged 54 Years, Occu. Private, R/o. Plot No. 147/148, Ramkrushna Green Town, Behind Asha Hospital, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur, Pin -441002.
---- VS ----
Non applicant :- NIL

मयतः- Late Shri. Alok Kumar Muralilal Biswas, मयत दि. २३/०१/२०२३, विकाण- कामठी,

सदरहु अर्जदारांनी वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ अन्वये मयत Late Shri. Alok Kumar Muralilal Biswas, मयत दि २३/०१/२०२३ याचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर, कामठी यांनी दि. २१/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार मयतदाराचे वारस नव्हे असे कोणास समझविण्याचे असेल तर पेशी तारखेवर हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदयतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला Late Shri. Alok Kumar Muralilal Biswas यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/१२/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

**-: जाहिरनामा :-**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय कार्यालय नागपूर शहर यांचे कार्यालय, नागपूर शहर**
Email: sdonagpur@gmail.com
Ph No. 07112-2560048
क्र. अका/प्रस्तुत/उविदं/नागश/कावि-९५४/२०२४
दि.:०४/१०/२०२४

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि ५३५/२०२३ ५) कांचन विनोदकुमार अवस्थी वय ४४ वर्ष यांचा अर्ज दिनांक २०/०९/२०२४

ज्याअर्थी अर्जदार कांचन विनोदकुमार अवस्थी वय ४४ वर्ष रा. अनंत नगर, काटोल रोड नागपूर यांनी स्वतःच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांचा जन्म दिनांक १०/१०/१९७९ रोजी नागपूर येथे राहत्या घरी झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह उपविभागीय दंडाधिकारी, नागपूर शहर यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

कार्यकारी दंडाधिकारी
तथा नायब तहसिलदार

**-: जाहिरनामा :-**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय कार्यालय नागपूर शहर यांचे कार्यालय, नागपूर शहर**
Email: sdonagpur@gmail.com
Ph No. 07112-2560048
क्र. अका/प्रस्तुत/उविदं/नागश/कावि-९५७/२०२४
दि.:०४/१०/२०२४

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि ५३५/२०२३ ५) निलेश मोरेश्वरजी लांडगे वय ३४ वर्ष यांचा अर्ज दिनांक २०/०९/२०२४

ज्याअर्थी अर्जदार निलेश मोरेश्वरजी लांडगे वय ३४ वर्ष रा. चिटणवीस नगर, मोठ्या ताजबाग जवळ, नागपूर यांनी आजीच्या मृत्यूची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांनी त्यांची आजी नामे रंगुबाई नागोराव ढाके यांचा मृत्यू दिनांक २६/०८/१९९९ रोजी शनीवारी कॉटन मार्केट नागपूर येथे राहत्या घरी झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्यू बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह उपविभागीय दंडाधिकारी, नागपूर शहर यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्यूबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित मृत्यू नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

कार्यकारी दंडाधिकारी
तथा नायब तहसिलदार

**-: जाहिरनामा :-**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, उपविभागीय कार्यालय नागपूर शहर यांचे कार्यालय, नागपूर शहर**
Email: sdonagpur@gmail.com
Ph No. 07112-2560048
क्र. अका/प्रस्तुत/उविदं/नागश/कावि-९५८/२०२४
दि.:०४/१०/२०२४

वाचा:- १) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हा दंडाधिकारी, नागपूर यांचेकडील आदेश क्रमांक अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि ५३५/२०२३ ५) भोजवंताबाई किरण रामटेके वय ५७ वर्ष यांचा अर्ज दिनांक २०/०३/२०२४

ज्याअर्थी अर्जदार भोजवंताबाई किरण रामटेके वय ५७ वर्ष रा. रामबाग इमामवाडा नागपूर यांनी त्यांच्या मुलाच्या मृत्यूची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांनी त्यांची मुलगा नामे सुभाष किरण रामटेके यांचा मृत्यू दिनांक २०/०८/२०२४ रोजी घरी गळफास रामबाग शवविच्छेन मेडीकल हॉस्पिटल नागपूर येथे राहत्या घरी झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी तथा नायब तहसिलदार, नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्यू बाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह उपविभागीय दंडाधिकारी, नागपूर शहर यांचे न्यायालयात स्वःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्यूबाबतची नोंद घेणेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित मृत्यू नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

कार्यकारी दंडाधिकारी
तथा नायब तहसिलदार

# तिडके महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा




■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. १८ :

"मनात दृढ इच्छाशक्ती, योग्य नियोजन आणि वेळेच समन्वय असल्यास आपण मोठ्यात मोठं ध्येय गाठू शकतो असे प्रतिपादन आयएएस अकॅडमी अमरावतीचे संचालक डॉ. नरेशचंद्र काठोळे यांनी केले.

श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय रामटेक येथे एस.एन.टी. करिअर अकॅडमी च्या विद्यमाने आयोजित कार्यशाळेत "मी अधिकारी होणारच" या विषयावर अमरावती येथील आयएएस अकॅडमीचे संचालक डॉ. नरेशचंद्र काठोळे बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले,"मुलाला लहान पणापासूनच ध्येय गाठण्यासाठी तयार केले तर तो नक्कीच अधिकारी होऊ शकतो. त्यासाठी पालकांनी आपल्या मुलाला त्या दिशेने तयार करायला पाहिजे. अलीकडे सगळीकडे पैसे कमविण्यासाठी अकेडमीचा ज्वर चढलेला आहे.

पण आपल्या मोबाईल मध्ये इतकी माहिती आहे की त्याचा योग्य उपयोग केला तर कोणत्याही कमर्शियल अकॅडमीमध्ये जाण्याची आवश्यकता पडणार नाही." याप्रसंगी नागपुर वरुन आलेले आर्मी माजी अधिकारी सुधीर चक्रे यांनीही विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी तयार राहण्याचे आवाहन केले. आणि महाविद्यालयात विनामूल्य चालविण्यात येणाऱ्या अकॅडमीची मुक्तकंठाने प्रशंसा केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद पोकळे यांनीही आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अकॅडमीचे संचालक प्रा. सुनील कठाणे यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संतोष जाधव यांनी केले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील अकॅडमीच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

## सागरी जलतरण स्पर्धेसाठी ३८ जलतरणपटू जाणार

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

२१ आणि २२ डिसेंबर रोजी सिंधुदुर्ग जिल्हा जलतरण संघ व महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघ यांच्या सहकार्याने मालवणच्या चिवला बीच येथे आयोजित १४ व्या राज्यस्तरीय खुल्या सागरी जलतरण स्पर्धेत ॲक्वा स्पोर्ट्स क्लबचे ३८ जलतरणपटू सहभागी होणार आहेत. श्रेयशा धोंडारकर, वैष्णवी काटोळे, भक्ती थेपेकर, आरोही सोनकुसरे, हिवरे, चमेली हिवरे, आसावरी दहापुते, वाणी वासनिक, युथिका बनसोड, आर्य पराते, श्रावणी पराते, अवधी मेश्राम, मृण्मयी वैद्य, गौरी नागपुरे, लता अंबाडे हा मुलेंचा, तर सक्षम झाडे, मानस होनाळे, दशरथ पंचेश्वर, अतुल वर्मा, निखिल पंजवानी, आदित्य काळे, चित्रांशू पाटील, अक्षय नवले, शौर्य शेंडे, कबीर घुटके, देव वासनिक, मौलिक बावनकुळे, रौनक रौनक सातपुते, शौर्य वाघमारे, ओजस जनबंधू, रुहान वाघमारे, प्रियांशू नागपुरे, आशीष चिंचघरे चैतन्य शेंद्रे, श्रेयश बहादुरे, आशीष वासनिक हा मुलांचा संघ रवाना होईल.

# ॲग्रीस्टॅक प्रकल्प अंमलबजावणीच्या कामास ग्रामसेवकांचा नकार

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा , दि. १८ :

कामाचा व्याप आणि आचारसंहितेमुळे प्रलंबित कामामुळे ॲग्रीस्टॅक प्रकल्प अंमलबजावणी च्या कामास सर्व ग्राम विकास अधिकारी व ग्रामसेवकांनी नकार दिला आहे. यासंबंधीचे पत्र ग्रामसेवक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार सचिन कुमावत व गटविकास अधिकारी संदीप गोळशेलवार यांना दिले.



नागपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांचे कडील कामाचा व्याप व आचारसंहितेमुळे प्रलंबित असलेली कामे पूर्ण करण्यास लागणारा कालावधीचा विचार करता ॲग्रीस्टॅक प्रकल्प अमलबजावणीचे काम नम्रपणे नाकारणे बाबत संपूर्ण तालुक्यातील तहसीलदार व गटविकास अधिकारी यांना एका निवेदनाद्वारे ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे अध्यक्ष व सचिव शिष्टमंडळाद्वारे कळविले असून संपूर्ण महाराष्ट्रात सदर काम राज्य युनियनने नाकारल्याचे जिल्हाध्यक्ष विष्णू पोटभरे यांनी सांगितले. सन 2024- 25 हे आर्थिक वर्ष सुरू झाल्यापासून लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या. निवडणूक काळात आचारसंहिता कालावधी मोठा होता त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावरील वैयक्तिक लाभाच्या योजना ची अंमलबजावणी बाकी असून राज्य व केंद्र शासनाकडून प्राप्त निधी अखर्चित आहे.

केंद्र व राज्य शासनाचे ध्वजांकित महत्त्वाकांक्षी प्रकल्प अंमलबजावणी महत्त्वाची असल्याने ते उद्दिष्ट पूर्ण करणे, प्रधानमंत्री आवास टप्पा दोन सर्वेक्षण करणे व कर वसुली इत्यादी महत्त्वाची कामे प्रलंबित आहे.

सदरची संपूर्ण कामे मार्च 2025 पर्यंत पूर्ण करण्याची जबाबदारी ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाची असल्याने संदर्भीय शासन निर्णयानुसार ॲग्रीस्टॅक प्रकल्प अंमलबजावणी करिता वेळ देता येणार नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे सदरचे काम नागपूर जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी यांनी नम्रपणे नाकारले असून कामाच्या व्यापाचा सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा असे ग्रामसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष विष्णू पोटभरे,तालूका अध्यक्ष हरिदास आकरे, मानिक लांजेवार ज्ञानदेव चाटे, नितिन उमरेडकर, जिवन कोल्हे, पुनम पांडे यांनी निवेदनात म्हटले आहे.

# अवैध गोवंश वाहतुक करणारा ट्रक जप्त

## दोन आरोपी अटकेत, २६ लाख ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

■ महासागर प्रतिनिधी,
कन्हान, दि. १८ :

कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा पथकाने पेट्रोलिंग दरम्यान अवैध गोवंश वाहतुक करणाऱ्या ट्रकला पकडुन ३२ जनावरांची सुटका करुन दोन आरोपीला अटक करुन २६ लाख ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



प्राप्त झालेल्या माहिती नुसार मंगळवार (दि.१७) डिसेंबरला स्थानिक गुन्हे शाखा पथक कन्हान परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली की, बारा चक्का ट्रक क्रमांक एमपी १९ एच ११६० मध्ये अवैध जनावरे कोंबुन कत्तलिकरिता घेऊन जात आहे. अश्या माहिती वरुन पथकाने नागपुर जबलपुर राष्ट्रीय महामार्ग वर नाकाबंदी केली असता एमपी १९ एच ११६० या ट्रक ला थांबवुन पाहणी केली असता ट्रक मध्ये दोरीने क्रुररित्या बांधुन भरलेले पांढऱ्या, लाल काळ्या, कोशा रंगाचे ३२ गोवंश जनावरे दाटीने निर्दयतेने वागवणुक देऊन कोंबुन चारा पाण्याची कोणतीही सोय न करता त्यांना दोरीने बांधुन वाहतुक करतांना आढळुन आले.

स्थानिक गुन्हे शाखा पथकाने आरोपी मोहमद हुशेन शमीम कुरेशी वय २४ वर्ष, प्रकाश रामचरण करोशिया दोन्ही रा. दामोह मध्यप्रदेश यांना अटक करुन त्याचा जवळुन ३२ गोवंश किंमत ६,४०,००० रु, ट्रक क्रमांक एमपी १९ एच ११६० किंमत २०,००,००० रु, दोन मोबाइल किंमत ११,००० रु असा एकुण २६,५१,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी कन्हान पोलीस स्टेशन येथे पाच आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन आरोपींना अटक करण्यात आली असुन आरोपी गोवंश मालक संतु रा.इमलिया, दामोह, मध्यप्रदेश, फेजुल रा.नागपुर, नादिर रा.मनसर यांचा शोध कन्हान पोलीस करीत आहे.

# श्रीक्षेत्र आदासा येथे ग्राम स्वच्छता अभियान



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

गुरुदेव सेवा मंडळ, पेन्शन नगर नागपूरच्या वतीने श्री क्षेत्र आदासा येथे ग्रामस्वच्छता अभियान अतंर्गत मंदिर परिसरात व गावात ग्रामस्वच्छता अभियान राबविले.

तसेच मातोश्री वृद्धाश्रमातील वृध्दांना मंडळाच्या वतीने भोजन व वस्त्र देण्यात आले.

गुरुदेव सेवा मंडळ, पेन्शन नगर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार कृतिशिल कार्यक्रमाचे आयोजन करीत समाज प्रबोधनाचे कार्य करित आहे. नागपूर जिल्ह्यातील ५६ गावांमध्ये जाऊन ग्राम स्वच्छता अभियान राबवून समाज प्रबोधनाचे कार्य करित आहे.

ग्रामस्वच्छता अभियानाला मंडळाचे अध्यक्ष वसंतदासजी कुंभारे, उपाध्यक्ष राजेंद्र पितृडा, सचिव रमेश सोनकुसरे, प्राध्यापक रामदास टेकाडे, यादवराव चौधरी, रामरावजी डांगोरे, मधुकर राऊत,अरुण राऊत, सुभाष पराते, सतीश रायकवार, दामोदर मामुलकर, विजय गिरी, वसंता फरतोडे, कृष्णराव सांबारे, मनोहर हेडाऊ, झोडे यांचे सहकार्य लाभले.

# अजय वाघमारे यांची नागपूर विभाग संघटनेच्या अध्यक्षपदी निवड



■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. १८ :

अजय वाघमारे यांची नागपूर जिल्ह्यातील नगर पंचायत व नगर परिषदेच्या संवर्ग कर्मचारी संघटनेच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. वाघमारे यांच्यावर नगर पंचायत कर्मचारी संघटनेची सर्व कामे करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

यावेळी बेसा प्रशासक तथा मुख्याधिकारी भरत नंदनवार यांनी अजय वाघमारे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. अजय वाघमारे हे न.प.बेसा येथे प्रशासकीय अधिकारी पदावर कार्यरत आहेत याची नोंद घ्यावी. त्यांच्या कामातील सत्यता पाहून त्यांची संस्थेच्या अध्यक्षपदासाठी बिनविरोध निवड करण्यात आली. बेला न.प.स्वच्छता विभागाच्या अभियंता पूजा जाधव यांनी सांगितले की, प्रशासकीय अधिकारी वाघमारे त्यांचे उत्कृष्ट कार्य पाहून त्यांना महाराष्ट्र नगरपरिषद संवर्ग संघटनेत प्रथम क्रमांक मिळाला.

या संघटनेत उपाध्यक्षपदी रसिका लांजेवार, सचिव भाग्यश्री देवरे, कोषाध्यक्ष नितीन रगडे, जिल्हा प्रसिध्दी प्रमुख गौरव गाडगे यांची निवड करण्यात आली. न.प. बहादूराचे प्रशासकीय अधिकारी सागर ठाकरे, न.प.बिडगावचे पी.ए. सुशांत आरू, बेसा एन.पी.चे पी.ए. अजय वाघमारे यांच्या निवडीबद्दल मोहित राजनकर, भूषण दिवटे, प्रीती कानडे, तुषार सेलवट, राजेश तळोकर पटवारी, नितीन इमले, मनोज कावळे, संजय बोकाडे, स्वप्नील पाटील, राहुल दांडेकर, मुकेश इंगळे यांच्यासह सर्व न.प.चे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## मोलकरीणने केली सोन्याची चेन लंपास

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

घरकाम करताना मोलकरीणनेच मालकाचा विश्वासघात करीत सोन्याची चेन लंपास केली. संशयाच्या आधारावर पोलिसांनी तिची चौकशी केली असता ही घटना उघडकीस आली. या प्रकरणी सदर पोलिसांनी देबोलीना प्रसून चटर्जी (37) रा. मोहननगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवत आरोपी महिलेला अटक केली आहे.

दुर्गा प्रकाश सराटे (37) रा. खलासी लाईन असे अटकेतील महिला आरोपीचे नाव आहे. देबोलीना यांनी आरोपी दुर्गा हिला घरकामासाठी ठेवले होते. दरम्यान देबोलीना यांच्या सासूची सोन्याची चेन काळी पडली होती. त्यामुळे गत बुधवारी सासूने एका भांड्यात चहापत्तीचे पाणी गरम केले आणि त्यात चेन टाकली होती. सायंकाळी त्यांनी भांडे तपासले असता चेन गायब होती. त्यांनी कुटुंबातील सदस्यांकडे चेनबाबत विचारपूस केली, मात्र कोणतीही माहिती मिळाली नाही. अखेर सदर ठाण्यात तक्रार करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. संशयाच्या आधारावर घरकाम करणारी मोलकरीण दुर्गा हिची चौकशी केली असता तिने चोरीची कबुली दिली.

# मोटारसायकलच्या धडकेत ट्रक चालकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

हिंगणा परिसरात एका मोटार सायकलस्वाराने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून ट्रक चालकाला जबर धडक दिली. यात गंभीर जखमी होऊन ट्रक चालकाचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. शैलेष जगन्नाथ राय (47) रा. तेजपूर, बिहार असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी शैलेषचा सहकारी ट्रक चालक मोनूकुमार यादव रा. बिहारच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

शैलेष आणि मोनू हे दोघेही आपआपल्या ट्रकमध्ये माल भरून हिंगणा परिसरातील एका गोदामात आले होते. सकाळी 9.15 वाजताच्या सुमारास दोघेही जेवणाची व्यवस्था करण्यासाठी हिंगणाच्या बाजारात गेले. भाजीपाला घेऊन परतताना धनगरपुरा परिसरात मोटारसायकल क्र. एमएच-40/यू-0144च्या चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून शैलेष यांना जबर धडक दिली आणि पळून गेला. यात गंभीर जखमी झालेल्या शैलेषला उपचारार्थ हिंगणा ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने मेडिकल रुग्णालयात रेफर करण्यात आले. मेडिकल रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून शैलेषला मृत घोषित केले.

# श्रमिक नगरात शालिनीताई मेघे हॉस्पिटल तर्फे आरोग्य शिबीर



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. १८ :

सोनेगाव ग्रामपंचायत अंतर्गत असणाऱ्या श्रमिक नगरात शालिनीताई मेघे हॉस्पिटल ॲन्ड रिसर्ज केंद्रातर्फे ३००नागरीकांचे निःशुल्क आरोग्य तपासणी शिबिर पार पडले.

शिबिरात मधुमेह, रक्तदाब, डोळ्यांची तपासणी करण्यात आली.शिबिराच्या आयोजनासाठी भाजपा ओबीसी आघाडी अध्यक्ष तथा माजी ग्रामपंचायत सदस्य कमलाकर इंगळे, रामू भेंडकर, रमेश भेंडकर, टिकेश्वरी भेंडकर, माजी ग्रामपंचायत सदस्य, शक्ती केंद्रप्रमुख विनय कांबळे यांनी सहकार्य केले.

# शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात अद्यावत रहावे : आ. चरणसिंग ठाकूर

■ महासागर प्रतिनिधी,
काटोल, दि. १८ :



विद्यार्थ्यांमध्ये शिस्त असायला हवी तेव्हाच तो यशोशिखर गाठू शकेल. पुस्तकी ज्ञानाबरोबरच मैदानी खेळातही तो पारंगत असायला हवा. जिल्हा परिषदेच्या शाळेत बऱ्याच ठिकाणी मैदान नाही म्हणून विद्यार्थ्यांच्या सरावासाठी लवकरच डोंगरगाव येथे २५ एकर परिसरात ७५ कोटी रुपयाचे क्रीडा संकुल उभारण्यात येईल. शिक्षकांनी आधुनिक युगात नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून स्वतः बदलत रहावे असे प्रतिपादन काटोल नरखेड क्षेत्राचे आमदार चरणसिंग ठाकूर यांनी गोविंदराव उमप हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, येनवा येथे तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटनाप्रसंगी 'उद्घाटक ' म्हणून केले.

कार्यक्रमाचे उद्घाटक आमदार चरणसिंग ठाकूर तर प्रमुख अतिथी म्हणून पंचायत समिती सभापती संजय डांगोरे प्रमुख अतिथी जि.प.सदस्य समीर उमप, उपसभापती निशिकांत नागमोते, कृषीमित्र दिनेश ठाकरे, येनवा सरपंच ललिता ठाकरे, उपसरपंच हेमराज उमप, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हेमराज सातपुते, गटशिक्षणाधिकारी प्रदीपकुमार जनबंधू, शिक्षण विस्तार अधिकारी जावेद इकबाल, प्राचार्य संदीप बोरकर, प्रवीण उमप, पराग महंत, विनोद चौरे, उमेश बंदे, किशोर गाढवे, सतीश रेवतकर प्रामुख्याने उपस्थित होते.

तीन दिवस चालणाऱ्या या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात ५०० विद्यार्थी सहभागी होणार आहे. विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धेत कबड्डी, खो-खो,लंगडी, रिले रेस, लांब उडी, उंच उडी, दौड, कुस्ती, बुद्धिबळ तसेच सांस्कृतिक प्रकारात समुहनृत्य, समूहगीत, नक्कल, वकृत्व स्पर्धा इत्यादी प्रकार असणार आहे.

अध्यक्षीय भाषणात सभापती संजय डांगोरे म्हणाले की, माज्या काटोल तालुक्यातील शिक्षक हे संघषार्तून पुढे आलेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ते नेहमी सदा तत्पर असतात.शाळेत कुठलीही समस्या आल्यास त्या समस्येवर मात करण्यात त्यांचा हातखंडा आहे. माज्या शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या पाठीशी पंचायत समिती, काटोल नेहमीच राहील.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी प्रदीपकुमार जनबंधू, संचालन सतीश ढबाले व प्रियंका जंगले तर आभार प्रदर्शन शिक्षण विस्तार अधिकारी जावेद इकबाल यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता केंद्रप्रमुख राजू धवड, केंद्रप्रमुख पांडुरंग भिंगारे, केंद्रप्रमुख सुरेंद्र कोल्हे, केंद्रप्रमुख महेश राकेश, केंद्रप्रमुख निळकंठ लोहकरे यांनी तसेच श्री.गोविंदराव हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, येनवा येथील व जि.प.शिक्षकवृंदानी परिश्रम घेतले.

# संविधान चालविणारे वाईट असेल तर संविधान वाईट ठरते : बी.सी. चंद्रिकापुरे

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

देशामध्ये सर्वोच्च स्थानी संविधान आहे आणि देशातील प्रत्येक व्यक्ती अगदी सामान्य पासून तर राष्ट्रपती पर्यंत या संविधानाशी बांधलेला आहे. आज संविधान बदलण्याची व नवे संविधान निर्माण करण्याची भाषा बोलली जाते. हे आज संविधानापुढील आव्हान व धोका आहे. असे प्रतिपादन मुख्य वक्ते बी. सी. चंद्रिकापुरे यांनी लोकसेवा समता प्रतिष्ठान द्वारा आयोजित भारतीय राज्यघटने पुढील धोके व आव्हाने यावरील आयोजित परिसंवादात केले.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर कन्वेशन सेंटर येथे आयोजित भारतीय राज्यघटने पुढील धोके व आव्हाने या परिसंवादाला अध्यक्ष म्हणून ॲड. किशोर गजभिये, प्रमुख वक्ते म्हणून न्यायमूर्ती बी.सी. चंद्रिकापुरे, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड प्रदीप



वाठोरे, ॲड व्ही. पी. पानतावणे, अविनाश काकडे, वसंत मुंडले उपस्थित होते.

बी.सी. चंद्रिकापुरे परिसंवादात पुढे म्हणाले की संविधान कितीही चांगले असले तरी ते चालविणारे राज्यकर्ते जर वाईट असतील तर संविधान हे वाईट ठरते व संविधान कितीही वाईट असले आणि ते चालविणारे राज्यकर्ते जर चांगले असतील तर संविधान हे चांगले ठरते.

परिसंवादाच्या सुरुवातीला वसंत मुंडले म्हणाले की राज्यघटनेने स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय हे अधिकार नागरिकांना दिलेले आहे आणि या तत्त्वानुसार प्रत्येक नागरिकाला स्वतंत्रपणे विचार करण्याचे, लिहिण्याचे, संचार करण्याचे स्वातंत्र्य आहे. निवडणूक पद्धतीने योग्य वैचारिक पातळीचे नेते पार्लमेंट मध्ये निवडून जाणे गरजेचे आहे पण तसे होताना आता दिसत नाही. लोकशाही हे आता लोकांकडून चालविल्या जात नसून ती नियंत्रित होण्याच्या मार्गावर लागलेली आहे.

त्यामुळे हा संविधानापुढील एक मोठा धोका आपल्यापुढे आहे व त्याचे आव्हान आहे असे ते परिसंवा दात म्हणाले. कामगार व शेतकरी नेते अविनाश काकडे आपल्या वक्तव्यात म्हणाले की जे संविधान सर्वधर्मसमभावावर आधारलेले आहे अशा या लोकशाहीत काही सत्तेतील लोक म्हणतात की देश हा धर्मनिरपेक्ष नाही तर पंथ निरपेक्ष आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रणेते मोहन भागवत यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मूल्या ऐवजी मुक्ती, मोक्ष, समरसता आणि निष्ठा या बाबी लोकांच्या मनात ठासवण्याचा प्रयत्न केला. तसेच ते म्हणतात की कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम हा चुकीचा होता आज स्त्रियांनी दोन ते तीन मुलांना जन्म द्यायला हवा. जिथे एकट्याचे आबाळ होते तिथे सर्वसामान्य माणूस तीन ते चार मुलांना कसा पोसेल हा एक मोठा प्रश्न आहे. जेव्हापासून स्त्रिया शिकायला लागल्या तेव्हापासून सामाजिक परिस्थिती बिघडली आहे असे मोहन भागवत म्हणतात.

ज्या नेत्यांना आपण निवडून दिले त्या महाविकास आघाडीतील काही नेते बीजेपी व अजित पवारांना शामिल होणार असल्याची माहिती आहे. यासाठी आपण या नेत्यांना निवडून दिले काय हा देश कोणत्या वाटेने चाललेला आहे असा प्रश्न त्यांनी या परिसंवादात उभा केला. एड. पानतावने आपल्या वक्तव्यात म्हणाले की जोपर्यंत एससी, एसटी, ओबीसी एकत्र येणार नाही तोपर्यंत बाबासाहेबांच्या विचारांचे राज्य येणार नाही.

# कपिलनगरात व्यवस्थापकाच्या घरी शस्त्राच्या धाकावर धाडसी दरोडा

## कुटुंबाला धमकावून १४ लाखांचा माल लुटला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ डिसेंबर :

कुटुंब गाढ झोपेत असताना काही मुखवटाधारी दरोडेखोर घरात घुसले. शस्त्राचा धाड दाखवून पती-पत्नीआणि मुलीला जिवे मारण्याची धमकी दिली आणि जवळपास १४ लाख रुपयांचा माल लुटून फरार झाले. ही खळबळजनक घटना कपिलनगर पोलिस ठाण्यांतर्गत खसाळा-मसाळाच्याँ जगदंबानगर परिसरात घडली. या प्रकरणी पोलिसांनी राजेश छेदीलाल पांडे (६०) च्या तक्रारीवरून अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदविला आहे.

राजेश एका ट्रांसपोर्ट कंपनीत व्यवस्थापक आहेत. खसाळा-मसाळाच्याँ जगदंबानगरात त्यांची दुमजली इमारत आहे. मंगळवारी रात्री राजेश हे पत्नी किरण आणि मुलगी शिवानी यांच्यासोबत घरी झोपलेले होते. रात्री २.३० वाजताच्या सुमारास त्यांच्या पत्नीची कशाच्या तरी आवाजाने झोप उघडली. त्यांनी हॉलमध्ये जाऊन पाहिले असता २५ ते ४० वर्षे वयोगटातील ५ मुखवटाधारी हातात चाकू आणि रॉड घेऊन दिसले. किरण यांनी राजेशला झोपेतून उठवले. आरोपींनी त्यांना मारण्याची धमकी देऊन आरडा-ओरड करण्यास मनाई करीत घरातील मौल्यवान वस्तूंबाबत विचारपूस केली. चार आरोपी राजेश, किरण आणि शिवानी यांना बेडरूममध्ये घेऊन गेले. कपाटाच्या लॉकरमध्ये ठेवलेला सोन्याचा हार, बांगड्या, अंगठी, कानातले दागिने असे १६४ ग्रॅम सोने, ६ लाखांची रोकड आणि २५० ग्रॅम चांदी लुटली.

त्यानंतर आरोपी परत सर्वांना हॉलमध्ये घेऊन आले. त्यानंतर आरोपींनी राजेशला घरापुढे उभ्या एसयूव्हीची चावी मागितली. टीव्हीजवळ पडलेली चावीसोबतच आरोपींनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा डीव्हीआरही उचलला. घरातील तिन्ही सदस्यांचे ६ मोबाईल फोनही उचलले. एका आरोपीने किरण आणि शिवानीला वरच्या माळ्यावर जाण्यास सांगितले आणि राजेशला सोबत येण्यास म्हटले. त्यानंतर आरोपींनी कारमध्ये राजेशला डांबून उप्पलवाडीच्या नाका नंबर २ जवळ घेऊन गेले. हनुमान डॅमजवळ राजेश यांना वाहनातून उतरविण्यात आले. मोबाईल आणि वाहन काही अंतरावर मिळतील असे सांगून आरोपी फरार झाले.

राजेश पायदळ चालत हनुमान डॅमपर्यंत पोहोचले. एका ट्रक चालकाला थांबवून मदत मागितली आणि त्याच्या फोनने पोलिसांना घटनेची



माहिती दिली. पोलिस घटनास्थळावर पोहोचले. तपासात डाव्या बाजूच्या खिडकीचे ग्रील काढून दरोडेखोरांनी घरात प्रवेश केल्याचे समोर आले. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपींचा शोध सुरू केला. मांझी रेल्वे बोगद्याजवळ पोलिसांना राजेश यांचे वाहन मिळाले. त्यात सर्व ६ मोबाईलही ठेवलेले होते. झोन ५ चे डीसीपी निकेतन कदम यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनेचा आढावा घेतला. आरोपींचा शोध लावण्यासाठी आयकार विभाग आणि फॉरेंसिक पथकालाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले.

टिपच्या आधारावर पोलिसांनी हा दरोडा घातल्याचा संशय पोलिसांना आहे. आरोपींनी आधी घराची रेकी केली. दरोडेखोरांनी कुटुंबातील कोणालाही हानी पोहोचविली नाही. एका आरोपीने तुमच्या जवळ किती माल आहे, हे आम्हाला माहिती असल्याचे म्हटले होते. यावरून स्पष्ट आहे की, आरोपींना राजेशबद्दल पूर्ण माहिती होती. राजेश ट्रांसपोर्ट कंपनीत व्यवस्थापक असल्याने अनेकदा जमा झालेली रोकड घेऊन घरी येत होते. कदाचित त्यामुळे आरोपींना त्यांच्या घरून मोठी रक्कम हाती लागण्याची आशा होती. ऐन हिवाळी अधिवेशन सुरू असताना दरोड्याची ही घटना घडल्याने पोलिसांत खळबळ उडाली आहे. गुन्हे शाखेची ३ पथके आरोपींचा शोध घेत आहेत. रात्री १२ वाजताच्या सुमारास दोन तरुण पांडे यांच्या घराजवळ फिरत होते. मात्र ते कोणाचा तरी पता शोध असतील असा विचार करून त्यांच्याकडे लक्ष दिले नसल्याचे स्थानिक नागरिकांनी पोलिसांना सांगितले आहे.










नागपूर : विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात आज तिस-या दिवशी राज्य असंघटित बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने विधानभवनावर मोर्चा काढण्यात आला. दिभाभूमी बचाव संघर्ष समितीच्या वतीने विधान भवनावर धडक देण्यात आली. त्याचप्रमाणे पत्रकारांच्या हक्कासाठी पत्रकारांनी ठिय्या आंदोलन केले.

## वाहन चोर पोलिसांच्या जाळ्यात

**नागपूर :** पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर ठाण्यांतर्गत वाहन चोरी करणाऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. चौकशीत त्याने गत 3 दिवसांत दोन वाहन चोरी केल्याचे उघडकीस आले. रोहित सुभाष नेहारे (24) रा. साईनगर, दाते लेआऊट असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

फिर्यादी कृष्णा नत्थू उईके (27) रा. बिनाकी मंगळवारी हा वाढई काम करतो. गत 6 डिसेंबरच्या सकाळी कृष्णाने त्याची एमएच-49/एएक्स-1183 क्रमांकाची मोटारसायकल मुंजे चौकात मेट्रो स्टेशनजवळील एका दुकानासमोर उभी केली आणि कामावर गेला होता. या दरम्यान अज्ञात आरोपीने त्याची मोटारसायकल चोरून नेली. कृष्णाच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला.

परिसरातील सीसीटीव्ही फुटेजवरून रोहितचा सुगावा लागला. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता कृष्णाची मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. रोहितला अटक करून सखोल चौकशी केली असता त्याने 8 डिसेंबरच्या दुपारी धरमपेठ परिसरातील आदित्य होंडा शोरूमजवळून एक दुचाकी चोरी केल्याची माहिती दिली. पोलिसांनी त्याच्याकडून दोन्ही वाहने जप्त केली आहेत.

## आज विज्युक्टाचे विधिमंडळावर लक्षवेधी धरणे

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

शिक्षण आणि शिक्षकांच्या न्याय मागण्या संबंधात गेली वर्षभर अनेक आंदोलने महासंघ व विज्युक्टाने केली दरम्यान शासन पातळीवर काही बैठकीही संपन्न झाल्या त्यात मान्य मागण्याचे अनेक शासनादेश अजून पर्यंत काढण्यात आलेले नाही त्यामुळे शिक्षकांमध्ये असंतोष आहे.

अनुदानित संस्थांमध्ये अनेक वषार्पासून काम करणा?या वाढीव पदावरील शिक्षकांना आजही विनावेतन काम करावे लागत आहे. नियुक्ती निकषात बसणारे अनेक शिक्षक जुन्या पेन्शन पासून वंचित आहेत. विद्यार्थ्यांना शिकवायला शिक्षक नाहीत गेल्यावेळी महायुतीचे सरकार असताना शिक्षकाच्या काही मागण्यांचे आदेश निर्गमित झाले असले तरी अनेक मान्य मागण्याचे आदेश अजूनही प्रलंबित आहेत त्याकडे लक्ष देण्याकरिता नागपूर विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनावर गुरुवार दि. 19 डिसेंबर २०२४ ला शिक्षक लक्षवेधी धरणे देणार असल्याचे विज्युक्टा चे अध्यक्ष डॉ.अविनाश बोर्डे व महासचिव डॉ.अशोक गव्हाणकर यांनी म्हटले आहे.

**लक्षवेधी मागण्या पुढीलप्रमाणे:-**

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी अंशतः अनुदानावर नियुक्त शिक्षकांवर जुनी पेन्शनबाबतचा झालेला अन्याय दूर करावा. १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी. राज्यातील अंशतः अनुदानित शाळा क.म.वि शिक्षकांना प्रचलित धोरणानुसार टप्पा वाढ देण्यात यावी व त्यांना जीपीएफ/एनपीएस अंशदानाची अनुमती द्यावी. १०,२०,३० वर्षाची आश्वासित प्रगती योजना शिक्षकांना लागू करावी. निवडश्रेणीसाठीची २० टक्क्यांची अट रद्द करावी. "विद्यार्थ्यांना शिकवायला शिक्षक द्या" राज्यात शिक्षकांची सर्व रिक्त पदे विना विलंब भरावीत. विनाअनुदानित कडून अनुदानितकडे बदली केलेल्यांचे प्रस्तावाचे पुर्वीप्रमाणे उपसंचालकांना अधिकार देण्यात यावेत.

वाढीव पदावरील शिक्षकांचे समायोजन तसेच आयटी शिक्षकांना अनुदान देण्यात यावे. शाळा संलग्न कनिष्ठ महाविद्यालयात २१ विद्यार्थी व वरिष्ठ महाविद्यालय संलग्नितमध्ये ३१ विद्यार्थी ही पटसंख्या ग्राह्य धरावी. एम.फिल.,एम.एड.,पीएच.डी. धारकांना वेतन वाढ लागू करावी व केंद्राप्रमाणे निवृत्तीचे वय ६० करावे. उपदान वाढीचा लाभ १ सप्टेबर २०२४ ऐवजी ७ व्या वेतन आयोगाच्या लाभ दिनांकापासुन देण्यात यावा.पेन्शन विक्री वसुली १५ ऐवजी १२ वर्ष करावी. २० सप्टेंबर २०२४ च्या शासन आदेशातील नॉन क्रिमिअल इयर ही अट असल्याने उत्पन्नाचा दाखला मागू नये.

विधिमंडळावरील या लक्षवेधी धरणे आंदोलनात शिक्षकांनी बहुसंख्येने सहभागी होण्याचे आवाहन विज्युक्टा महासचिव डॉ. अशोक गव्हाणकर, के.का. सहसचिव डॉ.अभिजीत पोटले, के. का सदस्य प्रा.जितेंद्र ठाकरे, नागपूर शहर अध्यक्ष डॉ.चेतन हिंगणेकर, नागपूर ग्रामीण अध्यक्ष डॉ. नितीन देवतळे, नागपूर शहर कार्याध्यक्ष डॉ. शालिनी तेलरांधे, सचिव डॉ. गजानन धांडे, ग्रामीण सचिव प्रा. विवेक देशमुख,नागपूर कार्यकारिणी उपाध्यक्ष म्हणून डॉ.गोविंदा चौधरी, प्रा.रवींद्र नानवटकर, कोषाध्यक्ष प्रा.विशाल बोरकर, संघटन सचिव प्रा.भरत काळे, प्रसिद्धीप्रमुख डॉ.सुधीर रायपूरकर, सहसचिव प्रा.प्रशांत डेकाटे, प्रा.किशोर बहुरूपी, प्रा.सुरेश सुखदेव, प्रा. संजय फुसे, प्रा.जयंत डहाके, प्रा.संदीप तम्मेवार, सदस्य प्रा.मोहम्मद आमीर आफाक, डॉ. प्रभाकर चांदेकर, प्रा. सुनील राठोड, डॉ. सुजीत चव्हाण, प्रा.सचिन दुरुगकर, प्रा.चेतन मोझरकर, प्रा.मोहम्मद जा. अन्सारी, प्रा. गुरुफात हसन शाहबाज अन्सारी, प्रा.सूचिता बदखल, प्रा.प्रिया गण्यारपवार, प्रा.अपूर्वा पाठक, प्रा.ओमप्रकाश भेंडे, प्रा.ललित मुटे, प्रा. नितीन कराळे, प्रा.अमित चौधरी व इतर पदाधिकारी व सभासद, शिक्षकांना लक्षवेधी धरणे आंदोलनात उपस्थित राहण्यासाठी आग्रहाचे आव्हान केलेले आहे.

## हिट्स ऑफ शम्मी कपूर अँड आशा पारेखला श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

स्वरतरंग द्वारा हिट्स ऑफ शम्मी कपूर अँड आशा पारेख या कार्यक्रमाचे मंगळवारी आयोजन करण्यात आले. यात सुप्रसिद्ध गायक कलाकारांनी शम्मी कपूर आणि आशा पारेख यांची गाजलेली गाणी सादर केली. त्यांना उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

मुंडले सभागृहात झालेल्या या पं. रघुनाथ बोबडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमात गौरी शिंदे यांनी ह्यरात का समा झुमे चंद्रमा, क्या जानु सजन, निरंजन बोबडे यांनी छमछम बाजे रे पायलिया, ए गुलबदन, लक्ष्याती काजलकर यांनी सुनो सजना, सायोनारा या सदाबहार गाण्यांसह दिवाना हुआ बादल, दिल के झरोकों में, दिल देके देखो, यु तो हमने लाख हसी, ये चांद सा, एहसान तेरा, ओ हसिन जुल्फोवाली, आवाज देके हमे, दिलबर दिल से प्यारा, आसमान से आए फरिश्ता, जाईए आप कहा जाएंगे, झुमता मौसम मस्त, तुम मुझे यु, मेरा यार शब्बा खैर, बदन पे सितारे, ॲन इव्हिनिंग इन पॅरिस आदी गाणी अनिल गुल्हाने आणि इतर गायकांनी सादर करून श्रोत्यांना खिळवून ठेवले. गायक कलाकारांना की-बोर्डवर परिमल जोशी आणि महेंद्र ढोले, तबल्यावर पंकज यादव, ऑक्टोपॅडवर सुभाष वानखेडे, ढोलकवर दीपक कांबळे यांनी साथ दिली. साऊंडची जबाबदारी अभिषेक लीलहोरे यांनी सांभाळली. कार्यक्रमाची संकल्पना आणि दिग्दर्शन निरंजन बोबडे यांचे होते.

## महाराजबाग प्राणी संग्रहालयात प्राण्यांसाठी हिटर

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

महाराजबाग झू अँड गार्डन मध्ये वाघ, बिबट, चिडिया घरामधील पक्षांसाठी थंडीपासून बचाव होण्याकरिता हिटर व ग्रीन नेटची सोय करण्यात आली आहे.



जंगलामधील अधिवास व प्राणी संग्रहालयातील प्राण्यांच्या वास्तव्यात मोठ्या प्रमाणात तफावत आढळून येते. जंगलामध्ये थंडी, ऊन, वारा यापासून स्वतःचा बचाव करण्याकरिता प्राणी व पक्षी झाडांचा व दगडांचा आडोसा घेत असतात. पण प्राणी संग्रहालयात त्यांच्या गरजा मानव पूर्ण करीत असतो. त्यांना ठेवण्यात येणाऱ्या पिंजऱ्याच्या भिंती हिवाळ्यात थंड होतात. तेव्हा त्यांना उब देण्याकरिता महाराजबाग झू अँड गार्डन मध्ये हिटरची व्यवस्था करण्यात आली आहे. चार बिबट, दोन वाघ व चिडियाघरातील शंभरच्या वर पक्षांसाठी एकुण पाच हीटर लावण्यात आले आहे. हे हीटर पिंजऱ्याच्या बाहेर ठेवण्यात येते. तसेच चीतळ, काळवीट, हरीण यांच्यासाठी ग्रीन नेट लावण्यात आली आहे. बगीच्यात पडणाऱ्या पाला पाचोऱ्याला स्वच्छ करून या प्राण्यांच्या झोपण्यासाठी बेडींग मटेरियल पुरविण्यात येत आहे. या प्राणी संग्रहालयात विविध प्रकारचे पक्षी, रेपटाइल्स, मॅमल्स मिळून 248 प्रकारचे पक्षी व प्राणी आहेत.

## महिला तलाठ्याला लाच घेताना सहकाऱ्यासह अटक

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

नुकसान भरपाईचा अर्ज करण्याकरिता पिकाखालील क्षेत्राचा तपशील नोंद करून देण्यासाठी 2 हजारांची लाच घेणाऱ्या महिला तलाठ्याला सहकाऱ्यासह लाच लुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी)च्या पथकाने मंगळवारी रंगेहात अटक केली. रुपाली अरविंद मानकर (28) आणि आशिष गुलाब देशमुख (32) रा. नवेगाव, उमरेड अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

एसीबीकडून मिळालेल्या माहितीनुसार, रुपाली ही उमरेड तहसील कार्यालयात तलाठी पदावर कार्यरत आहे. तक्रारकर्ते हे शेतकरी असून उमरेडच्या म्हसाळा येथील रहिवासी आहेत. तक्रारदार यांच्या शेतातील पिकाची वन्य प्राण्यांनी नासाळी केली होती. त्यामुळे नुकसान भरपाई मिळावी म्हणून तक्रारकर्त्यार्ला वनविभागाकडे अर्ज करायचा होता. त्यासाठी गाव नमुना बारावर सन 2024-25 मधील पीक क्षेत्राचा तपशील आवश्यक होता. तपशील नोंद करून घेण्यासाठी तक्रारकर्त्यानें उमरेड तहसील कार्यालय गाठून तलाठी रुपालीची भेट घेतली.

रुपालीने पिकाखालील क्षेत्राचा तपशील नोंद करून देण्यासाठी तक्रारकर्त्यार्ला 3 हजारांची लाच मागितली. तडजोडीनंतर रुपाली दोन हजार घेण्यास तयार झाली. मात्र तक्रारकर्त्याला द्यायची नसल्याने त्यांनी एसीबीकडे तक्रार केली.

## ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याचा उद्देश

## महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ३१ मार्च २०२४ नंतर सलग तीन वेळा ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहेत. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले भरून योजनेच्या लाभाची संधी ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहे.

ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू वीजग्राहकांसाठी लागू असेल, ज्यांनी ०१ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे ०१.०४.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा भरणा केलेला नाही किंवा ऑनलाईन वीज देयक भरणा पर्याय वापरलेला नाही.

ग्राहकांना लकी ड्रा व्दारे स्मार्ट फोन, स्मार्ट वॉच अशी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. ग्राहकांनी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरून लकी डिजिटल ग्राहक योजनेचा लाभ घ्यावा, असे महावितरणचे आवाहन आहे.

ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्राहकांना डिजिटल पध्दतीने वीज बिलाचा भरणा करता यावा, यासाठी महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल ॲपची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे.

ग्राहकांना देय रक्कमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीज बिल भरणा सूट दिली जाते. परिणामी सध्या राज्यात ७० टक्के हून अधिक वीज ग्राहक ऑनलाईन पध्दतीने वीज बिलाचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे.

महावितरणच्या प्रत्येक उपविभाग स्तरावर एप्रिल, मे व जून २०२५ या प्रत्येक महिन्यात एक प्रमाणे तीन लकी ड्रा ऑनलाईन पध्दतीने काढण्यात येणार आहेत. प्रत्येक लकी ड्रामध्ये पाच विजेत्यांना स्मार्ट फोन व स्मार्ट वॉच ही बक्षिसे दिली जाणार आहेत. योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील.

वीज बिलाची किमान रक्कम रु. १००/- असणे आवश्यक आहे. लकी ड्रॉ घोषित करण्यापूर्वीच्या महिन्याच्या अंतिम दिवशी ग्राहकाची थकबाकीची रक्कम रु.१०/- पेक्षा कमी असावी. एक ग्राहक क्रमांक केवळ एका बक्षिसासाठी पात्र असेल.

## हिंदुत्ववाद्यांचे सरकार आणि सरकारचे हिंदुत्व संकल्पनेवर कार्यक्रमाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १८ :

नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत 'व्होट जिहाद'चा सपशेल पराभव करून ऐतिहासिक विजय संपादन करणाऱ्या हिंदु धर्मप्रेमी लोकप्रतिनिधींचा सन्मान सोहळा संत-महंत, समस्त मंदिर विश्वस्त आणि हिंदुत्वनिष्ठ यांच्या उपस्थितीत १९ डिसेंबरला नागपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. 'हिंदु जनजागृती समिती' आणि 'महाराष्ट्र मंदिर महासंघ' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा सोहळा झाशी राणी चौक, नागपूर येथील 'विदर्भ साहित्य संघा'च्या सभागृहात सायंकाळी ५.३० ते रात्री ८ पर्यंत या कालावधीत होणार आहे. 'हिंदुत्ववाद्यांचे सरकार आणि सरकारचे हिंदुत्व' या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती 'हिंदु जनजागृती समिती'चे महाराष्ट्र



आणि छत्तीसगड राज्य संघटक तथा 'मंदिर महासंघा'चे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी दिली. ते टिकळ पत्रकार भवन, नागपूर येथील पत्रकार परिषदेत बोलत होते.

या पत्रकार परिषदेला हिंदु जनजागृती समितीचे विदर्भ समन्वय श्रीकांत पिसोळकर, नागपूर येथील बृहस्पती मंदिराचे विश्वस्त रामनारायण मिश्र, पंचमुखी हनुमान मंदिरा'चे विश्वस्त दिलीप कुकडे, 'राष्ट्रीय युवा गठबंधन'चे संस्थापक अध्यक्ष , राहूल पांडे आणि भाजपचे अनिल शर्मा हे उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी म्हणून शिवसेनेचे नेते उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, मंत्री सर्वश्री भरतशेठ गोगावले, योगेश कदम, आशिष जयस्वाल, तर भाजपचे मंत्री सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, नीतेश राणे, अतुल सावे, आकाश फुंडकर, संजय सावकारे, पंकज भोयर, तसेच शिवसेनेचे आमदार सर्वश्री प्रदीप जयस्वाल, चंद्रकांत सोनावणे, अमोल खताळ, बालाजी किणीकर, तर भाजपचे आमदार सर्वश्री मंगेश चव्हाण, सुनील कांबळे, सत्यजित देशमुख, अतुल भातखळकर, प्रतापराव अडसर, महेश लांडगे, सुरेश भोळे, शंकर जगताप, सचिन कल्याणशेट्टी, नारायणराव कुचे, संजय केळकर, कालीदास कोळंबकर, सुभाष देशमुख यांच्यासह अनेक विजयी आमदारांना निमंत्रित करण्यात आले आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही महासंघाच्या वतीने नागपूर येथील विधान भवनात प्रत्यक्ष भेटून कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आले आहे. चांगला कार्यक्रम घेतल्याची प्रतिक्रिया मा. मुख्यमंत्र्यांनी भेटीत व्यक्त केली. या सोहळ्यासाठी नागपूर आणि विदभार्तील सर्व हिंदुत्ववादी कार्यकर्ते, राष्ट्रप्रेमी आणि धर्मप्रेमी यांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे, तसेच अधिक माहितीसाठी ७०५७३६८८६० या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले.